
मोहिते पाटील आणि मंडळींनी हे लक्षात ठेवावे, की
त्यांना सामना करावा लागणार आहे
तो काँग्रेसपक्षाशी नाही, सरकारशीही नाही
तर
गोळाभर अन्नालाही मोताद झालेल्या कोटचवधी गोरगरीब जनतेशी.

या लढाईत मोहिते पाटील आणि त्यांचा वर्ग टिकाव धरतील असे वाटत नाही
कारण इतिहासाची साक्ष वेगळी आहे.

सदाशिवनगर व बेलवंडी
दोन शेतकरी परिषदांचा चक्षुर्वैसत्य वृत्तांत....



# माणूस

शनिवार । ४ डिसेंबर १९७१

पन्नास पैसे

| | | | |
|---|---|---|---|
| माणूस | शनिवार | ४ डिसेंबर १९७१ | पन्नास पैसे |
| वर्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| अकरा | सत्तावीस | पंचवीस रुपये | पंचेचाळीस रुपये |

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**सप्रेम नमस्कार...**

▫ मागचे दोन्ही सप्ताहाचे अंक वाचले आणि काहीतरी दर्जेदार, विचार प्रवर्तक साहित्य वाचल्यासारखे वाटले. सध्याच्या हिणकस साहित्याचा सुळसुळाट झालेल्या काळात 'माणूस'ने आपली उच्चस्तर अभिरुची सोडली नाही, हे खचितच अभिनंदनीय आहे.

भारतामध्ये असेही, अशांत, स्फोटक, व उग्र 'महानगर कलकत्ता' आहे हे वाचताना विश्वास बसत नाही.

'व्होकुंटाचे लाल पाणी'! सुरेख. कमाल आहे जॉन नोबलच्या मनोधैर्याची.

**२६ नोव्हेंबर १९७१ रवींद्र चौधरी, नागपूर**

▫ आपल्या २७ नोव्हेंबरच्या 'माणूस'च्या अंकातील महावीर जोंधळे यांची कथा वाचली. छान आहे. साचेबंद कथांना विटलेले मन अशाच कथांचा स्वीकार करील. त्यांनी यापूर्वी लिहिलेल्या कथाही चांगल्या होत्या. नव्यांना पुढे आणण्यासाठी आपण धडपडत आहात त्या बद्दल आपलेही अभिनंदन.

**२७ नोव्हेंबर १९७१ अशोक बेदरकर, औरंगाबाद**

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.




## खास वार्तापत्र : माणूस प्रतिनिधी

# सदाशिवनगर

काही महिन्यांपूर्वी सोलापूर जिल्ह्यातील एका गावाने व तेथील एका व्यक्तीने वर्तमानपत्रांत मथळ्यांची जागा घेतली होती. रकानेच्या रकाने भरून त्यांच्या संबंधीच्या बातम्या जवळ जवळ रोजच झळकत होत्या. महाराष्ट्रात तर त्यामुळे खळबळ माजलीच पण देशातही 'त्या' घटनेचे प्रतिसाद उमटले. खुद्द प्रधान-मंत्र्यांनाही त्याची दखल घ्यावी लागली.

अजूनही 'त्या' संबंधी काहीतरी कानावर येतेच.

होय ! हा उल्लेख अकलूज व तेथील 'लक्षभोजन फेम' आमदार श्री. शंकरराव मोहिते पाटील यांच्या संबंधीचा आहे. परवा म्हणजे १९ नोव्हेंबरला अकलूज (माळशिरस तालुक्यातील) सदाशिवनगर येथे आमदार मोहिते यांनी असाच एक दणका दिला. या दणक्याचे प्रतिसाद महाराष्ट्रभर उमटू लागले आहेतच. पण खरी जुगलबंदी यापुढेच रंगणार आहे अशी चिन्हे आताच दिसू लागली आहेत.

सदाशिवनगर येथील 'श्री. शंकर सहकारी साखर कारखाना लि.' या कारखान्याच्या आवारात, माळशिरस व इंदापूर या तालुक्यातील शेतकऱ्यांची परिषद माळशिरस तालुका काँग्रेसच्या वतीने शुक्रवार दिनांक १९ रोजी भरली होती. परिषदेचे बोलाविते धनी अर्थातच आमदार शंकरराव मोहिते पाटील हेच होते.

अलिकडेच पुण्यात 'महाराष्ट्र सोशालिस्ट फोरम'चे अधिवेशन भरले होते आणि त्यामागोमाग ही परिषद भरत होती. तेव्हा 'फोरम'ला शह देणे हा त्यामागचा उद्देश तर सरळच दिसत होता. पण कमाल जमीनधारणा कायद्याला विरोध करणे हेही उद्दिष्ट होतेच.

महाराष्ट्रात कमाल जमीनधारणा कायदा लवकरच येत आहे. पण प्रत्यक्षात कायदा येण्यापूर्वीच त्याचा भरपूर गाजावाजा करण्यात आला आहे. सरकारनेही बहुतेक भरमसाठ जमीन असणाऱ्यांना काहीतरी 'सोय' करता यावी म्हणून कदाचित असा गवगवा करायला मदत केली असावी असे दिसते. कायदा करण्याच्या बाबतीतील शासकीय दिरंगाही हेच सूचित करते आहे, की या वेळात ज्यांच्या कडे जादा जमीन आहे त्यांना खाते-फोड करण्यासाठी अवधी मिळावा. तरी पण जमीनदारवर्ग तर अत्यंत अस्वस्थ झाला आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर कमाल जमीन धारणा कायद्यासंबंधी होणारी महाराष्ट्रातील पहिली शेतकरी परिषद म्हणजे एक महत्त्वाची घटना ठरणार होती. हा विचार करूनच सदाशिवनगरकडे जाण्याचा प्रपंच केला.

सदाशिवनगरच्या वाटेवर फलटणमध्ये काही वेळ मुक्काम होता. काही लोकांशी बोलण्याची, चर्चा करण्याची तेथे संधी मिळाली. कमाल जमीन धारणा कायद्यासंबंधी व इतर बरंच काही कानावर आलं.

खातेवाटपाचे प्रयत्न तर जारीनेच सुरू आहेत. पूर्वीच केव्हातरी खाते वाटप पूर्ण झालेलं आहे असं दाखविण्यासाठी कागदपत्र तयार करण्याचा शेतकऱ्यांनी सपाटा लावला आहे. त्यासाठी जुन्या स्टॅम्प पेपर्सची खरेदी जोरात सुरू झाली आहे. वकील मंडळींची यात अगदी चंगळच झाली आहे. तलाठी आदी सरकारी नोकरवर्गाची 'चलती' आहे. ५० रुपयांचा (जुना) स्टॅम्प पेपर ५०० ते ५००० रुपये देऊनही खरेदी करण्यासाठी अनेकांची झुंबड उडाली असल्याचीही कुणकुण ऐकू आली. पूर्वी पाटकऱ्याला 'आपलासा' करून घेऊन जमिनीला भरपूर पाणीपुरवठा व्हावा यासाठी जवळ जवळ सर्वच जण चोरी चोरी मामला करीत असत. (अजूनही हे सारं तसं चालू आहेच.) पण आता आपली जमीन बागाईत नसून जिराईत आहे हे दाखविण्यासाठी व कमाल जमीन धारण कायद्यापासून वाचविण्यासाठी पाणी तोडण्याचे प्रयत्नही चालू आहेत. 'आपण फार पूर्वीच फारकत घेतली असून काही वर्षे वेगळे राहात आहोत आणि जमिनीचा काही भाग कायदेशीररीत्या मला मिळावा म्हणून ही नोटीस बजावीत आहे.' अशा काहीश्या आशयाच्या खोट्या नोटिसा नवरा-बायको एकमेकांवर बजावू लागले आहेत. जमिनी टिकविण्यासाठी चाललेली ही सारी धडपड!

हे सारं कानावर आलं असल्याने सदाशिवनगरला काय पाहायला व ऐकायला मिळते याची फारच उत्सुकता लागून राहिली होती.

दुपारी ३ वाजता परिषद सुरू व्हायची होती. त्याच सुमारास तेथे मी पोचलो. निरनिराळ्या गावाहून शेतकऱ्यांना आणण्यासाठी, शेतकरी परिषदेच्या संयोजकांनी खास ट्रक्सची व्यवस्था केली असल्याचे, तेथे पोचताच ध्यानात आले. पत्रकारांना पुण्याहून आणण्यासाठीही खास आराम बस सदाशिवनगर ते पुणे, पुणे ते सदाशिव-

नगर आणि परत पुणे या प्रवासासाठी पाठविण्यात आली होती, असेही तेथे गेल्यावर समजले.

कारखान्याबाहेर फियाट, अॅम्बॅसेडर आदी मोटारींचीही रांग लागली होतीच. एकूण काय ती 'शेतकरी परिषद' होती. गरीब-श्रीमंत शेतकरी असा संयोजकांनी भेदभाव बिलकूल केला नव्हता. कमाल जमीनधारणा कायद्याचा ज्यांना चांगलाच हादरा बसणार आहे असे सधन शेतकरी व ज्यांच्यावर नव्या कायद्याचा काहीच परिणाम होणार नाही असे थोडी शेती असलेले किंवा कदाचित बिलकूल शेती नसलेले शेतकरी एकत्र जमवून खऱ्या अर्थाने 'शेतकरी परिषद' आयोजित करण्याचा एक छानपैकी शो बेमालूम वठवला गेला होता. सुमारे पाच हजार शेतकरी तेथे होते. सर्वांसाठी चहापाण्याचीही उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. सुमारे अर्धा तास उशीराच परिषद सुरू झाली. मध्यम, गरीब शेतकरी हे शंकरभाऊवरील प्रेमामुळे आले असल्याचे एका मध्यम शेतकऱ्याने मला सांगितले. (आमदार मोहिते हे शंकरभाऊ व आमदार म्हणून तेथे प्रसिद्ध आहेत. त्या भागात त्यांचे वजनही दांडगे आहे.)

परिषदेची सुरुवातच श्री. शंकरराव मोहिते पाटील यांच्या भाषणाने झाली. परिषदेच्या ध्येयधोरणांचे दिग्दर्शन करणारे त्यांचे भाषण मी जरा सविस्तरच देणार आहे. त्यांच्या नंतरच्या वक्त्यांनी एकच धमाल उडवून दिली होती. त्यांच्या भाषणात कमाल जमीन धारणेचा होऊ घातलेला नवा कायदा, शासन, यांच्यावर टीका होतीच पण त्यापलीकडे हल्ल्याचा सारा रोख होता तो 'फोरम'वर आणि फोरमचे एक नेते केंद्रीय नियोजन खात्याचे राज्यमंत्री श्री. मोहन धारिया यांच्यावर.

परिषदेत एक अकरा कलमी ठरावही मांडण्यात आला होता. ठराव मांडणाऱ्याने ठरावाची कलमे वाचून दाखविली आणि 'आता टाळ्यांच्या गजरात ठराव मंजूर करा' असे जाहीर केले. पण आमदार मोहिते यांनीं तारतम्य बाळगले. ते स्वतःच माईककडे गेले आणि म्हणाले, की ज्यांचा ठरावाला विरोध असेल त्यांनी हात वर करावा व स्टेजवर येऊन सूचना मांडाव्यात. पण आलेले सारेच शेतकरी मुखस्तंभासारखे बसलेले. शेवटी मग हा ठराव मान्य असेल तर टाळ्या वाजवून तो मंजूर करा असे त्यांनी जाहीर करताच टाळ्यांचा गजर झाला.

ठरावातील काही महत्त्वाची कलमे सारांशपणे अशी —

१९६१ च्या कमाल जमीनधारणा कायद्यात काहीही बदल होऊ नये.

लोकशाही समाजवाद आणण्याचे देशातील प्रयत्न एकांगी आहेत. शहरी मालमत्ता व उत्पादनाची साधने यावर निर्बंध येईपर्यंत कमाल जमीनधारणा कायद्याचा पुनर्विचार होऊ नये.

शहरी मालमत्तेवर मर्यादा घालताना प्रॉपर्टीचा विचार न होता उत्पादनांच्या साधनाचा विचार करून सीलिंग मर्यादा घालावी. तसेच १९६१ च्या कायद्यात

शेतकऱ्याच्या जोड-धंद्याचा व वस्तुस्थितीचा विचार केला गेला नव्हता, तो व्हावा.

शेती उत्पादन खर्चाच्या बाबतीत वाढ होत आहे. शेती मालाच्या किमती अनिश्चित आहेत. उत्पादन सर्वस्वी निसर्गावर अवलंबून आहे. ह्या अडचणी लक्षात घेता ६१ च्या कायद्यात कसलाही बदल होऊ नये.

उद्योग धंद्यामध्ये स्त्री भागीदार असू शकते किंवा नवरा-बायको वेगवेगळे उद्योगधंदे करू शकतात. म्हणजे त्यांना वेगळी मालमत्ता करण्याचा अधिकार आहे. मग शेतकऱ्यांच्या स्त्रियांना जमीन ठेवण्याचा हक्क का असू नये ? हिन्दु कायद्या-प्रमाणे मुलाप्रमाणेच मुलीलाही वडिलोपार्जित इस्टेटीत वाटणी मागण्याचा हक्क आहे. कमाल जमीन धारणा कायद्यात याचा विचार केला गेला नाही.

(नव्या कायद्याप्रमाणे नवरा-बायको व तीन अज्ञान मुले यांचे कुटुंब हे घटक समजून कमाल जमीनधारणेनुसार ठेवता येणारी जमीन कुटुंबाच्या नावे असेल, त्यासाठी वरील कलम.)

विहिरीमधील पाण्याची शाश्वती नसल्याने विहीर बागायत जमीन ही जिराईत समजण्यात यावी.

हल्ली ज्या जमिनीस शेतकरी पाटाचे पाणी घेतो त्या शेतकऱ्याने पाटाच्य पाण्याचा हक्क सोडल्यास त्या शेतकऱ्याकडे असणारी जमीन जिराईत समजण्यात यावी.

शहरी मालमत्तेवर जी मर्यादा घातली जाईल त्याची अंमलबजावणी (रिस्ट्रॉस्पे-क्टिव्ह इफेक्ट) सन १९५९ पासून करण्यात यावी.

भारतातील प्रत्येक व्यक्तीस, व्यक्तिस्वातंत्र्य, उद्योगस्वातंत्र्य वगैरे हक्क आहेत. सर्वच व्यक्तींना स्वतःचा विकास करून घेण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे. मामलेदार, कलेक्टर होऊ शकतो. फौजदार, डी. एस्. पी. होऊ शकतो. पण नव्या कायद्यामुळे शेतकरी उतरणीला लागणार आहे. देशात आतापर्यंत कोणत्याच व्यवसायावर सीलिंग नाही. पण शेतीवर मात्र केवळ १० वर्षांत दोनदा सीलिंग येत आहे व त्यामुळे शेतकऱ्यावर अन्याय होत आहे म्हणून अशाप्रकरचा कोणताही कायदा होऊ नये.

परिषदेच्या काय काय मागण्या आहेत हे समजावून घेण्याच्या दृष्टीने वरील कलमे चांगलीच बोलकी आहेत. ज्यांच्याकडे भरपूर जमीन आहे त्यांना जमिनीची भूक असलेल्या भूमिहिनांना जमीन देण्याची इच्छाच नाही.

उत्पादन वाढविण्याऐवजी जमीन जाऊ नये म्हणून चाललेल्या प्रयत्नात पाणी तोडून ती चांगली नसल्याचे दाखविणे हा एक होय. बहुतेक साऱ्याच वक्त्यांचा सूरही असाच होता.

आमदार शंकरराव मोहिते-पाटील यांच्या भाषणातील मुद्दे पाहिले की वारा कोणत्या दिशेने वाहतो आहे याचा बोध होईल.

१९६१ चा कमाला जमीन धारणेचा कायदा होऊन दहावर्षे होत आहेत तोंच त्यासंबंधीचा दुसरा कायदा पुढे येत आहे. निसर्गावर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्याला कसलीच शाश्वती नाही. शेतकरी संपन्न झाला आहे अशी एक समजूत सर्वत्र रूढ झाली आहे. पण खऱ्या अर्थाने शेतकरी असा आहे काय ? तो थोडा सुशिक्षित झाला आहे. त्याचे राहणीमान थोडे उंचावले आहे. बाजारात त्याची पत वाढली आहे. यापलीकडे त्याच्या स्थितीत काहीही बदल झाला नाही. त्यामुळे वरील कायदा त्याला बाधक ठरणार आहे. कमाल जमीन धारणा कायदा अव्यवहारी-पणाचा आहे अशी कोणी टीका केली, की त्याच्यावर प्रतिगामित्वाचा शिक्का मारला जातो. निवडणुकीत त्याला तिकीट दिले जाणार नाही अशी दमदाटीही काही पुढारी करतात. पण ही काळजी ज्यांना तिकीट मागायचे आहे त्यांनी करावी. ' विधानसभेपेक्षा मी शेतकऱ्यात व ग्रामीण भागात अधिक काम केले आहे. तुमच्याकडे तिकीट मागायला आले आहे कोण ? तिकीट देणारे धारिया मोठे कोण आले आहेत ?

'माझ्या मुलामुलीच्या लग्नात मी लक्षभोजन घातले म्हणून काहूर माजविण्यात आले. मी त्यात माझे कर्तव्यच केले. प्रपंच केला नाही. लोकसभा निवडणूकीत धारियांनी जेवणावर किती खर्च केला ? त्यांनी नाही का ठरलेल्या रकमेक्षा अधिक रक्कम खर्च केली ? धारियांचे वाडवडील सावकारी करीत. ते मारवाडी आहेत. शेतकऱ्यांच्या शोषणावर धारिया मोठे झाले. हे फोरम काय आहे हो ! MPCC असताना फोरमची आवश्यकता काय आहे ?'

शेतकऱ्यांचे खच्चीकरण झाले पाहिजे अशीच काही बुद्धिवाद्यांची इच्छा आहे. भूमिहिनांसाठी जमीन या उद्देशाने सीलिंगचा कायदा पुढे आला पण तसा कायदा येऊन १० वर्षे झाली. हे उद्दीष्ट कितपत साध्य झाले ? खरी परिस्थिती याउलटच दिसते आहे. 'जे सरकार हे साध्य करू शकत नाही त्या सरकारला हा कायदा करण्याचा अधिकारच नाही ?'

या कायद्यामुळे जिराईत व बागाईत शेतकरी हवालदील झाले आहेत. या काय-द्याचा जमीन मालकीवर अनिष्ट परिणाम होईल म्हणून पाण्याखालील क्षेत्र कमी करण्याचा किंबहुना बागायती पिकांसाठी कालव्याचे पाणी न घेण्याचा निर्णय शेतकरी घेत असल्याने शेतकरी निकालात निघेल.

या कायद्याचा परिणाम सहकारी कारखान्यावर व शेतीवर अवलंबून असलेल्या इतर उद्योगांवर फार मोठ्या प्रमाणात होईल. शेतकरी अधिक कर्जबाजारी होत आहे. बचत तर होत नाहीच पण कारखान्यांकडून बील येण्यास विलंब लागताच त्याच्या डोळ्यात टिपे येतात. खरी सधन शेतकरी कुटुंबे महाराष्ट्रात ५० ते १००

पेक्षा जास्त नाहीत. ९८ टक्के शेतकरी गरीबच आहेत.

श्रीशंकर सहकारी कारखान्यातील १२५० सभासदांपैकी ५ एकर किंवा जास्त जमीन असलेले शेतकरी फारच थोडे आहेत.

६१ सालचा जमीन सुधारणा कायदा करून गरजू, भूमिहीन व अल्प जमीन धारकांना उपलब्ध होणारी जमीन वाटण्यात येईल अशी घोषणा करण्यात आली होती. ११ कारखान्यांची ९४ हजार एकर जमीन घेण्यात आली पण त्यापैकी जमीन कोणालाही वाटण्यात आली नाही. उलट ज्यांची जमीन काढून घेण्यात आली त्यांनाच स्वतःच्या जमिनीवर मजूरी करावी लागत आहे. या कायद्याने गरीबी हटणार नाही तर तिचे वाटप होईल.

सीलिंगमुळे हळूहळू जमीन धारणेचे प्रमाण कमी कमी होत आहे. ' दफन विधीला पुरेल इतकी तरी जमीन पुढे राहील की नाही कोण जाणे.'

सीलिंग आले ते फक्त शेतकऱ्यावर, इतरांवरही ते आणा की ! शहरातील कोट्याधिशांवर ते आलं आहे का ? वकील, डॉक्टर्स खोऱ्याने पैसा ओढत आहेत. त्यांच्यावर सीलिंग आलं आहे का ? मग ते शेतकऱ्यांवरच का येत आहे ? देशाचे शोषण करण्याचे केंद्रस्थान मुंबई आहे व तेही पुरोगामी महाराष्ट्रात. त्यावर मर्यादा आणा. मग आम्हीही त्यागाला तयार आहोत. प्रथम शहरी मालमत्तेवर मर्यादा आणा. येथे फक्त लोकशाही समाजवादाच्या नुसत्या घोषणा चालतात.

' मेळाव्यातील चर्चेचे निष्कर्ष एम्. पी. सी. सी. व मुख्यमंत्री यांच्या कानावर घालून व त्यांची प्रतिक्रिया अजमावून नंतर पुढली पावले उचलायची आहेत. पण या प्रश्नावर सबंध महाराष्ट्रात आम्ही जागृती करणार आहोत.'

शंकररावांचे भाषण आटोपताच सभेतील गर्दीला ओहटी लागू लागली. बरीच मंडळी बाहेर जाऊ लागली तर तिथे एक मजेदार प्रकार घडत होता. प्रवेश दारावर होमगार्डस व काही स्वयंसेवक त्यांना अडवीत होते. प्रवेशदारावर टेबले आडवी टाकून त्यांचा मार्ग रोखण्यात आला होता. चहा प्यायला जायचे आहे, लघवीला जायचं आहे असे कोणी सांगताच, जे काय करायचे आहे ते आवारात करा असं सांगून त्यांना आत लोटण्यात येत होतं. ' स्वखुशीने ' परिषदेला आलेल्या त्या शेतकऱ्यांची ही अवस्था पाहून थोडी करमणूक मात्र झाली.

पुढील वक्त्यांची भाषणे ऐकायची होती म्हणून पुन्हा आत जाऊन बसलो.

सौ. अनुसूयाबाई पांढरे अगदी आवेशपूर्ण बोलत होत्या. बायकांवर या कायद्यामुळे कसा अन्याय होणार आहे हे त्यांनी सांगितले. मुलाबरोबरच मुलीला मिळणाऱ्या वडिलोपार्जित इस्टेटीचा हक्कच नव्या कायद्यामुळे डावलला जाणार असल्याचे त्या आवर्जून सांगत होत्या. सीलिंगमुळे उद्‌भवलेल्या ' फारकत ट्रिक 'चा उल्लेख करून त्या म्हणाल्या, की यामुळे जमीन व नवरा दोन्हीही गमावले जाण्याची आमच्यावर पाळी येण्याची शक्यता आहे.'

त्यांच्यानंतर बोलायला उभे राहिले बोरगावचे श्री. आप्पासाहेब पाटील. धारिया पुण्याचे व परवाची फोरमची परिषदही पुण्यात झाली म्हणून पाटलांनी पुण्यावर तोंडसुख घेतले. पूर्वीचे दाखले देतांना ते म्हणाले ' तुकाराम, ज्ञानेश्वर यांचा छळ पुण्याने केला, 'ध' चा 'मा' करणारी आनंदीबाई पुण्याचीच. महात्मा गांधींना गोळी घालणारा नथूराम पुण्याचाच. धारियाही पुण्याचेच. धारिया येथे निवडणूकीला येतील तर त्यांची अनामत रक्कमही जप्त होईल हे त्यांनी लक्षात घ्यावे.'

श्री. साहेबराव पाटील यांनी नव्या कायद्याला विरोध करताना केंद्रीय व राज्य सरकारांच्या मंत्र्यांना एक इशाराच दिला, की असे कायदे जर सक्तीने लादले जाणार असतील तर मंत्र्यांना येथे फिरणे अशक्य केले जाईल. श्री. मोहिते यांच्यामुळेच सोलापूर जिल्ह्यात काँग्रेस जिवंत आहे असे सांगून ते म्हणाले, की त्यांना (मोहित्यांना) जर तिकीट नाकारले जाणार असेल तर त्यांच्यासकट सर्वच शेतकरी काँग्रेसबाहेर पडतील. त्यांच्याप्रमाणेच श्री. शिवाजीराव निंबाळकर यांनीही वरील प्रमाणेच इशारा दिला. श्री. मोहिते-पाटलांना तिकीट नाकारले गेले तर काँग्रेसने ती सीट गमावलीच असे समजा अशीही काँग्रेस श्रेष्ठींना समज देण्यात आली.

वक्त्यांनी कोणत्या पातळीवर जाऊन भाषणे केली ते यावरून सहज लक्षात यावे.

□

# बेलवंडी

सोलापूर व नगर, दोन दिशांना असलेले जिल्हे. सोलापूर जिल्ह्यातील सदाशिवनगरची 'शेतकरी परिषद' आदल्या दिवशी आटोपून दुसऱ्या दिवशी अहमदनगर जिल्ह्यातील बेलवंडी येथे गेलो. 'महाराष्ट्र भूमिहीन, शेतमजूर, गरीब शेतकरी परिषदे'चे दुसरे अधिवेशन तेथे होते. सदाशिवनगर व बेलवंडी या गावात जेवढे अंतर होते त्याच्या अनेक पटीने तेथे झालेल्या शेतकऱ्यांच्या दोन परिषदांमध्ये अंतर होते. सदाशिवनगरच्या 'शेतकरी परिषदे'त गरीब शेतकरी होते पण ते 'आयात' केल्याप्रमाणे वाटले. बेलवंडीच्या परिषदेला आलेले गरीब शेतकरी, भूमिहीन, शेतमजूर पोटाला चिमटा काढूला आल्याचे सहज जाणवत होते. तेथे ट्रक्स किंवा मोटारींच्या रांगा नव्हत्या. रेल्वेने किंवा पायी आलेले शेतकरी जास्त प्रमाणात होते. एस्. टी. च्या तीन बसेस हीच तिथे असलेली वहाने. संध्याकाळच्या वेळी बेलवंडीला पाहोचलो. मंडप भव्य होता पण 'शानदार' नव्हता. तेथील कार्यकर्ते कोणाला मारून मुटकून बसवत असल्याचे दृष्य बिलकूल दिसले नाही. परि-

षदेला येणारी मंडळी आपणहूनच मंडपाकडे जात होती. मोठ्या उत्साहानं घोषणा देत. अगदी आपल्या घरचं कार्य असावं अशा भावनेनं.

रात्री ८ वाजता परिषदेला आलेल्या प्रतिनिधींची सभा, मंडपात व्हायची होती. पलीकडील बाजूच्या गेस्ट हाऊसवर विषयनियामक समितीची बैठक चालू होती. त्या दिवशी रात्रीचं जेवण मिळणार नाही हे आलेल्या शेतकऱ्यांना माहीत होतं पण त्यांची विशेष कोणाला फिकीर होती, असं त्यासंबंधी विचारपूस केल्यावर आढळलं नाही. मंडपात बसलेल्यांची करमणूक करण्यासाठी शाहिरी पथके हाजिर होती. ' स्पीकर ' अगदी कर्कश आवाजात कोकलत होता. पण त्या करमणूकीलाही महाग झालेला गरीब शेतकरी वर्ग त्यात तल्लीन झाला होता. विषयनियामक समितीची बैठक रेंगाळली होती त्यामुळे प्रतिनिधींच्या सभेला उशीर झाला होता. थंडी रंगात येऊन चिमटे काढीत होती.

सुमारे दोन-तीन हजार लोक, फाटक्या मळकट चादरी किंवा क्वचित एखादा शेतकरी घोंगडी अंगाभोवती लपेटून थंडी अंगावर घेत होते.

सभेला बराच वेळ लागणार होता. मी मंडपात असलेले घोषणा फलक न्याहाळीत होतो.—

—' शेतमजूरांना बागायती भागात ६ रु. व जिरायती भागात ४ रुपये रोज मिळालाच पाहिजे. '

' जमीन हा दागिना नाही. हवा-पाणी यासारखी नैसर्गिक वस्तू आहे ! श्रमाचे संस्कार करून संपत्ती निर्माण करण्याचे साधन आहे. जमिनीवर मोकळेपणाने कष्ट करता येण्यासाठी स्वकष्टाने कसू शकेल एवढीच जमीन धारकाकडे ठेवून वरखड जादा जमिनीचे फेरवाटप झालेच पाहिजे. '

' ज्याच्या हाताला शेती-कामाचा घट्टा, त्याच्या नावावर जमिनीचा पट्टा. '

' मागून मिळत नसते — मिळवून घ्यावे लागते. '

मार्क्सवादी — मग ते ' लाल निशाण गट 'वाले असोत वा इतर कोणी, ते सारे पोथीनिष्ठच. तेव्हा त्यांच्या पोथीनिष्ठ पठडीतील ' साम्राज्यशाहीचा निषेध असो. ' ' भांडवलशाही व साम्राज्यवादी अमेरिकेचा निषेध ' वगैरे वगैरे नेहमीचेच घोषणा फलकही झळकत असतातच, तसे ते या मंडपातही होते.

घोषणा फलक वाचण्यात मी दंग झालो होतो. तेवढ्यात ' जमिनीचे फेरवाटप झालेच पाहिजे ' असा घोष करीत प्रतिनिधींच्या एका गटाने मंडपात प्रवेश केला.

परिषदेला आलेल्या लोकांशी बोलावं, त्यांचे प्रश्न समजावून घ्यावेत, त्यांची मते ऐकावीत म्हणून मी मंडळी हेरीत होतो. शहरी व ग्रामीण हे समाजाचे दोन घटक. त्यातच मी टेरिलिन कपडेवाला तर समोरचे लोक फाटके मळलेले कपडे घातलेले गरीब ग्रामीण. नाही म्हटलं तरी अशा वेळी त्यांच्याशी सुसंवाद साधण्यामध्ये कुठेतरी दरी निर्माण होते. सर्वचजण मोकळेपणाने बोलायला तयार होतातच

असे नाही. आपण अगदी त्यांच्याबरोबर मातीत, धुळीत बसलो तरीही. म्हणूनच प्रथम एका लेहंगा-शर्ट घातलेल्या तरुणाला गाठले. चेहऱ्याकडे, पेहरावाकडे पाहून तो काही इयत्ता तरी शिकलेला असावा असे सहज अनुमान काढता येत होते. एस्. एस्. सी. झालेला तो तरुण गेली तीन चार वर्षे बेकार आहे. घरची अगदी थोडी जमीन आहे, पण मोठ्या कुटुंबाचं त्यावर भागणार कसं? परवाच्या दुष्काळात त्याचे हात रस्ते बांधणीच्या कामात गुंतले होते. दुष्काळी कामामुळे थोडी मजूरी तरी मिळाली. एवढं शिकून तरी काय उपयोग आहे असं सारखं वाटत असल्याचं त्याने सांगितले.

त्याला थोडा दिलासा दिला. श्रमाचं महत्व कमी लेखू नकोस म्हणून सांगितलं. पण मन खात होतं. भरल्या पोटी उपदेश करणं ठीक असतं.

पुढे गेलो. चार-पाच लोकांचा एक गट बसला होता. 'काय मंडळी कुणीकडून आलात' म्हणून चौकशी करून बैठक मारून त्यांच्यात बसलो. सुसंवाद साधला गेला. 'स्टेट फार्मिंग कार्पोरेशन'च्या शेतावर काम करणारे शेतमजूर होते ते. तशी मजूरी थोडीच मिळते पण ती निश्चितपणे मिळते म्हणून इतरांपेक्षा ते समाधानी होते. त्यांच्यातील एकाने निसर्गाच्या अनिश्चितपणाला कंटाळून त्याच्याकडे असलेली दीड-दोन एकर जमीन विकून टाकली. आणि कार्पोरेशनच्या शेतावर शेतमजूर म्हणून नोकरी पत्करली.

जवळच एक मध्यमवयीन माणूस बसला होता तोही गप्पांत सहभागी झाला. एका साखर कारखान्यात रखवालदार म्हणून नोकरी करतो पण पगार अपुरा मिळतो. जमीन नाही, घर नाही अशी अवस्था. परवडत नाही म्हणून आठवीत शिकणाऱ्या मुलाला त्याने शाळेतून काढून टाकले. कुठे काही काम मिळेल पोटाला या आशेवर आहे. ओढाताण करून जगतो आहे.

एकेकाचे अनुभव मन सुन्न करीत होते. काळोखात उभ्या असलेल्या एका गांवढळ तरुणाला गाठले. बेलवंडीजवळचाच तो एक भूमिहीन. बायको, मुलगी आणि तीन लहान भाऊ यांचा उदरनिर्वाह करतो आहे. कधीतरी हंगामात शेतमजरी मिळते. नाहीतर विहीर खणण्याच्या वा मजूरीच्या इतर कामावर काम करून दिवस ढकलतो आहे.

पिंपळगावहून आलेला म्हातारा सोमा व त्याचे साथीदार माझे लक्ष वेधतात. सारेच भूमिहीन. निस्तेज, डोळ्यात आसवे आणून सांगतात – जगायचं कसं ही रोजचीच चिंता. अर्धपोटी तर रोजच राहावं लागतं. पण कधी कधी उपासही घडतो. धड कपडे नाहीत. अगदी उघड्यावर पडलो आहोत. तेही खरंच होतं. मंडपातील इतरांकडे फाटक्या चादरी तरी होत्या अंगाभोवती लपेटायला. पण म्हातारा सोम्या व त्याचे दोन साथीदार यांच्याकडे त्याही नव्हत्या. आपल्या पागोट्याच्या लांब शेंड्याने त्यांनी कानाची पाळे व मान यांचा थंडीपासून बचाव करण्याचा

प्रयत्न चालविला होता.

महादबा १९ मंडळी असलेल्या कुटुंबाचा प्रमुख, तीन एकर जमिनीचा मालक आहे. दरवर्षी शिरावर कर्जाचा बोजा वहातो आहे. त्याची तीन मुलं मजुरी करून त्याला हातभार लावतात. गेली ६ वर्षे खंड भरला नाही म्हणून पाणी कापलं गेलं आहे. या वर्षी पावसाने दगा दिला म्हणून मायबाप सरकारला थोडी दया आली म्हणून पाणी खुल झालं. नाहीतर हेही वर्ष कोरडंच गेलं असतं. महादबा संसाराचा गाडा कसातरी ओढतो आहे.

मुलाखती चालूच असतात. एव्हाना नेतेमंडळी स्टेजवर येऊन सभेचं कामकाजही सुरू झालेलं असतं पण तेथे लक्ष असतं कोणाचं ? भान येतं ते ' उठाव झेंडा बंडाचा उठाव झेंडा क्रान्तीचा ! ' या क्रांती गीतानं. व्यासपीठावरील कोणीतरी कार्यकर्ता त्याच्याबरोबरच मंडपातील सर्वांनाच ते गीत म्हणण्याचे आवाहन करतो.

गीत संपलेलं असतं. परिषदेचे अध्यक्ष कॉ. दत्ता देशमुख बोलायला उभे राहातात. आठ फेब्रुवारीला श्रीरामपूर येथे झालेल्या भूमिहीन, शेतमजूर, गरीब शेतकरी परिषदेच्या पहिल्या अधिवेशनापासूनचा आढावा घेणे आणि आंदोलनाची पुढली दिशा सांगणे यासाठी ते उभे राहातात. थोड्याच वेळात ते उपस्थित मंडळींचा ठाव घेतात. श्रीरामपूर ते बेलवंडी या मार्गक्रमणातील ' संघटनांतर्फे सामर्थ्य टप्प्याटप्प्याने वाढले असल्याची साक्ष म्हणजे परिषदेचे हे दुसरे भव्य अधिवेशन ' असे ते सांगतात.

— " भांडवली सधन शेतकरी वर्गांच्या वाढत्या आर्थिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक वर्चस्वाने ग्रासलेल्या ग्रामीण महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजूर, गरीब शेतकरी आदी कष्टकरी जनतेचा आवाज श्रीरामपूर अधिवेशनाने धिटाईने उठविला व त्यांनी स्वावलंबीपणाने स्वतःहाच्या पायावर उभे राहण्याचा निर्धार जाहीर केला. ' त्यांच्या या वाक्याला टाळ्या पडतात.

— ४ मार्च १९७० चा भूमिहीन, शेतमजूर गरीब शेतकरी यांचा सचिवालयावर गेलेला मोर्चा, त्यानिमित्ताने एकत्र आलेले व त्या मोर्चात सहभागी झालेले राजकीय पक्ष व त्यांचे कार्यकर्ते यांची भागीदारी त्यानंतर टिकू शकली नाही, याबद्दलचा खेद ते भाषणात प्रकट करतात.

— ' जमिनीवर प्रत्यक्ष अंगमेहनत करणाऱ्याला जमीन ' या तत्वावर जमिनीचे फेरवाटप करण्याच्या ठरावाला या मंडळींनी संमती दिली असली तरी या पक्षांच्या ग्रामीण संबंधांना या प्रकारचा लढा मानवणार नसल्याने त्यांनी हा मार्ग पत्करला असा टोला ते ' त्या ' पक्षांना हाणतात.

— परिषदेची संघटना उभारण्याच्या दृष्टीने १२, १३ जून रोजी झालेले सटाणा येथील कार्यकर्त्यांचे शिबीर; दुष्काळग्रस्त भागातील शेतमजूर, भूमिहीन यांना

ठिकठिकाणी काम, योग्य मजूरी मिळावी, कंत्राट पद्धती रद्द व्हावी. या सर्वांसाठी परिषदेच्या कार्यकर्त्यांनी आंदोलने केली व त्यांपुढे सरकारला नमावें लागून त्यापैकी कांहीची अंमलबजावणी करावी लागली. पण चांगली वृष्टी होताच कामे बंद करण्याचा सरकारी निर्णय आला. त्याविरुद्धची उग्र निदर्शने, मोर्चे यामुळे पुन्हा सरकारला नमावे लागून कामे चालू ठेवण्याचे कबूल करावे लागले. हे त्यांच्या भाषणातील कांही मुद्दे.

— 'पडी व जंगल जमिनीचे वाटप केल्याने ग्रामीण गरिबांची जमिनीची भूक भागू शकत नाही. त्याप्रमाणे कमाल मर्यादा खाली आणण्याचे कायदे करूनही हा प्रश्न सुटणार नाही. उत्पादनात येणारी तूटही दूर करता येणार नाही. जमिनीचे मूलभूत फेरवाटप व सहकारी पद्धतीने शेती करणे हाच ग्रामीण भागातील आर्थिक, राजकीय व सामाजिक कोंडी फोडण्याचा, व समाजाची समाजसत्तावादी पुर्नरचना करण्याचा एकमेव मार्ग आहे' हे त्यांचे परिस्थितीबाबसचे निदान त्यांच्या ठरावावरील भाषणात येते.

— 'ग्रामीण कष्टकऱ्यांनी आपले वैचारिक, संघटनांविषयक व कार्यक्रम विषयक स्वातंत्र्य, स्वावलंबित्व, जागरूकपणे जपत असतांना मध्यम शेतकरी समुदायांशी सहकार्याचे संबंध निर्माण करण्याचे धोरण कायमपणे ठेवले पाहिजे.' हा शेवटचा पण महत्वाचा मुद्दा ते पुढील दिशा दाखवितांना मांडतात.

दुसऱ्या दिवशीच्या खुल्या अधिवेशनांतील त्यांच्या भाषणाची चुणुक यावरून आलेलीच असते. बायाही पोरांना पाटकुळीला मारून येत असतात.

रविवार उजाडतो. आणि मंडपाकडे परिषदेला येणाऱ्या लोकांची लागलेली रीघ दिसू लागते.

सबंध दिवस परिषदेचे कामकाज चालणार असल्याने सकाळपासूनच जेवणाच्या पंगती पडू लागलेल्या असतात. १० वाजता ठरावांवर अधिवेशनांत चर्चा होणार असते. त्यापूर्वी हे सारे आटोपणे आवश्यक असते. जेवणाचा कार्यक्रम एकीकडे शिस्तबद्ध रीतीने चालू असतो. दुसरेकडे मंडळी एकमेकांशी ओळख करून घेण्यात दंग असतात. काही ठिकाणी रात्री मोडल्या गेलेल्या ठरावांवर चर्चा चालू असतात.. परिषदेला आलेले अनेक लोक ठरावावर बोलायला उत्सुक असल्याचे ते निदर्शक असते.

इकडे मंडपात मंडळींची करमणूक करण्यासाठी शाहीरमंडळी डफ घेऊन सज्जच असतात.

तानुबाई बर्डे. स्वत: एक शेतमजूर–परिषदेची कार्यकर्ती. श्रीरामपूरजवळील मालुजा–बुद्रुक गावची राहणारी. मोठ्या तडफेने आपल्या इतर दोन स्त्री साथीदार व एकदोन पुरुष साथीदारांसह उभी रहाते. 'हातात मशाल तेजाळला पूर्वेला लाल गोळा, पाझळूनी एकीचा विळा, धनिकांच्या त्या लावू गळा..' हे जोशपूर्ण गीत गात

असते. मंडपातील सर्वच शांतपणे ऐकत असतात.

गाणं होताच मी बाईंना भेटलो. रोज संध्यकाळी कुठेना कुठे तरी त्यांचे कलापथक शेतकऱ्यांचे मनोरंजन करीत हिंडत असते. हंगामात शेतमजूरी करायची एरवी डोक्यावरून मोळ्या वाहून न्यायच्या. पूर्वी ३ ते ४ आणे मजूरी मिळायची पण श्रीरामपूर अधिवेशनानंतर भुमिहीन, शेतमजूरवर्ग संघटित झाला. आता मजूरी वाढली आहे. राहण्याचे हाल अजूनही चालूच आहेत. त्यात त्या व त्यांचे साथीदार पडले आदिवासी जमातीपैकी. नदीच्या काठी सपर किंवा कोटी (म्हणजे झोपडं) उभारून रहायचं. मजूरी मिळाली नाही तर उपाशी पोटी राहावे लागे. जमीन घर मिळालं तर इतरांकडे कष्ट करण्यापेक्षा स्वतःच्याच शेतात त्यापेक्षा दुप्पट राबण्यातही खूप सुख मिळेल असं वाटतं पण आज तरी हे फक्त स्वप्न आहे. त्यापासून ती मंडळी खूप दूर आहेत. अजूनही उघड्यावरच पडली आहेत.

दहा वाजायला थोडा अवकाश असल्याने मिळेल त्या वेळात तेथे जमलेल्या अर्धं पोटी लोकांशी पोटभर बोलण्याची खूप इच्छा असते.

तिथेच काही वेगळे लोक त्यांच्या कार्यकर्त्यांसह उभे असलेले दिसतात. नगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील मिरजगावकडचे हे पारधी. सुधारलेल्या जगाशी त्यांचा संबंध येतो तो सुधारलेल्या लोकांनी त्यांना आपले उष्टे खरकटे देण्यापुरताच.

लिपण्या मासल्या भोसले; त्याचा मुलगा सुदाम लिपण्या भोसले. लोणीगावचा घ्यापचंद नोकऱ्या भोसले. त्याचा मेहुणा चमत्कार शोभ्या भोसले. चमत्कारचं नागडं पोर धान्या. घ्यापरचंदची बायको व तिच्या पदरात बांधलेलं तिचं खूप आजारी असलेलं चार महिन्याचं लेकरू, यांच्या कोंडाळ्यात उभा राहून त्यांची कर्मकहाणी ऐकत असतो. हे सारेच लोक जवळ जवळ अर्धनग्न असतात. लेकराला दवापाणी करण्याइतपतही पैसे नसतात. बायकापोरं तेथे आलेली असतात ती एखादा घास खायला मिळेल या आशेने.

पाल नावाच्या गोधडीच्या तंबूत जंगलाच्याकडेला राहायचे. खुरपणी कापणीच्या वेळी हंगामात मजूरी करायची एरवी दुसऱ्याचे उष्टे खाऊन जगायचे. जेव्हा काहीच काम मिळत नाही, तेव्हा पुरुष मंडळी पाखरं पकडतात व ती विकतात. तर बायका पोरं भीक मागतात.

शेतराखणीचे काम करतात तेव्हा शेतकरी त्यांच्या उप्तन्नाप्रमाणे धान्यात मजूरी देतो. पैसे तर केव्हातरीच दृष्टीस पडतात. धान्य मुळातच पायली दोन पायली मिळतं. किती दिवस पुरणार ?

पारध्यांच्यात एक पद्धत आहे. लग्न झालं, की मुलगा विभक्त होतो. मग बापाने मरेपर्यंत कष्ट करायचे. कष्ट तर त्यांच्या पाचवीलाच पुजलेले आहेत. त्यातून सुटका होणारच कशी. कालपरवापर्यंत त्यांना सुसंस्कृत समाजाने गावात यायची बंदी केली होती. अजूनही पोलिसांना ते प्रचंड घाबरतात. पोलीस दिसला, की

एखाद्या झुडुपात सश्याप्रमाणे लपतील. शेजारून जाणाऱ्याला त्यांचा थांगपत्ताही लागायचा नाही.

पूर्वी केव्हा तरी चोऱ्या करीत पण अजूनही इतर कोणीतरी चोऱ्या कराव्यात व पारधी पकडले जावेत असे होते. जिथे काम मिळेल तिथे पाठीवर संसार घेऊन जायचे. कोणी आसरा देत नाही. पूर्वी फारच थोडी मजूरी मिळे आता त्यात काही सुधारणा झाली आहे. पोरांना शाळा नाही शिक्षण नाही.


घ्यापचंदनं काही कर्ज काढून बैल घेतले आहेत. आपलं दैव अजमावण्याचा प्रयत्न करतो आहे. शेतमजूर परिषेदकडे जमीन मिळावी म्हणून अर्ज केला आहे. बिचारा त्या चिखलातून वर येणार आहे, की सावकाराच्या कर्जातच खोल गुरफटून जाणार आहे, अगदी गळ्याशी येईपर्यंत, हे फक्त काळालाच माहित !

केस दाढी वाढलेले, घाणीची पुटं अंगावर असलेले हे पारधी अजूनही गुलामगिरीत आहे, आपल्याच आसपास ते राहातात यावर विश्वासच बसू नये अशा अवस्थेत ते आहेत.

अंघोळीला पाणीही मिळत नाही. त्यामुळे उबग आणणारा वास त्यांच्या अंगाला यतो. त्यांनाही उष्टंमाष्टं खाण्याचा आता उबग आला असेल पण बिचारे हे सांगणार कोणाला आणि ऐकायला तरी कोण राजी आहे ?

दहा वाजल्यानंतर ठरावावरील चर्चेला आरंभ झाला. ज्यांना कोणाला ठरावावर बोलायचे असेल त्यांनी येथे नाव द्यावे असे जाहीर होताच. निरनिराळ्या

पृष्ठ ४४ वर



नलिनी अंबाडे

# ग्योयंदा, गोईंदा, गोऽइंदा !

मुंबईहून निघालेली मद्रास-मेल दिवसभर धावत असते. मध्यरात्रीच्या शांततेत फक्त चाकांचाच काय तो ठेका ऐकायला येत असतो. मद्रास येण्यास जेमतेम दोनच तासांचा अवकाश असतो. इतक्यात गाडी थांबते व पहाता पहाता तुमचा डबा अर्धा रिकामा होतो. 'कोणतं स्टेशन' म्हणत तुम्ही खिडकीतून बाहेर डोकावता तर दूरवर आकाशात पांढऱ्या शुभ्र दिव्यांची एक भलीमोठी शिडी चढत गेलेली दिसेल – इतकी उंच की ते दिवे अन् आकाशातले तारे एकमेकात मिळून गेलेले – दिवे वर गेलेत की तेजस्वी तारकांची ओळ खाली उतरलीय, क्षणभर प्रश्न पडावा. पहाटेचा चंद्र आकाशात जवळपास असला तर भास व्हावा की चंद्रावर जाण्यासाठी जादूचा झूला तर नाही हा ? बराच वेळ तुम्ही पाहातच राहाल. तेवढ्यात डबा मघापेक्षाही अधिक भरला गेला असेल. तुम्ही पाहू लागता, तो साऱ्यांची डोकी म्हणजे तुळतुळीत गोटे ! त्यामध्ये बायका देखिल...अगदी नुकत्याच तारुण्यांच्या उंबरठ्यावरच्या नवोढा देखील...तुळतुळीत गोटे...! तुम्हाला पाहायला कसंतरी वाटतं. तेवढ्यात गाडी हलते तशी सारेजण एक सुरात गजर करतात, 'ग्योयंदा, गोईंदा, गोऽऽइंदा !'

गाडी फलाटाबाहेर पडता पडता बोर्ड दिसेल तुम्हाला 'रेणिगुंटा जंक्शन !' तेथून सात मैलांवर तिरुपती गाव व त्या गावापासून २० मैल डोंगरावर 'तिरुमलै' देवस्थान. वीस मैल रस्त्यापैकी चौदा मैल निव्वळ घाट. तो तुम्हाला ४००० फूट उंच घेऊन जातो. त्यासाठी देवस्थानच्या सव्वाशे बसेस अक्षरशः चोवीस तास वर-खाली खेपा करीत असतात. सुरेख बस-स्टॅण्ड, स्वच्छ व मोफत धर्मशाळा, तीन रुपयात स्वतंत्र खोल्या, चहा-पाण्यासाठी देवस्थानची कॅन्टीन्स, गाडीवाल्यांकरिता बंगले, आणि खूप खूप. चार-सहा तास रांगेत उभे राहा पण कंटाळा तो म्हणून येणार नाही. दर्शनास फक्त दोन्ही हात जोडा – पैसा टाका किंवा टाकू नका. पंढरपूरप्रमाणे, पैसा टाकला नाही तर कुणी शिव्या पुटपुटणार नाही. प्रसन्नपणाने साष्टांग नमस्कार घालावा. सभामंडपात प्रचंड पितळी हंडा अधांतरी टांगून ठेवलेला आहे. त्याचे तोंड बंद आहे. त्याला म्हणतात हुंडी. इच्छा असेल, तर त्या हुंड्यात काहीही टाका. एका नया पैशापासून पुढे कितीही. कालच्या २७ ऑगस्टला वर्तमानपत्राच्या एकाच पुडीत शंभराच्या नोटा होत्या – फक्त एक

लाख वीस हजाराच्या – एक मुठी एक रकमी देवाला अर्पण. देवळाच्या बाहेर पडताना दारातच प्रसादाची खिडकी आहे. देवासमोर जमा होणाऱ्या धान्याची खास उसळ, भात, दोसे तयार करून नाममात्र किमतीस देण्यात येतात. लोक ते खरेदी करतातच, शिवाय चार-दोन 'लाडू' बरोबर गावी 'प्रसाद' म्हणून घेऊन जातात. नारळाएवढा, बदाम, पिस्ते, काजू घातलेला, वजनदार, बुंदीचा लाडू दोन रुपयास देवस्थानतर्फे विकतात. बस्स ! ह्या 'लाडू'जवळच आमची लेखाची गाडी अडली !

समाजवादी राज्यात 'गरीबी हटाव'च्या घोषणा रात्रंदिवस चालू आहेत. त्यासाठीच प्रत्येक मंत्री कसली ना कसली 'कपात' सुचवीत आहे. दीडशे रुपयाच्या कारकुनांना काढून 'नोकरकपात'– तिकडे मंत्र्यांची मंत्रिमंडळे वाढताहेत तो किरकोळ बाब ! 'दो या तीन' म्हणजे कुटुंब कपात ! वीजकपात, पाणीकपात, रेशनमध्ये धान्य कपात, आता पोस्टेज वाढल्याने टपाल कपात, भाडी वाढल्याने प्रवास कपात ! अशाच कुणातरी बुद्धिमान मंत्रीमहाशयांना वाटले की, तिरुपतीच्या नैवेद्यात अन् पूजाखर्चात का कपात नसावी ? झाले, उच्च पातळीवरून कुठूनतरी कशीतरी चावी फिरवली गेली व लेखणीच्या एका फटकाऱ्यासरशी बिचाऱ्या तिरुपतीवर अर्धपोटी राहण्याची वेळ आली. 'गरिबी हटाव' राज्यात, प्रत्यक्ष कुबेराला कर्ज देणारा वेंकटेश्वर तिरूपती त्याच्यावरच ही वेळ आली, अशा आंध्र राज्यात, की ज्याच्या प्रत्येक मंत्र्याची हजारो एकर शेती आजही आहे !

आपल्याकडेही रामाच्या मंदिरात सीता, हनुमान ह्यांच्या मूर्ती असतातच. त्याचप्रमाणे तिरुपतीच्या देवळातही अनेक देवळे आहेत. त्यांची यथासांग पूजा-अर्चा, अभिषेक, नैवेद्य देवस्थानची कमिटी करते. नैवेद्य पंचपक्वानांचा व मुख्य पूजा षोडशोपचारे. अर्थात पूजेच्या वेळी उपस्थितांत तो नंतर प्रसाद म्हणून वाटला जातो. रोज, १००१ रुपये देणगी देवून जोडीने स्वहस्ते स्पेशल पूजा करणारी धनिक मंडळी असतातच व प्रसाद त्यांनाच मिळतो. मूर्तीला अभ्यंगस्नान दुग्धस्नान–होमहवनात तूप–पूजासाहित्यात खारका, बदाम, सुपाऱ्या, चंदन, पंचामृत हे सारे तेथे आजही पाहायला मिळते. सरकारचे म्हणणे पडले, की, हा सारा अपव्यय आहे. पूजासाहित्यातील 'अनावश्यक' वस्तूंना फाटा देण्याची ऑर्डर निघाली. नैवेद्यात असणाऱ्या लाडूंचा आकार व वजनात ५०% कपातीचा हुकूम झाला. त्यामुळे दारावर यात्रेकरूंना 'प्रसादा'चे लाडू जे दोन रुपयास मिळत, ते लहान होऊन एक रुपयास झाले. अर्थात येथे बळजबरीचा प्रश्नच नसल्याने, कायद्याची पळवाट शोधणारा कुणीच नव्हता. ज्यांना चार लाडू न्यायचे असत, ते तेवढ्याच पैशात आठ लहान लाडू नेऊ लागले. प्रश्न उपस्थित झाला की सरकारची ढवळाढवळ कुठवर खपवून घ्यायची ?

तिरूपती – केवळ दक्षिणेतीलच नव्हे तर साऱ्या भारतातील पहिल्या क्रमांकाचे उत्पन्न असणारे प्रचंड देवस्थान. रोजचे – एका दिवसाचे निव्वळ उत्पन्न फक्त एक लाख रुपये. शिवाय देवस्थानतर्फे चालणाऱ्या अनेक संस्थाही फायद्यात –कारण सरकारी नोकरभरती, लालफिती, वशिलेबाजीचा कारभार तेथे नाही. एकच उदाहरण सांगते –यात्राकराचे ! पंढरपुरास, देहू आळंदीस अन् जेजुरीस दरडोई भरपूर टॅक्स वसूल केला जातो. त्यासाठी खास कारकून, तिकिटे-छपाई, टेंपररी नाके, तेथे चेकिंगला शिपाई, त्यासाठी ऑफिसर, त्याला जीपगाडी ह्यामध्येच अर्धे उत्पन्न जात असेल ! तिरुपतीच्या रेल्वेतिकिटातच एकेक आणा जादा आकारलेला आहे. बसेस तर देवस्थानच्याच ! किती सोपे !! तेव्हा, वार्षिक पावणेचार कोटींवर सरकारचा डोळा असल्यास नवल कसले. तिरुपती जरी मद्रासपासून ९० मैलांवर असले तरी आंध्रराज्याच्या हद्दीत असल्यामुळे हैद्राबादच्या हायकोर्टात दावा दाखल झाला. घटनेच्या १९,२५ व २६ व्या कलमांचा कीस पाडण्यात आला. न्यायमूर्ती वैद्य व श्रीरामूलू ह्यांचे निकालपत्र फारच सुरेख आहे. श्रद्धेला, भक्तीला काहीही मोजमाप नसते – तेथे किलोलिटरचे बंधन नको. षोडशोपचारे पूजा करावी, काय काय वस्तू किती किती असाव्यात हे शास्त्रात दिलेले आहे. सत्यनारायणाच्या साध्या पूजेतसुद्धा 'सव्वा' हे माप आहे. अशी यथासांग पूजानैवेद्य केला नाही तर फल मिळत नाही. तेव्हा, सरकारी हुकूम घटनेच्या १९,२५,२६ कलमांचा भंग करणारा आहे. आता प्रश्न आला लाडूंचा आकार व किंमतीचा. तेथे देवस्थानची तक्रार नाही, ना लोकांची तक्रार नाही, मग अनावश्यक कुडबुड कशाला ? ऑर्डर्स रद्द झाल्या.

सरकारच्या डोळ्यात खुपणारे आणखी एक कुसळ म्हणजे देवस्थानच्या उत्पन्नाचा मोठा भाग शैक्षणिक संस्थांवर खर्च होतो. तिरुपतीतर्फे अनेक शाळा कॉलेजे, संस्कृत कॉलेजे, पॉलिटेकनिक्स, लायब्ररीज चालविल्या जातात. खुद्द दिल्लीला तिरुपती कॉलेज चालविते – तिरुपतीची स्वतःचीच खास 'वेंकटेश्वरा युनिव्हर्सिटी' आहेच. विशेष म्हणजे वेदपठण, धर्मकृत्ये, लग्नमौंजी विधी, संगीत, शिल्पकला, नृत्य अशा विषयांच्या शिक्षणास 'राहणे-जेवणे फ्री' अशा शिष्यवृत्त्या आहेत. चालू काळात लोप पावत असणाऱ्या धर्मशिक्षणास तिरुपती तारत आहे. हे 'निधर्मी राज्यात' असे चालणे गैर नव्हे काय ? पण सध्यातरी नाईलाज झाल्याची कबुली सरकारने दिली. आता मूळ कायद्यातच सोइस्करपणे बदल करण्यात येत आहे, की देवस्थानचे उत्पन्न फक्त देवस्थानसाठींच. त्यामध्ये 'शैक्षणिक बाबी' येत नाहीत. तूर्त दिल्लीचे तिरुपती कॉलेज, दिल्ली विद्यापीठाचे ताब्यात देण्यात येत आहे – कालच्या सप्टेंबरपासून,

हे आत्ताच एकाएकी घडण्यास तात्कालिक निमित्त काय घडले ? तिरुपतीने आंध्रमधील चित्तूर, नलगोंडा व गोदावरी जिल्ह्यांमध्ये शाळांतील विद्यार्थ्यांना गीतापठण, पुराणे ह्यावर परीक्षा घेवून उत्तेजनार्थ बक्षिसे शिष्यवृत्त्या जाहीर केल्या. सदर योजनेच्या खर्चाला मान्यता देताना कुणीतरी विचार केला, की कायदाच

पृष्ठ ५४ वर

## हे काय गूढ आहे ?

'शहरातली घाण नि कचरा वाहून नेणाऱ्या लॉऱ्या जातात तरी कुठे ह्याचा तपास करा' – वरून ऑर्डर आली. लॉऱ्यांच्या इतक्या चकरा होऊनही शहरातला कचरा जिथल्या तिथेच राहातो याचा अर्थ काय ? ह्या सगळ्या लॉऱ्या जातात तरी कुठे ?...तपास सुरू झाला. अगोदरच्या एका कमिशनर साहेबांचा सर्व्हे तयार होता. त्यांत म्हटले आहे, की कचरवाहू ट्रक्स् दिवसाकाठी जास्तीत जास्त ६५० वेळा जा यें करू शकतात. तरीपण सर्वसाधारणपणे त्यांची ४५० वेळाच ये-जा होत असते. चालू महिन्यातील रेकॉर्ड पाहिलं तर ह्या ट्रक्स्नी तीन दिवस आघाडी मारली आहे असं दिसून आले. एक दिवस ८४४, एक दिवस ८९४ आणि एक दिवस तर ९२२ चकरा केल्याची नोंद आहे. आश्चर्याची गोष्ट अशी, की ट्रक्स्च्या एवढ्या चकरा होऊनही शहरातला ठिकठिकाणचा कचरा जशाचा तसाच कायम असल्याबद्दल लोकांच्या तक्रारी ह्याच दिवसात आल्या आहेत. अजूनही तक्रारी सुरूच आहेत. वास्तविक ह्या कचरा वाहू ट्रकवाल्यांना कार्पोरेशन-कडून प्रत्येक 'ट्रिप' ला २० रु. प्रमाणे पैसे मिळतात. कार्पोरेशनच्या मालकीच्या ट्रक्स् चालविणारांना देखील तेवढेच पैसे देण्यात येतात. मग ह्या ट्रक्स् जातात कुठे नि करतात काय हे गूढ काही उकललं नाही. कार्पोरेशनने आणखी १५० लॉऱ्या जास्तीच्या मिळवल्या आहेत असे कळते. त्या रस्त्यावर केव्हा दिसतात त्याची आता वाट बघायची !

## बंगाली चित्रपट-निर्मितीचा प्रश्न.

बंगालमधील चित्रपट निर्मितीचा धंदा एकाएकी बंद पडला असल्याचे फक्त वर्तमानपत्रावरूनच आपल्याला कळले असे पश्चिम बंग सरकारचे म्हणणे. पण ते योग्य नव्हे. वास्तविक एक चौकशी-कमिटी स्थापन करण्यात आली होती व तिने वेळोवेळी अहवाल सादर केले होते व त्यांत बंगालमधील चित्रपट निर्मितीच्या धंद्यातील अडचणींचे विवेचनही केले होते.

अशा वेळी मुंबई व मद्रासचे आदर्श समोर मांडण्यात अर्थ नाही. खरे म्हणजे शो–बिझिनेसमध्ये कला आणि मनोरंजन ह्या दोन्हींचा वेग सारखा असणे शक्य नाही. त्यामुळे येथील फारच थोडया कलात्मक चित्रपटांना लोकप्रियता मिळाली. पण मुंबई व मद्रासच्या तांत्रिक दृष्या सरस असणाऱ्या चित्रपटांचे मात्र सर्वसाधारण जनतेकडून भलतेच स्वागत होत असते कारण त्यांच्या आवडीनिवडी अगदीच सामान्य दर्जाच्या असतात. तिकडे सर्व परिस्थिती अनुकूल आहे व स्टुडिओदेखील अप-टु-डेट आहेत याचे मुख्य कारण तिकडील चित्रपटांचा खप मोठया प्रमाणावर

आहे. आता कलकत्त्यातील स्टुडिओ एका रात्रीत तर बदलू शकत नाहीत ना! म्हणूनच महाराष्ट्र, ओरिसा व आसामप्रमाणे पश्चिम बंग सरकारनेदेखील ह्या बुडत्या धंद्याला मदतीचा हात दिला पाहिजे.

पश्चिम बंगालमध्ये करमणुकीवरील कर गेल्या २० वर्षांत दुप्पट झाला आहे. परंतु ह्या धंद्याला मदत म्हणून कधीच काही सवलती दिल्या गेल्या नाहीत. यामुळे कलकत्त्याचे काही लोक असे सुचवू इच्छितात की प्रत्येक स्टुडिओची परिस्थिती सुधारण्यासाठी काही एक रक्कम सरकारने देणे आवश्यक आहे. अधिक सिनेमा-गृहांसाठी लायसन्स देऊ करावे, नवी सिनेमागृहे बांधून काढावीत आणि चित्रपट निर्मितीमध्येही आर्थिक बाजूला हातभार लावावा — केवळ कलात्मक चित्रपटांचे बाबतीत नव्हे, सर्वच!

रेडिओवरदेखील दक्षिण भारतीय चित्रपट संगीतासाठी रोज दीड तास राखून ठेवलेला असतो पण बंगाली चित्रपट संगीतासाठी कोणतीच वेळ ठरलेली नाही. बंगाली चित्रपटांना पुढे आणण्याचे कामी सरकारही उदासीन आहे आणि आकाश-वाणीदेखील!

## आता मात्र अतिरेक झालाय्!

कलकत्त्याच्या गैरसोयींसमवेत जीवन जगत आलेल्या लोकांना येथील कार्पोरेश-नच्या कृपेमुळे भलतीच सहनशक्ती प्राप्त झाली आहे. ह्या गैरसोयींची जबरदस्त-किंमत द्यावी लागत असूनही लोक बिचारे चकार शब्द काढीत नाहीत. बाकीच्या गोष्टी सोडाच पण रस्त्यांची अवस्था अशा थराला जाऊन पोहचली आहे, की बोलण्याविणा गत्यंतरच नाही. मुसळधार पावसामुळे सर्व रस्त्यांवर गुढघ्याइतके पाणी जमते आणि ते कित्येक तास तसेच राहाते हे नेहमीचेच आहे. पण मध्यंतरी झालेल्या भयंकर पावसामुळे जेथे पाणी कधी जमत नव्हते अशाही विभागांमधून रस्त्यांवर तळी निर्माण झाली. त्यांत कचरा नि सर्व प्रकारची घाण तरंगत होती.

ह्या परिस्थितीसाठी कार्पोरेशनला नावे ठेवण्यात अर्थ नाही. आमच्या नगर-पित्यांनी नुकतीच गटारे स्वच्छ करवून घेतली होती हे विसरता येत नाही. CMDA तर नवीनच आहे ह्या बाबतीत. त्यांना रस्त्यांची वाईट अवस्था दिसताच त्यांनी कलकत्ता सुधारण्याच्या जाहिराती फडकवण्यास सुरुवात केली व जनतेला निक्षून-सांगितले की ऑक्टोबर १९७० ते मार्च १९७१ ह्या कालावधीत केवळ कलकत्ता सुधारण्यासाठी १४ कोटी रुपयांचा चुराडा झाला आहे. वर्तमान पत्रात येणाऱ्या व सिनेमागृहात दाखवल्या जाणाऱ्या CMDA च्या जाहिराती पाहून लोक डोळे चोळतात...तरीसुद्धा ही नवी कमिटी कदाचित् जनतेच्या आशा सफल करू शकेल व कार्पोरेशनप्रमाणे केवळ आश्वासने न देता कृतीकडे अधिक लक्ष पुरवील असे समजण्यास हरकत नाही.

□ □ □

रवींद्र पिंगे

शतपावली

# नारायण हरी आपटे

कुणाच्या हाताने कुणाचं भाग्यचक्र फिरेल, आणि एकदा गतीमान झालेलं भाग्य-चक्र पाण्यातल्या मासोळीसारखी केव्हा कशी दिशा बदलेल, हे जर माणसाला सांगता आलं असतं तर मग आणखी काय हवं होतं ? सगळी सुखं मग कशी आपण आपल्या ...ात ओळीनं बांधून ठेवली असती. समाधानाची निरांजनंही मग घरोघर तेवली असती. समृद्धीचा लख्ख प्रकाश पडला असता. पण तसं होत नाही. घडणारं चुकत नाही. कार्यकारणभाव कसाही जोडा, भाग्यचक्र म्हणून एक तर्कातीत गोष्ट शिल्लक उरतेच. कुणाचा तरी अदृश्य हात लागतो. भाग्यचक्र गतीमान होतं. कधी ते भिंगरीसारखं जागच्या जागीच गरगरतं. कधी पाखरासारखी सरळ दिशा धरतं. कधी भुंग्यासारखं उलटं फिरतं. कधी रहाटासारखं उलटसुलट फिरतं.

नारायण हरी आपटयांचं भाग्यचक्र असंच उलटसुलट गरगरत होतं. त्यांनी खूप खस्ता काढल्या. चिक्कार वणवण केली. रग्गड लिहिलं. भरपूर भलं म्हणवून घेतलं. लोकप्रियतेचं दुष्प्राप्य वैभव भोगलं. आर्थिक व्यवहारात हात पोळून घेतले. निव्वळ बाळबोध लेखणीच्या बळावर गोळा केलेल्या शेतीवाडीचं गांधीवधानंतरच्या जाळपोळीत भस्म झालेलंही पाहिलं आणि आपण जीव तोडून सांगितलेला सुखाचा पौष्टिक मुलमंत्र वाचून त्याबरहुकूम मंगल संसार करणारी आज्ञाधारक जोडपी पाहून कृतार्थतेचे धनी झाले. लेखक म्हणून त्यांनी डोळयांसमोर एक गणित बांधलं होतं. त्याप्रमाणे आत्मप्रेरणेने आणि आत्मवंचना न करता, त्यांनी ओळीने पासष्ट वर्षं लेखनाचा मळा शिंपला, हे काय कमी झालं ? रोज पहाटे कोंबडा आरवायच्या अगोदरच ओळी आखलेले कागद पुढयात घेऊन ते बसायचे आणि आपल्या कापऱ्या अक्षरात मजकूर उतरून काढायचे. सोळाव्या वर्षी 'माझी शिक' ही त्यांची पहिली कथा 'करमणूक'मध्ये प्रसिद्ध झाली. तेव्हापासून अगदी कालपर्यंतचा म्हणजे पासष्ट वर्षांच्या लेखनयज्ञाचा सरळ हिशोब निघतो.

बोधेच्छु कादंबरीलेखन करून उमेदीच्या काळात त्यांनी ठीक अंगासरशी संसार केला. लेखणीवर जगण्याची हिंमत शंभरात एकाला होत नसायची त्याकाळात. उच्च शिक्षणाचा टिळा न लागलेल्या नारायण हरींनी परिस्थितीपरत्वे स्वतःला

साहित्याच्या अथांग सागरात झुकांडून घेतलं. तिथे त्यांनी यथेच्छ पेवणी केली. साहित्यिकांची पंगत गाठली. मुदलात हे शस्त्रधारी क्रांतिकारक. शस्त्रविद्येच्या निमित्ताने जयपूर–जोधपूर वगैरे राणा प्रतापसिंगाच्या भूमीत ह्यांनी रापाराप केली. हाती काही लागलं नाही तेव्हा कादंबरी लेखनाकडे वळले. मात्र एकदा वळले ते इतके चांगले रमले, की पुन्हा मागे वळून म्हणून कसं ते त्यांनी पाहिलं नाही. 'किर्लोस्कर – खबर'चे ते आद्य सहसंपादक. उद्यम, उत्कर्ष, आत्मोन्नती वगैरे अद्भत ध्येयावळ त्यांना मानवली. इतकी, की आत्मोत्कर्ष साधण्यासाठी त्यांनी 'मधुकर' नावाचं मासिक स्वतःच चालू केलं. अर्थात, ते कोसळलं. त्यांनी छापखाना चालवला. 'आपटे आणि मंडळी' हे पुस्तकाचं दुकान आप्तांच्या सहाय्याने थाटलं. दुष्ट आणि सज्जन ह्यांच्या झगडयात सत्प्रवृत्तींचाच सात्विक विजय अखेरीस वाढून ठेवलेला आहे ह्या संदेशाकडे पाटाच्या पाण्यासारखी बिनचूक वाहात येणारी कथासूत्रं धोपटमार्गी पद्धतीने लिहीत गेल्यामुळे त्यांना लोकप्रियताही खांडेकर – फडक्यांइतकी नाही, तरी त्यांच्या खालोखाल जरूर लाभली. 'गृहसौम्य' ह्या त्यांच्या पुस्तकाच्या बारा आवृत्या खपल्या आहेत, हे एका आवृत्तीतल्या बारा प्रती उठविताना नाकेनव आलेल्या लेखकांनी न विसरलेलं बरं. सुखाचा मुलमंत्र, आम्ही दोघं, सुगरिणीचा संसार, ह्यांच्या प्रत्येकी सात-सात आवृत्या खपल्या ह्याचं कारण डोळयांसमोर हरीभाऊ आपटयांचा कित्ता ठेवून स्वेच्छेने आखून घेतलेल्या सोईस्कर मार्गाने ते चालत गेले. लग्नामुंजीत स्वस्त आणि काही तरी रितीचं सांगणारी पुस्तकं भेट देण्याची जेव्हा टूम जोरात होती तेव्हा नारायण हरींच्या उपदेशावगुंठीत स्वस्त आणि सोईस्कर पुस्तकांना चलती लाभली होती. किंबहुना सुशिक्षित महाराष्ट्रात एक काळ असा येऊन गेला, की लग्नकार्य उपटलं की वधुवरांवर ना. ह. आपटयांच्या सात्विक पुस्तकांचा अहेरावगुंठीत प्रेमळ मारा करायचा! त्यांच्या 'न पटणारी गोष्ट' ह्या कादंबरीवर 'कुंकू' हे प्रभावी 'प्रभात' चित्र निघालं. त्या चित्रपटावर सिनेमावाल्यांनी गाडयामाडया केल्या. शांता आपटेचं भाग्य तेव्हापासूनच फळफळलं. केशवराव दात्यांना सिनेमाच्या क्षेत्रात झेंडा रोवायला जागा सापडली. चित्रपटसंस्थेला शान प्राप्त झाली. पण तो चित्रपट लिहिणाऱ्या नारायण हरींना काय सुटलं? तर, जेमतेम पाचशे रुपयांचा तीर्थप्रसाद! मात्र एक गोष्ट लाखमोलाची झाली. आपटयांच्या लेखकपणाचं शिंग मोठ्या टिपेत वाजलं. भाग्यरेषा, कुंकवाचा धनी, उमज पडेल तर, हे सारे चित्रपट त्यांच्याच कथाकादंबऱ्यांवर बेतलेले होते. प्रभातचा 'अमृतमंथन'ही त्यांचाच चित्रपट होता. 'सिंहगड' त्यांचाच होता. म्हणजे मूकपटांच्या जुन्या जमान्यापासून अगदी आजच्या घटकेपर्यंत नारायण हरींच्या गोष्टींना रुपेरी पडद्यावर चांगली चळचळीत मागणी होती. तसेच हेसुद्धा मुद्दाम नमूद केलं पाहिजे की कोणे एके काळी आपटयांना मासिकांच्या संपादनात मदत करणाऱ्या कविवर्य

शांताराम आठवले ह्यांनी स्वतःच्या चलतीच्या काळात नारायण हरींना चित्रपट सृष्टीत हात देण्याची दुर्मिळ अशी थोर कृतज्ञताबुद्धी दाखवली होती. शांताराम आठवले आणि ना. बा. कामत नसते, तर आपटयांचं तारू निव्वळ गोते खात भरकटलं असतं.

अशा गुणी आणि तत्वनिष्ठ लेखकाची त्याच्याच कर्माने का होईना, पण मराठी माणसाच्या दुनियेत किती परवड व्हावी ह्याची काही सीमा? त्यांनी म्हणे एक दत्तक मुलगा घेतला. तो नांदला नाही. इंदूरला निघून गेला. दुकानाच्या फळचा आवरत्या घेण्याचीही त्यांच्यावर पाळी आली. कोरेगावला निंबवृक्षांच्या शांत सावलीत आयुष्याची सायंकाळ काढायला हे गेले पण तिथे जाळपोळीचा भोग उभा राहिला. कोर्टाच्या डिकऱ्या आल्या. प्रसंगी पोटमाळ्यावर लपावंही लागलं. दुसरं गत्यंतरच नव्हतं. त्यानंतर एकदा आमच्या रांगणेकरांची नाटक कंपनी कोरेगावात खेळ करायला गेली होती. नारायण हरी प्रत्यक्ष नाटकवाले नसले तरी त्यांचं नि मोतीरामशेठचं गोत्र एकच. तेव्हा लेखक आपटयांनी, लेखक रांगणेकरांना चहाचं आमंत्रण दिलं. रांगणेकर आपटयांचा चहा घेऊन मुंबईला परतले. ही गोष्ट पंधरा वर्षांपूर्वीची असावी. अस्मादिकांचा एक पाय तेव्हा सतत नाटक मंडळीच्या बिऱ्हाडात असे आणि एक हात असे गोपाळकृष्ण भोब्यांच्या गळयात! तिथे गप्पा मारताना रांगणेकर, नाटक कंपनीच्या मालकाला तोंडावर सतत वागवावा लागतो तो अभेद्य मुखवटा दूर करून कळवळून म्हणाले, 'अरे बाबा, काय रे त्या ना. ह. आपटयांची परिस्थिती! देवा-देवा! मी शपथेवर सांगतो हं, खोटं सांगत नाही, त्या कोरेगावात तो म्हतारा लेखक एका खोपटात कमालीच्या कंगाल स्थितीत राहातोय. घरात इतकं परमावधीचं दारिद्र होतं की त्यांनी मला जो चहा दिला, त्याला दूध तरी त्यांनी कुठून आणलं असेल देव जाणे! काहीतरी करा रे त्या म्हाताऱ्यासाठी; मिळू देत त्यांना दोन पैसे.' अस्मादिक त्यावेळी सचिवालयातही तिरंदाजी करीत असत. आम्ही किल्ल्या फिरवल्या, हरी नारायण आपटे म्हणून म्हणतात ते हेच असा वरिष्ठांचा निरुपद्रवी भ्रम करून दिला आणि कोरेगावच्या खोपटात कंगाल अवस्थेत जिणं ढकलणाऱ्या नारायण हरींना दीड की दोन सहस्त्र रुपयांचा चेक मदतीदाखल रवाना केला. साहित्यसेवेबद्दल मिळणारा हा सरकारी गोग्रास आपटयांना अगदी अखेरपर्यंत दरमहा मिळत होता.

अशा ह्या आर्थिक चक्रव्यूहात कुचंबून पडलेल्या आपटयांना डोळे भरून पाहाण्याचा चमत्कारिक योग साहित्य संघात दहा-बारा वर्षांपूर्वी आला. सत्तरी पार केलेला लिहिता लेखक म्हणून संघाने त्यांना मानपान करून संघदिनाचे महनीय प्रवक्ते म्हणून भाषण करायला बोलावलं होतं. श्रोतेही आदराच्या भावनेने जमले. त्या सर्वांच्या उत्साहावर आणि संघाच्या औदार्यावर आपटयांनी घडाभर थंड

पाणी ओतलं, कारण आपल्या भाषणात त्यांनी समस्त साहित्यिकांना पाचक संदेश असा दिला, की त्यांनी शहरवस्ती सोडून खेड्यात जावं आणि शेती करावी!"
"चला निसर्गाकडे" हा गांधी, टॉलस्टॉय, थोरो वगैरे थोर मंडळींचा संदेश समस्त शहरवासीयांना होता. आपटे तितके थोर नव्हते. त्यांना स्वतःच्या जातभाईंचा स्वार्थ आठवला. स्वतः लेखक असल्यामुळे त्यांनी लेखकांचंच तेवढं भलं चिंतिलं आणि त्यांच्या एकठ्ठा ग्रामिणीकरणाचा घणाघाती घाट घातला. पुढे आपट्यांचं ते-भाषण बरेच दिवस चेष्टेचा विषय झालं होतं. पूर्वीही त्यांची भाषणं असाच अभावित विनोदाचा शिडकाव करीत. आपण कादंबऱ्यांची रचना कशी करतो हे सांगायला ते शाळेत आले होते. त्यांनी हातातल्या खडूने फळ्यावर मध्यभागी रेघ ओढून फळ्याचे दोन भाग केले. एका भागात नायक नायिकेची नावं टिपली दुसऱ्या भागात खलपुरुषांची नावं लिहिली. आणि त्या जोड्यांचे तणाव कसे कसे वाढत गेले, कथेत पेचप्रसंग कसे जमत गेले, वगैरे सर्व भारूड त्यांनी बाणांच्या सहाय्याने दाखवलं! मर्ढेकरी साहित्यशास्त्राची चिरफाड करणाऱ्या साहित्यसर्जनांच्या विद्वत्जड लेखात आज ज्या अगम्य आकृत्या वगैरे दिसतात, त्यांची गंगोत्री नारायण हरींच्या त्या शालेय बौद्धिकात पोराटोरांनी काणाडोळा करीत पाहिलेली आहे! वास्तविक पाहाता ललितलेखनामागच्या प्रक्रियांचा शास्त्रोक्त अन्वय लावणं ही आपट्यांच्या पायाखालची वाट कधीच नव्हती. पण फडक्यांच्या 'प्रतिभा-साधन" वाचनाचा त्यांच्यावर झालेल्या प्रक्रियेचा तो एक लुटूपुटूचा उद्रेक होता, इतकंच. तिथेही आपट्यांचं हसू झालं.

पुन्हा त्यांची गांठ साताऱ्याच्या संमेलनात पडली. ते स्वागताध्यक्ष होते. काका गाडगीळ अध्यक्ष होते. वास्तविक पाहाता हे दोघेही एकाच जीर्ण कालखंडाचे चिरे. पण काकांचं शैलीदार व्यक्तिमत्त्व चिरेबंदी दिपमाळेसारखं होतं. त्याला स्वतःचा डौल होता. ताठा होता. शुचिर्भूतपणा होता. साहित्याच्या प्रांगणात आपण आहोत ह्यांचं त्या व्यक्तिमत्त्वाला सतत भान होतं. विशेष म्हणजे त्यांना प्रकाशाचे झरोके होते. सर्वांच्यामध्ये, पण सर्वांपेक्षा उंच असं काकांचं बाळबोध व्यक्तिमत्त्व होतं. नारायण हरी साफ गावठी प्रत होती. हलाखीमुळे असेल, अगर समाजाच्या नीतिमत्तेचे काटे नीट लावून देणारे आपण घड्याळजी आहोत ह्या कल्पनेने पछाडल्यामुळे असेल, किंवा हरी नारायणांच्या तसबिरीत स्वतःचं रूप शोधण्याचा यत्न केल्यामुळे असेल, ते काहीच्या काही जुनाट आणि बेंगरूळ भासले. स्वागताध्यक्षाच्या पदावरूनही त्यांनी भलतंच बोधवादी चऱ्हाट वळलं. सोपपत्तिक श्रोत्यांना त्यांचं भाषण ऐकणं अक्षरशः असह्य झालं. त्यावेळी फक्त त्यांच्या म्हातारपणाची पुण्याई त्यांच्या मदतीला धावून आली, एरवी निभावून नेणं त्यांना कठीण होतं. हा झाला संध्याकाळचा प्रकार.

दुसऱ्या दिवशी सकाळी विटके, मळकट कपडे घातलेली त्यांची शिडशिडीत

म्हातारी मूर्ती मंडपाबाहेरच्या हिरवळीवर तोंड उघडं टाकून एकटीच पिरंगत होती. लोक त्या बुद्ढेबोवांना टाळीत होते इतकंच नव्हे तर स्वतःला साहित्यिक म्हणवणारे सुद्धा त्या तपोवृद्धाशी हस्तांदोलन करू इच्छित नव्हते! शाळकरी पोरांनी दत्तकवी सुधांशूंच्यासुद्धा पुन्हा पुन्हा स्वाक्षऱ्या घेतल्या, पण नारायण हरींच्या, की ज्यांनी ह्या अकुरांच्या उन्नयनाचं ओझं आजन्म डोक्यावर वागवलं, त्यांच्या जवळपाससुद्धां ही मुलं फिरकली नाहीत! पाठीमागे अजिक्यताऱ्याची अजस्त्र फत्तरी फ़डा उभी आहे; धुक्याच्या विरळ थरावर सोनेरी उन्हं पसरली आहेत आणि त्या उन्हात एक कृश यष्टीचा म्हातारा एकाकी लेखक तोंड उघडं टाकून कुणी आपली विचारपूस करेल काय म्हणून त्या घोळक्यांतून एकटाच आशेने हिंडतो आहे– छे! त्या काळीज पिंजून काढणाऱ्या प्रसंगाची आठवणही नको. बोध करण्यात ज्यांची लेखणी कृतार्थता पावली त्या नारायण हरी आपटयांच्या त्या शेवटच्या भयाण स्मृतिचित्रावरून बोध घेण्यासारखं बरंच काही आहे, एक : गरजू म्हातारपण हा शाप आहे. एक तर माणसाने गरजू तरी नसावं किंवा म्हातरं तरी नसावं. गरजू म्हाताऱ्यांच्या आशीर्वादाची किंवा शापाची तर सोडाच, पण नुसत्या निरुपद्रवी अस्तित्वाचीसुद्धां दमात असलेल्या पिढीला फिकीर नसते. गरजूपणाचा गंज चढला की पदरी पुण्याई असलेल्या माणसाचं सुद्धां अवमूल्यन होतं! दोन : आपल्यापेक्षा ताकदवान माणसं देवाच्या ह्या दरबारात आहेत हे जाणून निष्कारण ओझं वाहू नये! तीन : लोकांचं लक्ष असो वा नसो, सतत ग्रंथलेखन करून लेखकाने आपल्या पिछाडीला अजिक्यताऱ्याच्या फत्तरी कडयासारखी पुण्याई उभी करावी आणि पिरंगण्याची आशाळभूत कळा न आलेली शतपावली टक्क पडलेल्या सोनेरी उन्हात शांतपणे घालावी!



# चाकावरचे विचार

श्री. मा. भावे

## हिंदू संस्कृती व उद्योगयुग

विसाव्या शतकाच्या मध्यावर आशियातील राष्ट्रे वसाहतवादाच्या जोखडापासून मुक्त झाली आणि आर्थिक विकासाच्या एका नव्या प्रयोगाला सुरुवात झाली. पश्चिमेकडील पाकिस्तानापासून पूर्वेकडे उत्तर कोरियापर्यंत प्रत्येक नवस्वतंत्र राष्ट्राने आपापल्या सामाजिक व सांस्कृतिक स्वभावानुसार विकासाचा आलेख रेखाटण्यास आरंभ केला. याला सुमारे पाव शतक झाले. साहजिकच झाल्या विकासाचा आढावा घेण्यास योग्य काळ आल्यामुळे निरनिराळ्या राष्ट्रांनी आजवर केलेल्या औद्योगीकरणाचे, कृषि-प्रगतीचे, राजकीय विकासाचे सिंहावलोकन राष्ट्र-धुरीण करू लागले आहेत.

सिंगापूर देशाचे पंतप्रधान ली क्वान यू यांनी केंब्रिज विद्यापीठात केलेल्या एका भाषणात असाच आढावा घेण्याचा प्रयत्न केला. त्यांनी या आशियाई राष्ट्रांचे दोन गट केले. भारत, पाकिस्तान, सिलोन, ब्रह्मदेश, थायलंड, मलेशिया या राष्ट्रांचा दक्षिण आशियाई गट व चीन, व्हिएटनाम, कोरिया, कम्बोडिया इत्यादी राष्ट्रांचा पूर्व आशियाई गट. या दोन गटातील राष्ट्रांच्या विकासांची तुलना करून 'लीं'नी असा निष्कर्ष काढला, की पूर्व आशियाई राष्ट्रांचा विकास दक्षिण आशियाई राष्ट्रांच्या विकासापेक्षा अधिक वेगाने होत आहे.

याचे, आपल्या मते, कारण सांगताना ली क्वान यू म्हणाले की दक्षिण आशियाई राष्ट्रांत हिंदू संस्कृतीचे प्राबल्य आहे. ही संस्कृती फार सौम्य आहे. समाजाच्या व्यक्तीकडून अपेक्षा हिंदू संस्कृतीत फार कमी आहेत. अशा संस्कृतीत उद्योग युगास आवश्यक असणारी शिस्त, वेळ पाळणे, कार्यकौशल्य इत्यादी मूल्ये जोपासणे कठीण होते. नवी मूल्ये व वर्तणूक यांचा अंतर्भाव या जुन्या संस्कृतीत झाल्यावाचून औद्योगीकरण होणार नाही.

'लीं'नी वरील विवेचनात भारताबरोबरच इतरही काही राष्ट्रांचा समावेश दक्षिण आशियाई गटात केला आहे.

हिंदू संस्कृतीमुळे औद्योगीकरणास अडथळा कसा येतो याची चिंतनीय मीमांसा, केवळ भारतापुरती, श्री. नैपॉल यांनी आपल्या An Area of Darkness या पुस्तकात केली आहे.

चातुर्वर्ण्य हे हिंदूसंस्कृतीचे अविभाज्य अंग आहे. वर्ण हा जन्माने ठरतो व जन्म

ईश्वरेच्छेवर अवलंबून आहे. मनुष्याचे ऐहिक कर्तव्य त्याच्या वर्णावरून ठरते. त्यामुळे ते ठरीव कर्तव्य पार पाडण्यासाठी माणूस ईश्वराला बांधील आहे, समाजाला नाही. साहजिकच एखाद्या व्यक्तीने तिच्या कामात कसूर केल्यास त्या व्यक्तीला जाब विचारण्याचा अधिकार कोणत्याही ऐहिक संस्थेला नसून फक्त ईश्वराला आहे. असे असल्याने कर्तव्यपरायणता हा औद्योगिक समाजाला आवश्यक असणारा सद्‌गुण बाजूला पडला.

चातुर्वर्ण्य वरिष्ठ वर्णांच्या वर्चस्वाला धक्का लागू नये म्हणून टिकवून धरण्यात आले आहे, असे अनेकदा म्हटले जाते. ते खरेही असेल. परंतु चातुर्वर्ण्य टिकविण्यात वरिष्ठ वर्णांचे आर्थिक हितसंबंध कितपत गुंतले आहेत, हे तपासले पाहिजे. उच्च वर्णांनी अस्पृश्यांना व खालच्या जातींना अपमानास्पद वागणूक दिली हे खरे, पण त्यात आर्थिक पिळवणुकीचा भाग किती होता ! खालच्या जाती व अस्पृश्य यांचेही काही हितसंबंध चातुर्वर्ण्याशी निगडित नव्हते काय ?

कर्तव्य-परायणता हा कठोर सद्‌गुण आहे. चातुर्वर्ण्य नसते तर आपली कार्यक्षमता व कर्तव्य-परायणता सिद्ध करण्याच्या कठोर कसोटीला प्रत्येक व्यक्तीला उतरावे लागले असते. चातुर्वर्ण्य चालू ठेवण्यात ही कठीण परीक्षा टाळण्याचा तर प्रत्येक व्यक्तीचा हेतू नव्हता ना ? ◻

## भारत-चीन युद्ध

भारत-चीन सीमायुद्ध २० ऑक्टोबर १९६२ रोजी सुरू झाले. त्यापूर्वी चीनने भारतीय भूमी बेकायदेशीरपणे बळकाविलेली होती. या अपहृत भूमीतून चीनने नेफा व लडाख या उत्तर सीमेच्या पूर्व-पश्चिम टोकांवर हल्ला चढविला. भारतीय सैन्य बेसावध असल्याने मागे हटले. त्यानंतर काही दिवस युद्ध थांबले होते. १६ नोव्हेंबर रोजी चीनने नेफा भागात भारतीय सैन्यावर पुन्हा हल्ला केला. भारतीय सेनेचा निर्णायक पराभव होऊन सैन्य मागे सरकले. २१ नोव्हेंबर रोजी चीनने अचानक युद्धबंदी घोषित करून १ डिसेंबर १९६२ पासून नेफाभागातून आपण आपले सैन्य परत घेणार असल्याचे जाहीर केले. भारत-चीन युद्धाची सर्वमान्य हकीकत स्थूलमानाने अशी आहे.

पराभवाचे पितृत्व ही न झेपणारी जोखीम असते. साहजिकच भारतीय सेनानींनी विश्वामित्री पवित्र्याने हात झटकण्यास सुरुवात केली. ले. ज. कौल व ब्रिगेडियर दळवी या दोघांनीही आत्मकथनातून पराभवाची जबाबदारी कमी करण्याचा अगर संपूर्णपणे टाळण्याचा प्रयत्न केला. त्यांचे मुख्य मुद्दे साधारणतः असे होते : –भारतीय सैन्याची अद्ययावत् तयारी करण्याकडे सरकारने स्वातंत्र्यापासून दुर्लक्ष केले होते. चीनशी लढावे लागेल अशी कल्पना सैन्याला नव्हती. राजकीय कारणांनी सैन्याला

चीनशी लढण्यास सरकारने भाग पाडले, चीनशी कोठे व केव्हा लढावे याचे स्वातंत्र्य सेनानींना राजकीय नेत्यांनी दिले नाही."

कौल व दळवी यांची पुस्तके वाचून असा समज होतो, की चीनने भारतावर आक्रमण करून भारतीय भूमीचा अपहार केला होता हे जरी खरे असले तरी शेवटची ठिणगी भारतीय सैन्याने पहिली हालचाल केल्याने पडली, नामका चू भागातील चिनी सैन्यासमोर भारतीय सैन्य हलविले नसते तर कदाचित् युद्ध उद्भवले नसते. केवळ राजकीय दडपणाने सैन्याला हा खोडसाळपणा तयारी नसताना करावा लागला व त्याचे परिणाम मोठे सीमायुद्ध होण्यात झाले.

लंडन टाईम्सचे दिल्लीतील माजी वार्ताहर नेव्हिल मॅक्सवेल यांनी भारत-चीन युद्धाविषयी एक पुस्तक लिहिले आहे. त्यांचे म्हणणे असे, की भारत-चीन सरहद्द ठामपणे ठरली आहे हे चीनला मुळातच मान्य नव्हते. ही सरहद्द ठरावयाची आहे असेच चीनचे मत होते व भारत-सरकारलाही याची जाणीव होती. त्यामुळे भारत-सरकारने असे ठरविले, की चीनने हा प्रश्न उपस्थित करण्यापूर्वीच आपण दावा सांगत असलेल्या भागात आपले शासन सुरू करावे म्हणजे पंचशीलकराराच्या आधारावर चीनकडून त्या सीमांना मान्यता मिळवतां येईल. हा निर्णय झाल्यानंतर भारतीय सीमारक्षक विभागाची रखवाली पथके सीमेवरील विवाद्य भागात फिरू लागली व त्यांना चिनी सैन्याच्या हालचाली समजून येऊ लागल्या.

दरम्यान तिबेटात झालेली बंडाळी व दलाई लामाचे भारतात आश्रयार्थ पलायन या घटनांनी भारतातील लोकमत प्रक्षुब्ध होत होते. त्यामुळे चीनशी सीमाविषयक कोणतीही देवघेव करणे सरकारला शक्य झाले नाही. भारत सरकार आपण बोलणी करण्यास तयार आहोत असे जाहीर करी पण प्रत्यक्ष तडजोडीस मात्र सरकारची तयारी नव्हती.

याचा परिणाम असा झाला, की दोन्ही देशांची सैनिकी व अर्धसैनिकी पथके विवाद्य प्रदेशात चौक्या उभारू लागली आणि त्यांच्यात किरकोळ चकमकी होऊ लागल्या. त्याचा शेवट सीमा-युद्धात होणे अपरिहार्य होते.

भारत-चीन सीमायुद्धाविषयी अगदी अलिकडे लिहिले गेलेले पुस्तक म्हणजे भारतीय गुप्तचर विभागाचे माजी प्रमुख श्री. मलिक यांचे 'चिनी विश्वासघात', हें होय. या पुस्तकाचे वैशिष्ट्य हे, की यात सीमायुद्ध हा प्रमुख विषय असला तरी त्या युद्धाची ऐतिहासिक पार्श्वभूमि बऱ्याच विस्तृत प्रमाणात समजावून सांगितली आहे. त्यामुळे तिबेटचा इतिहास, भारतीय सीमा प्रदेशातील नागरी शासनाचे स्वरूप, भारतीय परराष्ट्रीय धोरणाची उत्क्रांती, चीन-भारत संबंध या बाबतीतही सुसंगत व एकत्रित ज्ञान वाचकाला होते.

श्री. मॅक्सवेल यांचा मुख्य मुद्दा श्री. मलिक यांनी निर्णायकपणे खोडून काढला आहे. मॅक्स्वेल यांचे म्हणणे असे की भारत-चीन सीमा निश्चित ठरलेली नाही हे

भारताने मान्य करावयास हवे होते. त्याविषयी मलिक असे लिहितात की १९५४ पूर्वी दोन्ही देशांच्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत भारताने हा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी चीन-सरकारने हा प्रश्न चर्चिण्यास योग्य वेळ आलेली नाही असे सांगितले. या मागील चीनचा हेतू उघड होता. तो असा, की आपणास पाहिजे असलेला मुलुख बळकवावयाचा व नंतर साळसूदपणे वाटाघाटीची तयारी दाखवावयाची. भारतानेही तोच मार्ग स्वीकारला व विवाद्य प्रदेशात चौक्या उभारावयास सुरुवात केली.


कौल व दळवी यांच्या आरोपांनाही मलिक यांनी सविस्तर उत्तरे दिली आहेत. मलिक यांनी असे स्पष्टपणे म्हटले आहे, की दळवी हे प्रथमपासूनच पराभूत मनोवृत्तीचे होते. त्याचप्रमाणे नामका चू भागातून चिनी सैनिकास हुसकावून लावण्याचा जो निर्णय घेण्यात आला त्यास कौल व थापर या दोघांचीही संमती होती. किंबहूना लष्करी हालचालीचे सर्व बेत थापर व इतर सेनाधिकारी यांच्या मतानेच आखले गेले. कोणतेही राजकीय दडपण कधी वापरण्यात आले नाही.

सीमायुद्धात भारताचा पराभव होण्याचे मुख्य कारण असे, की वसाहती परंपरा असलेले भारतीय सेनाधिकारी आणि स्वातंत्र्यलढ्यातून विकसित झालेले लोकशाही नेतृत्व यांच्यात सामंजस्याचा अभाव होता. त्यामुळे सीमायुद्धाची राजकीय नेतृत्वाची कल्पना व सेनाधिकाऱ्यांची कल्पना यांचा मेळच बसला नाही. युद्धातील अत्युच्च नेतृत्वातच अशी द्विधा वृत्ती असल्याने पराभव अपरिहार्य झाला.

पुस्तकातील मुख्य कथानक सोडल्यास इतरही मनोरंजक गोष्टी बऱ्याच प्रमाणात वाचावयास मिळतात. काश्मीर प्रिन्सेस या विमानास झालेला अपघात व त्याच्या शोधात भारतीय अधिकारी हेळसांड करीत असल्याचा चीनने केलेला आरोप चीनची दादागिरी दाखवितात. हा आरोप चीनला मागे घ्यावा लागला. सीमायुद्धात पराभव झाल्यावर आसाम-नेफा सीमेवरील नागरी शासन पूर्णतः कोलमडले. ती हकीकत उद्वेगकारक असून सीमाभागातील शासनाधिकारी व जनता यांचे मनोधैर्य कायम राहण्यासाठी राजकीय नेत्यांनी किती जागरूक असावयास हवे हे दर्शविणारी आहे.

भारतीय सैन्य, त्याच्या हालचाली व त्यांच्याविषयी शासनाने घेतलेले निर्णय जनतेपासून लपवून ठेवण्याची सरकारची वृत्ति आहे. त्यामुळे जनतेत सैन्याविषयी अविश्वास वाटतो, अगर फाजिल विश्वास बळावतो. अशा स्थितीत मलिक यांच्यासारख्या उच्चपदस्थ व्यक्तीने लिहिलेल्या पुस्तकाचे स्वागत होणे आवश्यक आहे, इतकेच नव्हे तर त्याची भाषांतरे प्रादेशिक भाषांत होऊन ते पुस्तक सामान्य वाचकापर्यंत पोचले पाहिजे.

□ □ □




## असू दे अंतर

तुझ्याविना जेथे
वाजतात टाळ
तेथे माझी माळ असो नये।
विरक्तीच्या विना
जेथे वाजे वीणा
तेथे माझ्या खुणा असो नये।
भक्तीचा डांगोरा
पिटताना कोणी
त्यात माझी वाणी मिळो नये।
पानाफुलांचाही
जेथे तुला भार
तेथे फुलभार माझा नसो।
तुझ्यामाझ्यामध्ये
असू दे अंतर
तितुका आतुर राहीन मी।

शरद वाघ

## मरणगंध

ज्वालांच्या वाटेवर पुष्पांची शेज नको,
रक्ताळल्या बोटांना चिंधीची कृपा नको ......
डोळ्यांच्या हाकेवर मुक्कामी गाव नको,
प्राक्तन बंधित रेषांना विलयाचे वान नको......
कुणाच्या करुणेचा पंखांना डंख नको,
आग भरल्या चोचीवर ओलेता हात नको......
क्षणोक्षणी नवानवा मरणांचा गंध हवा,
फुलण्याचा कफ नको, जळण्याचा शाप हवा!

वि. रा. जोशी

## इतुके

इतुके इतुके धुक्यात बुडले नभ निळे
इतुक्या इतुक्या पानोपानी संथदंव गळे...
इतुका इतुका धुंद उरि रंग निळा निळा
इतुका हा अधीर पानवला डोळा निळा...
मेंदी भरल्या हातामध्ये इतुका हा हिरवा चूडा
आठवतो पहिल्या रात्री रंगलेला लाल विडा...
इतुक्या या उत्तर रात्री मन निळे बिंबलेले
इतुकी हवी ओलीचिंब हवे कुंतल मोकळे...
इतुक्या इतुक्या निळाईत लाल लाल कडा
इतुके झाले तरीही जाई मनी खोल तडा...

मनोहर तोडणकर

## आस्वाद

'असू दे अंतर' या कवितेत शरद वाघ यांनी एका प्रामाणिक भक्ताची वृत्ती निर्व्याज सरळपणाने मांडलेली आहे. खऱ्या भावाचा भुकेला असणारा हा भक्त आहे. दिखाऊपणाच्या भावहीन मेळाव्यात सामील होण्याची त्याची इच्छा

नाही. टाळ-माळ-वीणा या दर्शक चिन्हापेक्षा अंतरीचा भाव त्याला महत्त्वाचा वाटतो. त्याची भक्ती स्वयंतृप्त आहे. तिला डांगोरा पिटण्याची आवश्यकता भासत नाही. या सगळ्या निवेदनातून अन्यांच्या दांभिक भक्तिप्रदर्शनाच्या उल्लेखाला आपोआपच भेदक उपरोधाची धार आलेली आहे. स्वतःच्या भावकक्षेच्या वर्तुळात राहून हे घडलेले असल्याने हा उपरोध भेदक असला, मार्मिक असला, तरी कठोर नाही. अंतर राखून आतुरता जोपासणारा हा भक्त अभंगाच्या प्रकृतीशी सुसंवादी आहे.

'मरणगंध' या कवितेत वि. रा. जोशी यांनी एक विलक्षण अनुभव फार समर्थपणे मांडला आहे. आशयाशी एकरूप झालेल्या प्रतिमांच्या भाषेत हा अनुभव व्यक्त होतो. वेदनांच्या आर्ततेचे अनिवार्य आकर्षण हे या अनुभवाचे स्वरूप आहे. कवीला ज्वालांच्या वाटेचा प्रवास नशिबाने लाभला आहे, आणि त्याला त्याच तीव्रतेने सामोरे जाण्याची त्याची जिद्द आहे. क्षणभराची पुष्पांची शेज ज्वालांची असह्यता वाढवील कदाचित म्हणून ती नाकारायची. रक्ताळलेल्या बोटांना गुंडाळलेली चिंधी, आग भरल्या चोचीवर फिरणारा ओलेता हात ही सगळी याचप्रकारची नाकारलेली सांत्वने. मरणातही गंध शोधणाऱ्या या उन्मनस्क वृत्तीला जळण्याचाच शाप हवा आहे, हेही समुचितच.

'इतुके' या कवितेत मनोहर तोडणकर यांनी शब्द आणि रंग यांच्या आवर्तनातून एक अबोध गहिरेपण साकार केले आहे. 'इतुके' हा शब्द अनेक तऱ्हांनी पुनरावृत्त झालेला आहे. खरे तर ही पुनरावृत्ती अन्वयार्थाच्या दृष्टीने निरर्थक आहे. पण त्यातूनच नजाकतीच्या तरल रेषा हलकेच रेखल्या गेल्या आहेत. धुक्यात बुडलेले निळे नभ, उरी धुंदावलेला निळा निळा रंग आणि अधीर पानवलेला निळा डोळा या निळ्या रंगाच्या जडणीत हिरवा चुडा आणि लाल विडा यांच्या प्रतिमा ठसविलेल्या आहेत. हे सगळे 'इतुके' आहे म्हणून अधिक मोहक गहिरे झाले आहे. पण या सगळ्यामधेही मनाला खोलवर तडा गेलेला आहे. का कुणास ठाऊक !

— रसिक

❋

गेल्या दोन महिन्यांपासून मी असाच अस्वस्थ आहे. बेचैन आहे. आपलं कुठेतरी चुकलं, ही जाणीव मला सारखी हिणवीत आहे. मला एकसारखं अस्वस्थ करीत आहे. पण मी जे केलं, जे माझ्या हातून घडलं, ते चूक केलं, असंही मला वाटत नाही. माझ्या जागी तुम्ही असता. तर तुम्हीही हेच केलं असतं. या चमत्कारिक प्रसंगी जे माझ्या हातून घडलं, तेच तुमच्या हातून घडलं असतं. मग मला असं अस्वस्थ का बरं वाटत आहे ? मी असा दिवसेन् दिवस अंतर्मुख होतोय. वाटतं, की सत्य इतकं कडवट असू शकतं का, की जे पचवायला माणसाला आपलं उभं आयुष्यही अपुरं वाटावं...?

माझी बहीण सुनेत्रा सारखी मला विचारीत असते,

# आग

**दत्ता कवर**

'शरद, एवढा कसला विचार करत असतोस रे नेहमी ?'

या तिच्या प्रश्नाचं तिला उत्तर तरी कसं द्यायचं ? कारण या प्रश्नाचं नुसतं उत्तर मिळाल्यानं हा प्रश्न थोडाच सुटणार आहे ? म्हणून मी गप्प असतो. पण सुनेत्रा गप्प राहत नाही. तिला माझं वागणं दिवसे दिवस पटेनासं झालंय. मी असा तिरसटपणानं का वागतोय हे तिला जाणून घ्यायचंय. माझा सारखा पिच्छा पुरवलाय तिनं प्रश्नांचा भडिमार करून ! पण तरीही मी गप्प आहे...

सुनेत्रा म्हणते,

"शरद, गेल्या दोन महिन्यांत तुझ्या वकिलीची प्राप्ती किती झालीय, याचं भान आहे का तुला ? अरे, अवघे शंभर रुपयेही मागे पडले नाहीत. आताशा येणाऱ्या केसेस तू फेटाळून लावतोस. बाहेर जमणारी माणसं, त्यांची रांगही दिवसें दिवस कमी होत चाललीय. हे सारं असं किती दिवस चालणार ?..."

...सुनेत्राच्या कोणत्याच प्रश्नाला माझ्याजवळ उत्तर नव्हतं. उत्तर द्यावं, असंही वाटेनासं झालं आहे. वकिली पेशाला शोभून न दिसणारं मी वागतोय, हे सारं मला मंजूर आहे. खरोखर मी वकील आहे यापेक्षा एक माणूस आहे, ही जाणीवच मला गेल्या दोन महिन्यांपासून अधिकाधिक होत आहे. माझ्यातला वकील दोन महिन्यापुर्वीच मेलाय. उरलोय तो मी ! फक्त मी ! एक माणूस ! चुकून चुका करणारा...की, की नको ! –नकोत हे सारे विचार...

...पण नको म्हटल्याने विचार थोडेच मला सोडणार आहेत ? ते मला



सोडणार नाहीत ! खरंय. हे एकच सत्य जगात माझ्या अनुभवाला येतंय. विचारांनी सोडलं तर ? पण जर तरचा उपयोग काय ?...

...या आदर्श कॉलनीत सध्या शरद कात्रे हा वकील रहात नसतो. इथे फक्त मी राहतोय. एक माणूस. अन् माणसाला बेचैन करणाऱ्या विचारांशी मी मैत्री जुळवलीय. बाकी सब झूट ! सत्य एकच ! विचार ! नि-नि विकार पण !—अरे, जे कसं सांगावं हा प्रश्न मला पडला होता ते मी सांगूनच गेलोय तुम्हाला ! हे विकार ! माणसातला ' माणूस ' घालवून टाकणारे ! माणसातला पशू जागा करणारे. '

...या विकारांनी पछाडलेल्या विलासिनीला त्या सोहनलालच्या मिठीत मी या उघड्या डोळ्यांनी पाहिलं ! नि मला हे मुळीच सहन झालं नाही. जगात नीति असावी याचा मी भोक्ता आहे की नाही कोण जाणे. पण मला हे असलं काही मुळीच खपत नाही. माझ्या जागी तुम्ही असता ना, तर तुम्हालाही हे मुळीच खपलं नसतं, रूचलं नसतं. अन् आवडलं असतं म्हणता ? काय बिशाद ! तुम्हाला घृणा वाटली असती. फक्त घृणा ! जे मला वाटलं तेच तुम्हाला वाटलं असतं. घृणा, तिरस्कार, चीड सारं सारं तुम्हाला वाटलं असतं...

कारण ही विलासिनी त्या सोहनलालची कोणीही नाही. ती या आदर्श कॉलनीत राहणाऱ्या प्रा. अविनाश सप्रेंची पत्नी आहे. ती केवळ विलासिनी सप्रे म्हणून जगासमोर उभी आहे, जगासमोर मिरवत आहे. पण मी तिला या ' सोहनलालचं काही एक देणं लागू ' नसताना त्याच्या मिठीत पाहिलं आहे. मीच नव्हे तर किती-

तरी जणांनी हे पाहिलं असेल. सोहनलाल हाही याच आदर्श कॉलनीत प्रा. अविनाश सप्रेंच्या बाजूच्याच ब्लॉकमध्ये राहत असतो. तो रेडिओ मेकॅनिक आहे. त्याचं दादरला रेडिओचं दुकान आहे. यंत्राशी खटपट करणारा हा माणूस माणसांनाही यंत्र बनवू पाहतोय. हे मला कसं सहन होणार ?...पण केवळ त्यानेच विलासिनीला आपल्या जाळचात ओढलं होतं असं, मला त्यावेळी वाटलं होतं. पण वाटणं आणि असणं यात बरीच तफावत असल्याचं मला शेवटी दिसून आलं.

विलासिनी ही मुळी सरळमार्गी नव्हतीच ! सगळचा आदर्श कॉलनीत तिला सरळमार्गी म्हणणारी एकही बाई नव्हती. पण गंमत अशी, की याच विलासिनीनं आपल्या नवऱ्याचा – अविनाशचा प्रचंड विश्वास संपादन केला होता. इतका की, गेल्या दोन वर्षात त्याला तिच्याबद्दल कधीच कसलीच शंका आली नाही. आली नव्हती. मला आजही आश्चर्य वाटतंय. विलासिनी खरोखरच फार चतुर होती यात संशय नाही. परंतु माझ्यातल्या वकीलानं तिला उघडं पाडलं. जगासमोर आणलं. जगाला खरीखुरी विलासिनी दाखवून दिली ! तुम्हाला जी आतापर्यंत दिसत होती ती विलासिनी खरी नव्हे, तर खरी विलासिनी ही ' अशी ' आहे हे मी अविनाश सप्रेंना पुराव्यानिशी पटवून दिलं...

...पण आज वाटतं, यातून आपण साधलं काय ? सोहनलालला तिनं लिहिलेली पत्रं आपण पुरावा म्हणून पुढे आणली – त्याचा परिणाम शेवटी अविनाशनं तिच्यापासून घटस्फोट घेण्यात झाला. नि आज एकटं पडलेल्या अविनाशला पाहणं, दररोज पाहणं मला फार कठीण जातंय. गेल्या दोन महिन्यापासून मला यामुळंच फार अस्वस्थ वाटत आहे. अविनाशच्या साऱ्या श्रद्धांना पार तडा गेलाय. कधी नव्हे इतकी बिअर आताशा तो घेत असतो. प्राध्यापकांच्या व्यवसायाला न शोभणारी एकलकोंडी वृत्ती झालीय त्याची. हे सारं गेल्या दोन महिन्यांपासून मी पाहातोय. नि आतल्या आत खोल कुठेतरी मला आपणच कुठे चुकलो तर नाही ना, असं वाटू लागलंय...

–त्यावेळी मला वाटायचं, ही विलासिनी म्हणजे एक ' आग ' आहे–आग ! ह्या आगीला ह्या आदर्श कॉलनीतून घालवलं पाहिजे. नाहीतर सगळी आदर्श कॉलनीच ह्या आगीत भस्म होऊन जायची !...पण घडलं, घडलच ते किती विचित्र !...

...विचित्र नाही तर काय ? आगीत असून अविनाश सुरक्षित होता जणू ! पण आज आगीला बाहेर घालवलं नि अविनाश जणू होरपळून निघालाय, म्हणजे गेल्या दोन वर्षात तो हळूहळू भस्म होत असला पाहिजे ! आज तो-पूर्वीचा अविनाश कोठे गेलाय ? ' प्रा. अविनाश सप्रे घरी आहेत काय ?' या प्रश्नाला अविनाशच आज उत्तर देतोय,–' नाहीत !'...

दिवस कसे भराभर निघून जात आहेत नाही ? पावसाळा, हिवाळा, उन्हाळा ! ऋतू बदलला, की निसर्गात पडलेला फरक मला दिसतोय जाणवतोय. पावसाळ्या-

तील ओलीचिंब होऊन आपसातच भांडणारी झाडांची पानं, हिवाळ्यातील हिरव्या-गार गवतावरील चिमुकले दवबिंदू, त्या दवबिंदूंना स्पर्श करणारी ह्या आदर्श कॉलनीतील या लहान लहान मुलांची ही गोजीरवाणी लुसलुशीत पावलं !...नि आता कडक उन्हाळ्यातही गरगरणाऱ्या पंख्याखाली आईस्क्रीमची चव घेणारा, ती चव तशीच जिभेवर रेंगाळू देणारा मी–शरद कात्रे–नि माझ्यासमोर बसलेली माझी बहीण–ही सुनेत्रा–!

...आईस्क्रीमची चव घेता घेता वर्ष कसं पालटत गेलं, दिवस कसे भराभर निघून गेले, याचे विचार मनात येताहेत नि वाटतंय, तब्बल एक वर्ष झालंय–अविनाशनं बिलासिनीपासून घटस्फोट घेतला ह्या गोष्टीला ! पण अविनाशच्या चालण्यावागण्या-बोलण्यात काही एक फरक पडलेला नाही. त्या धक्क्यातून तो अजूनही बाहेर पडलेला नाही. 'बिअर' त्याला जीव की प्यार झालीय. 'बर्कले'-च्या वलयात तो स्वतःला पाहात असतो की काय कुणास ठाऊक !–बहुधा त्या धूम्रवलयातून विलासिनीच खटचाळ रूपं घेऊन त्याच्यासमोर येत असेल ! त्याला सारखी छळत असेल–आगच ती ! एका आगीचं दुसऱ्या आगीशी सख्य जुळायला कितीसा उशीर ?

...आज कितीतरी डोळे माझ्यावर रोखलेले आहेत. त्या सर्वांची ती भेदक दृष्टी मला सारखी विचारीत असते, 'का केलंस तू हे शरद ? एकाकी अविनाशच्या आजच्या अशा वागण्याला जबाबदार कोण आहे, माहीत आहे तुला ? अरे, तूच आहेस !"

लोकांचे डोळे मला असंच सारखं हिणवितात. लोकांना मी भीत नाही. केव्हाच भीत आलेलो नाही. पण सुनेत्रा जेव्हा मला म्हणते, "शरद ! सप्रे सरांच्या आजच्या अशा एकाकी जीवनाला तू निमित्तमात्र ठरलास, हे तर खरंच ना ?

...सख्ख्या बहिणीच्या या उद्गारांचा अर्थ किती सरळ आहे ! निमित्तमात्र ! माणसं अशीच एकमेकांच्या सुखदुःखाला, नाश-विनाशाला, जय-पराजयाला निमित्त-मात्रच ठरत असतात की काय ? माझ्या अनुभवावरून तरी ते खरं वाटू लागलंय मला !

---

पुढील सहा महिन्यात 'कविता' सदरात प्रसिद्ध होणाऱ्या कवितांची निवड पूर्ण झाली आहे. कविमित्रांनी कृपया कविता पाठवू नयेत, त्यासंबंधी कोणताही पत्रव्यवहार करणे शक्य होणार नाही. —संपादक

---

...सुनेत्रा अविनाशला ' सर ' ह्या एकाच भूमिकेतून आताशा पाहत नाही, हे पाहून मला फार समाधान वाटतं हल्ली. का कोण जाणे ह्या अविनाशचं गेल्या जन्मीचं काही देणं मी लागतोय या जन्मी, असं मला आताशा वाटू लागलंय, त्याच्याबद्दल एक विशेष जवळीक गेल्या वर्षभरात मला फार तीव्रतेने वाटू लागलीय. या वाटण्यामुळेच तर तो आज माझा एक जवळचा मित्र झाला आहे. दररोज आतांशा आम्ही तिघे-मी, अविनाश आणि सुनेत्रा दूरवर फिरावयास जात असतो... मनसोक्त भटकून आल्यावर तासभर परत गप्पा मारीत असतो नि शेवटी जेवण वा फराळ काहीतरी तिघेही एकत्रच घेत असतो. आताशा आमच्या गच्चीवर आम्ही कित्येकदा ' रमी 'चा डाव मांडलेला आहे. माझे आणखी एकदोन मित्रही मी यावेळी आणलेले असतात. शक्य तो खळखळून हसणाऱ्या, दिलखेचक शब्दाची सतत बरसात करणाऱ्या, गेल्या वर्षभरात कोठेतरीं लुप्त झालेल्या अविनाशच्या त्या पूर्वीच्या रूपाला मला परत आणायचं आहे. अविनाशला परत जिवंत करायचं आहे. हा एकच ध्यास मला सारखा लागलेला आहे..


...या ध्यासापायी मला जे जे पटेल, जे जे रुचेल ते ते मी गेल्या वर्षभरात करीत आलो आहे. अविनाश आता मला परका राहिलेला नाही. नि त्याला माझं घरही परकं राहिलेलं नाही. आम्ही तिघांनी नाटकं, सिनेमा पाहण्यात एकत्रित असे कितीतरी दिवस घालविले आहेत. या माझ्या कृतीतून मला कोणतं तरी एक समाधान मिळत आलेलं आहे. हे समाधान नेमकं कशा स्वरूपाचं आहे ? ह्याची मला उकल होत नाही, नि उकल होऊन करायचं तरी काय आहे ?

...वकिली पेशातून वावरणारा माझ्यातला शरदही वकिली थाटाला शोभेल अशी वर्तणूक ठेवून सध्या वागत आहे ! सुनेत्राला बोलण्याला अशी कुठेच जागा ठेवलेली नाही मी...!

□ □ □



# जनरल आयसेनहॉवरच्या हत्येचे कारस्थान!



लेखांक : दोन — निवेदक : अनंत भावे

तो फतवा पाहाताच स्कोर्झेनीला धक्का बसला. ही योजना आता रद्द करावी, अशी विनंती त्याने हिटलरला केली. कारण योजनेच्या यशस्वितेसाठी आवश्यक असलेली गुप्तता भंग पावली होती. या फतव्याची माहिती व्हर्सायिला कळणे केवळ अपरिहार्य होते. अशा परिस्थितीत तयारी चालू ठेवणे व्यर्थ होते.

परंतु स्कोर्झेनीचे हे लेखी निवेदन हिटलरपर्यंत पोहलेच नाही. हे निवेदन मध्येच जनरल फेगेलिएन या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या हाती पडले. ते वाचून तो संतापला. त्याने स्कोर्झेनीला तावडतोब आपल्या कार्यालयात बोलावून घेतले आणि त्याच्या दुष्टतेबद्दल कडक शब्दांत हजेरी घेतली. 'हे निवेदन हिटलरच्या दृष्टीला पडता कामा नये. एका अत्युच्च सेनाधिकाऱ्याच्या आणि पर्यायाने साऱ्या वरिष्ठ यंत्रणेच्या शहाणपणाबद्दलच शंका व्यक्त केली आहे या निवेदनात. मला वाटतं, स्कोर्झेनी आपली तयारी तू चालू ठेवणंच प्राप्त परिस्थितीत इष्ट ठरणार आहे.' फेगेलिएनने लागेल ती मदत देण्याचे मात्र अभिवचन दिले.

## बिकट अभ्यासक्रम

कायटेलच्या फतव्यावरहुकूम बर्लिनजवळच्या फ्रायडेन्थल येथील स्कोर्झेनीच्या शिक्षणशिबिरात स्वयंसेवक भराभर येऊ लागले. शिक्षणशिबिरातील सारी व्यवस्था

स्कोर्झेनी जातीने पाहात होता. भर जंगलात एक विस्तीर्ण मैदान तयार करण्यात आले होते. या मैदानात स्वयंसेवकांची कसून तयारी करून घेतली जात असे. भर रात्री दीर्घ पायपीट करणे, सर्व सामानासहित पाण्याच्या पृष्ठभागाखालून पोहणे, अत्यंत बिकट अडथळे पार करणे, याबरोबरच इंग्रजी भाषेचे व्यवस्थित शिक्षण त्यांना देण्यात आले. या भाषाशिक्षणातही अमेरिकन शिवराळपणावर विशेष भर देण्यात आला होता. च्युईंगम अमेरिकन पद्धतीने कसा चघळायचा, हात खिशात घालून अमेरिकन पद्धतीने कसे चालायचे, याचेदेखील पद्धतशीर धडे देण्यात आले. अमेरिकन अधिकाऱ्याच्या आगमनासरशी या स्वयंसेवकांनी थिजून जाऊ नये यासाठी पुष्कळ तालीम घेण्यात आली. या सर्व अभ्यासक्रमात सर्वांत कठीण गोष्ट जर कोणती असेल तर ती म्हणजे एका हाताने सिगारेट वळणे. फ्रायडेन्थल येथे दाखल झालेल्या तीन हजारांपेक्षा अधिक स्वयंसेवकांपैकी फक्त दोघांनाच ही एका हाताने सिगारेट वळण्याची कला हस्तगत झाली होती !

न्युरेन्बर्ग येथे स्वयंसेवकांचे उच्च शिक्षण–शिबिर भरविण्यात आले. यावेळी स्कोर्झेनीने स्वयंसेवकांचे अत्यंत काळजीपूर्वक गट पाडले. ज्यांना इंग्रजी भाषा अस्खलित बोलता येत होती त्यांना गटप्रमुख नेमण्यात आले होते. स्वयंसेवकांमधील सर्वांत कुशल स्वयंसेवक निवडून त्यांचे पाच संघ करण्यात आले होते. हे पाच संघ साक्षात् व्हर्सायिवर आणि आईकवर हल्ला करणार होते.

अत्यंत बंदिस्त व्हर्सायमध्ये घुसायचे कसे, ही या योजनेतील सर्वांत बिकट समस्या होती. तिच्यावर मात करण्यासाठी अखेर एक युक्ती शोधण्यात आली. त्याप्रमाणे स्कोर्झेनी स्वतः जर्मन गणवेषच चढविणार होता; आणि अमेरिकन गण-वेष चढविलेले बारा स्वयंसेवक जर्मन अधिकाऱ्याला पकडल्याचा देखावा करत दोस्तांच्या सर्वोच्च प्रधान कार्यालयामध्ये घुसणार होते. स्कोर्झेनीला तातडीच्या उलटतपासणीसाठी आत न्यावयाचे आहे, असे सांगून दारावरची तपासणी चुक-विण्याचा त्यांचा इरादा होता. एकदा आत शिरल्यावर ही मंडळी आयसेनहॉवरच्या कार्यालयावर तुटून पडणार होती. स्वयंसेवकांजवळ असलेल्या नकाशात आयसेन-हॉवरचे कार्यालय ठळक दाखविलेले होते. तेथे गेल्यावर कदाचित खुद्द स्कोर्झेनीलाच आयसेनहॉवरला खातमा करण्याची संधी मिळणार होती.

या कल्पनेमुळे आणखी एक गोष्ट साधणार होती. स्कोर्झेनीला वाचविण्यासाठी या मोहिमेत, त्याने मागेमागेच राहावे अशी आज्ञा हिटलरने दिली होती. स्कोर्झेनीला ती मान्य नव्हती. वर सांगितलेल्या कल्पनेप्रमाणे हिटलरची आज्ञा बाजूला सारण्यास योग्य ती सबब स्कोर्झेनीला आयतीच मिळणार होती. आईकला ठार मारण्यासाठी आपले स्वतःचे आमिष दाखवणे जरूरच होते, असे तो हिटलरला सांगणार होता.

१९४४ सालच्या डिसेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात स्कोर्झेनीचे स्वयंसेवक

आर्देनेज आघाडीपाशी आले. पुढे जाणाऱ्या स्वयंसेवकांनी म्यूसे नदी ओलांडली आणि ते अमेरिकन सेनेच्या तुकड्यांमध्ये मिसळून गेले. त्यांनी दळणवळण व्यवस्था उध्वस्त केली; जिवंत सुरुंग पेरलेल्या जागी असलेल्या धोक्याच्या सूचना त्यांनी काढून टाकल्या; लष्करी पोलीस असल्याचे नाटक वठवून गोंधळ माजवला; भलतेच मार्गदर्शन करून वाहतूक विस्कळीत केली; पूर्वनियोजित इशारती देऊन म्यूसेपलीकडील जर्मन तोफखान्याला त्यांनी काही मोक्याच्या जागा दाखवल्या. त्यामुळे जर्मनांना अचूक तोफमारा करता आला. परिणामी दोस्तांचे फार मोठे नुकसान झाले.

## अफवांचे पेव

दरम्यान अमेरिकन गुप्तहेरखात्याने या कटाचे धागेदोरे शोधण्यासाठी बेभान प्रयत्न चालविले होते. दोन महिन्यांपूर्वीच मार्शल कायटेलच्या फतव्याची माहिती त्यांना मिळाली होती. त्याचबरोबर पकडण्यात आलेल्या जर्मन स्वयंसेवकांकडून माहितीचे काही धागे त्यांच्या हाती लागले होते. त्यावरून या भयानक कटाची मोठी विदारक जाणीव त्यांना झाली होती.

उभ्या दोस्त आघाडीला या भयानक कटाची कुणकुण लागली होती. जर्मनांनी आईकला ठार मारण्याचा प्रयत्न चालविला असून स्कोर्झेनी त्याचे नेतृत्व करीत आहे, याशिवाय सैनिकांना बोलायला दुसरा विषय नव्हता. प्रधान कार्यालय तर कमालीचे सावध झाले होते. जर्मन हस्तकांचा शोध करताना सारे तारतम्य सुटले होते. कोणाचाही थोडा देखील संशय आल्यास त्याला, त्याचा गणवेष आणि दर्जा यांची पर्वा न करता, अटक करण्यात यावी, असे हुकूम लष्करी पोलिसांना देण्यात आले होते. परवलीचे पूर्वीचे साधे शब्द टाकून आता नव्या परवलीच्या शब्दांची मालिकाच निश्चित करण्यात आली होती. ही मालिकासुद्धा एखाद्या संशयिताने अचूक म्हटली तर त्याला एक विशिष्ट शब्द उच्चारायला सांगावे असे ठरले होते. जर्मन मातृभाषा असलेल्याला हा शब्द अमेरिकन पद्धतीने बिनचूक म्हणता येणे शक्य नव्हते.

यामुळे प्रसंगी काही ब्रिटीश अधिकारी, इतकेच नव्हे तर मंदबुद्धीचे काही अमेरिकन सैनिकदेखील अटकेत पडले. आघाडीवरचे सैनिक आपल्या शेजाऱ्याकडे देखील अविश्वासाने पाहू लागले. कित्येकांच्या झोपा उडाल्या. शस्त्रे बाजूला ठेवण्यास कोणी धजावेना. या कटाच्या वार्तेचा अमेरिकन सेनेवर झालेला मानसिक परिणाम विलक्षणच होता. सैनिकांचा एक डोळा समोरच्या शत्रूवर तर दुसरा कदाचित पाठीमागून येणाऱ्या सैनिकावर खिळलेला असे.

आणि आर्देनेजची चढाई सुरू झाल्यापासून हळूहळू या विभागापुरते तरी युद्धाचे पारडे जर्मनीकडे झुकत होते.

अफवांचे नुसते पेव फुटले होते. आघाडीवरच्या अगदी एकाकी ठिकाणीदेखील

या अफवा जाऊन पोचत होत्या. एक अफवा विशेष लोकप्रिय होती. त्या अफवे-प्रमाणे जिवावर उदार झालेल्या जर्मन स्वयंसेवकांचे एक पथक अपेक्षेप्रमाणे व्हर्सायि-वर नव्हे तर पॅरीसपासून जवळच असलेल्या सेंट जर्मेन येथील आयसेनहॉवरच्या आलिशान निवासस्थानावर धाड घालणार होते. आपल्या 'क्रुसेड इन युरोप' या पुस्तकात खुद्द जनरल आयसेनहॉवरने या अफवेचा निर्देश केला आहे.

आयसेनहॉवर सरसेनापती असले तरी आघाडीवरील सर्वसामान्य सैनिकांमध्ये अनौपचारिकपणे मिसळण्याचा त्यांचा स्वभाव होता. अशा अनौपचारिकतेने सामान्य सैनिकाचे मनोधैर्य वाढते अशी त्यांची श्रद्धा होती. त्यामुळे कसलीही पूर्वसूचना न देता, फ्रान्स व बेल्जियममधील आघाडीवरील कोणत्याही तुकडीला ते कधीही यदृच्छया भेट देत असत. अशा वेळी एक मदतनीस आणि मोटारचालक एवढी दोनच माणसे त्यांच्याबरोबर असत.

या कटाची वार्ता समजताच संरक्षक अधिकाऱ्यांनी आईकच्या संरक्षणासाठी कंबरा कसल्या. प्राथमिक सावधगिरी म्हणून सेंट जर्मेन येथील आलिशान निवास-स्थान सोडून अधिक सुरक्षित अशा ट्रायानॉन इमारतीत आईकची राहण्याची व्यवस्था करण्यात आली. आईकना हा बदल पसंत नव्हता; पण त्यांच्यावरदेखील दडपण आणण्यात आले. एवढे कशाला, साधे मैदानात मोकळेपणी हिंडण्याचा आनंददेखील त्यांना मना करण्यात आला.

आईकचे निवासस्थान बदलल्यामुळे अफवांना पुन्हा बहर आला. सात फूट उंचीच्या आणि गालावर घावाची लालचटक निशाणी असलेल्या एका महाकाय जर्मनाबद्दल सारेच सैनिक हलक्या आवाजात बोलू लागले होते. याच जर्मनाने मुसोलिनीला वाचवले होते, आणि हाच आईकच्या जीवावर उठला होता.

एका अफवेचा तपशील असा होता, की हा महाकाय जर्मन एका विशिष्ट हॉटेल-पाशी आपल्या सहकाऱ्यांना भेटून नंतर पुढे आईकवर हल्ला करणार होता. या अफवेची फारशी छाननी न करताच संरक्षक अधिकाऱ्यांनी या प्रसिद्ध हॉटेलवर कडक पहारा ठेवला. हॉटेलच्या आसपास फिरणाऱ्या कोणालाही कसून उलट-तपासणीला तोंड द्यावे लागे. योगायोगाने काही जर्मन स्वयंसेवक खरोखरच या जाळ्यात अडकले. उलट तपासणीत त्या सर्वांनी एकच कबुलीजबाब दिला, 'आम्ही स्कोर्झेनीचे स्वयंसेवक आहोत. आयसेनहॉवरला मारण्याचा आमचा उद्देश होता.'

अमेरिकन गणवेष धारण केलेला एक कडवा जर्मन स्वयंसेवक चोरपावलांनी थेट व्हर्सायिच्या मुख्य प्रवेशद्वारापर्यंत गेला होता. तेथे मात्र एका लष्करी पोलिसाने झाडलेल्या प्रश्नांच्या फैरीपुढे त्याचे अवसान गळाले होते. जीव वाचविण्यासाठी तो कुंपणाकडे धावला. अंधाराचा फायदा घेऊन, कुंपणावरून उडी टाकून, पळून जाण्याचा त्याचा बेत असावा. पण त्याने कुंपणाला स्पर्श केला मात्र, कुंपणाच्या तारांतून विद्युतप्रवाह खेळविला असल्याने, तो पाहाता पाहाता खाक जळून गेला.

## तोतया आयसेनहॉवर

आयसेनहॉवरची सेक्रेटरी लेफ्टनंट के. समर्सबाय हिने 'आयसेनहॉवर वॉज माय बॉस' या पुस्तकात त्यावेळच्या वातावरणाचे मोठे वेधक चित्र रेखाटले आहे. ती म्हणते, 'प्रधानकार्यालयाच्या आवाराला एखाद्या गढीचे स्वरूप प्राप्त झाले होते. तारांची भेंडोळी इतस्ततः पसरली होती. कित्येक रणगाडेदेखील उभे होते. पहारा क्रमाक्रमाने दुप्पट तिप्पट चौपट झाला होता. कसलाही आवाज झाला की आमच्या कार्यालयात आयसेनहॉवरच्या खुशालीची विचारणा करणारी टेलिफोनची मालिकाच सुरू होई. प्रत्यक्ष युद्धातील आघाडीवरच्या कार्यालयापेक्षादेखील आमच्या कार्यालयातील वातावरण अधिक प्रक्षुब्ध झाले होते.'

स्कोर्झनीला सापळ्यात अडकविण्यासाठी संरक्षक अधिकाऱ्यांनी एका मानवी आमिषाचीदेखील व्यवस्था केली होती. चिकागोचा एक रहिवासी लेफ्टनंट कर्नल बाल्डविन बी. स्मिथ हा तंतोतंत आईकसारखा दिसत असे. इतकेच नव्हे तर त्यांच्या हास्यातदेखील कमालीचा सारखेपणा होता. आयसेनहॉवरच्या खास मोटारीत स्मिथला बसवून सेंट जर्मेन आणि व्हर्साय यांच्या दरम्यान तिच्या फेऱ्या करण्याचा सपाटा त्यांनी चालू ठेवला होता. वाटेवर कोणत्या क्षणी मोटारीवर बाँबगोळा पडेल वा गोळ्यांची फैर झडेल याचा नेम नव्हता; तरी आपण बेदरकार आहोत असे दाखवत, हसत, हात हलवत, स्मिथ गाडीत बसलेला असे.

आयसेनहॉवरभोवती संरक्षक अधिकाऱ्यांनी दुर्दम्य तटबंदीच उभी केली होती. एक बैठक संपवून दुसऱ्या बैठकीसाठी त्वरेने जाणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना जागोजाग रस्त्यावरील व्यवस्थित उभारलेल्या अटकावांना तोंड द्यावे लागे. अशा वेळी अधिकाऱ्यांचा हुद्दा वा प्रवासाचे प्रयोजन यांची भीडभाड ठेवली जात नव्हती. परवलीची शब्दमालिका या अधिकाऱ्यांना देखील जिभेवर तयार ठेवावी लागे.

सत्तावीस डिसेंबरला स्कोर्झनीची तयारी पुरी झाली. त्याला गिरफ्दार करण्याचे नाटक रचून कार्यालयात घुसणाऱ्या बारा शेलक्या स्वयंसेवकांना स्कोर्झनीने तपशीलवार सूचना दिल्या होत्या. अमेरिकन मोटारींमधूनच ते पॅरीसजवळ जाणार होते. तेथून त्यांना सरळ व्हर्सायवर धडकायचे होते. मोटारीत बसलेल्या स्कोर्झनीला हातकड्या घातलेल्या असल्या तरी त्यांना कुलूप लावण्यात येणार नव्हते. अगदी अखेरच्या टप्प्यावर मोटार सोडून पायीच पुढे जाण्याचा त्यांचा इरादा होता. प्रतिबंध करणाऱ्या पहारेकऱ्यांवर सरळ गोळ्या झाडीतच ते सरसेनापतींच्या कार्यालयात घुसणार होते.

इतका सारा बेत ठरला; पण इतक्यात, दुसऱ्या दिवशी, आयसेनहॉवर कार्यालय सोडून राईम्समधील तुकड्यांना भेट देण्यासाठी जाणार असल्याची विश्वसनीय बातमी स्कोर्झनीला मिळाली. त्यामुळे व्हर्सायवरील हल्ल्याचा बेत रद्द करून रस्त्यातच दगाफटका करून आयसेनहॉवरचा निकाल लावण्याचा निर्णय स्कोर्झनीने घेतला.

पॅरीस–राईम्स या प्रदेशाचा नकाशा त्याने बारकाईने पहिला. ज्या मार्गाने दोस्तांचे वरिष्ठ अधिकारी नेहमी प्रवास करतात त्या मार्गाची महत्त्वाची माहिती बर्लिनहून मिळविण्याचा स्कोर्झेनीने प्रयत्न केला; पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही. मग पॅरिसहून अगदी सरळ रस्त्यानेच आईक राईम्सला जाईल, अशी आशा बाळगून स्कोर्झेनीने आपला डाव रचला. व्हर्साय–पॅरीसकडे जाणाऱ्या फाटयांपूर्वी दक्षिणेला अर्ध्या मैलावर एका ठिकाणाची निवड स्कोर्झेनीने केली.

एका जीपमध्ये सहा स्वयंसेवक बसले. हातबाँबचा भरपूर साठा त्यांच्याजवळ होता. व्हर्सायवरील चढाईचा बेत रद्द झाल्यामुळे आता स्कोर्झेनी स्वत: हिटलरच्या आज्ञेप्रमाणे मागे राहणार होता. आयसेनहॉवरचे एक ठसठसीत छायाचित्र स्वयंसेवकांना दाखविण्यांत आहे होते.

## स्वभावदोषामुळे सुटका

ठरल्या ठिकाणी जाऊन जीप झाडीच्या आडोशाने उभी राहिली. बऱ्याच वेळानंतर हिरव्यारंगाची एक मोटर जवळ येऊ लागली. आयसेनहॉवरची मोटर ! गटप्रमुखाने मोटार चालकाला सूचना दिली. जीप झाडीमधून बाहेर आली आणि त्या हिरव्या मोटारीला भिडली. हिरव्या मोटारीवर हात बाँबचा वर्षाव झाला. कार्य उरकताच जीप बेभान वेगाने जर्मन आघाडीकडे निघाली. परंतु वाटेत ज्वलन संपल्यामुळे पेट्रोल भरण्यासाठी अमेरीकन पंपाचा आश्रय स्यंसेवकांना करावा लागला. तेथेदेखील ‘ पेट्रोल ’ ऐवजी ‘ गॅस ’ मागण्याची सावधगिरी मोटारचालकाने दाखविली असती तर त्यांची जीप म्यूसेच्या पलीकडे निर्धोक जाऊ शकली असती आणि कदाचित् खुद्द आयसेनहॉवरने त्याच दिवशी एक सत्कृत्य करण्याचा स्वाभाविक मोह टाळला असता तर त्याचा अवतार तेव्हाच समाप्त होणार होता.

स्कोर्झेनीची योजना फसली तरी कशी ? त्या हिरव्या मोटारीत आयसेनहॉवर नव्हते, मग होते तरी कोण ! आणि आयसेनहॉवर होते तरी कोठे ? आईकच्या खुनाची वार्ता समजताच कार्यालयातील फोन सारखा वाजतच राहिला.

आयसेनहॉवर कार्यालयात नव्हते; इतकेच नव्हे तर ते कोठे होते याची निश्चित माहिती कोणालाही नव्हती. ते राईम्सला गेले होते; आणि पुष्कळ आधीच यायला हवे होते, एवढीच माहिती सगळयांना होती. संरक्षक अधिकाऱ्यांना आपल्या संरक्षण- व्यवस्थेवर विश्वास होता; तथापि या खुनाच्या प्रयत्नामुळे सगळीकडे हलकल्लोळ उडाला. हा छुपा हल्ला झाला त्यावेळी आयसेनहॉवरची मोटार खरोखरच त्या रस्त्याने जाणार होती. परंतु योगायोगाने आयसेनहॉवरवर म्हणून टाकलेल्या हातबाँबनी कर्नल चाल्मेस आणि त्याचा मोटारचालक कॉर्पोरल हिक्स यांचा बळी घेतला होता.

स्वतः आयसेनहॉवर कोठे आहेत ते कोणालाच सांगता येत नव्हते. त्यामुळे शंका कुशकांना उधाण आले. प्रक्षुब्ध संरक्षक अधिकाऱ्यांनी अमेरिकन सेनेला सावध

केले. त्याबरोबर आईकचा खून झाला, आईकना प्रळवून नेले, अशा अफवा वणव्या-सारख्या पसरू लागल्या.

आणि दुपारी जनरल आयसेनहॉवर अगदी सहज कार्यालयात अवतीर्ण झाले. त्यांच्या चेहऱ्यावर तेच परिचित हास्य होते. झाल्या प्रकाराची काहीच माहिती त्यांना नसावी. आयसेनहॉवरना पाहताच साऱ्यांच्या आनंदाला उधाण आले. भावना-विवश असलेल्या काहींच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. आयसेनहॉवर होते तरी कुठे, या प्रश्नाचे उत्तर त्यांच्या मोटारचालकाने दिले. तो म्हणाला 'आम्ही पॅरीसपासून पश्चिमेला पंधरा मैलांवर होतो. एवढ्यांत रस्त्याच्या कडेला बर्फात एक म्हातारा आणि एक म्हातारी आम्ही पाहिली. म्हातारी रडत होती. त्यांना पाहून आईकने मला मोटार थांबविण्याची आणि त्यांची विचारपूस करण्याची आज्ञा केली. तो म्हातारबाबा आणि ती म्हातारी पॅरिसला त्यांच्या मुलीकडे निघाली होती. दिवसभर पायपीट केली होती त्यांनी. म्हातारी दमली होती. पुढे पाऊल टाकवत नव्हते तिला. तिची दशा पाहिल्यावर आईकने सरळ मोटारींत त्यांना घेतले आणि निघालो आम्ही त्यांच्या मुलीचा पत्ता शोधीत. बरं, पत्ता तरी सहज मिळाला म्हणता ? पुष्कळ शोधला तेव्हा कोठे शोध लागला त्या मुलीचा. आईकसाहेबांचं तुम्हाला माहीतच आहे. मदत करण्याशिवाय दुसरा उद्योगच नाही त्यांना."

आयसेनहॉवरच्या या स्वभावदोषामुळेच त्या दिवशी प्राणसंकटातून त्यांची सुटका झाली होती. याची बिचाऱ्या मोटार चालकाला त्यावेळी तरी कल्पना नव्हती. त्या वृद्ध दांपत्याला पॅरिसला पोचविण्यासाठी आईकच्या मोटारीला आधीच वळावे लागले होते. तशी ती न वळती तर सरळ मृत्यूच्या जबड्यात शिरली असती.

यथाकाल आर्देनेजच्या लढाईत जर्मनांचा पराभव झाला. स्कोर्झेनी आणि त्याचे उरलेले स्वयंसेवक जर्मनीला गेले. या मोहिमेतील सुरुवातीच्या यशाचे श्रेय स्कोर्झेनीला देऊन त्याबद्दल हिटलरने त्याला 'आयर्न क्रॉस' बहाल केला. हिटलरची कोसळणारी प्रतिकारयंत्रणा सावरण्याचा यथाशक्ती प्रयत्न स्कोर्झेनीने केला होता. युद्ध संपले. ऑस्ट्रियामधील साल्झबर्ग येथील अमेरिकन प्रधान कार्यालयात एके दिवशी स्कोर्झेनीने शरणागती पत्करली आणि डिसेंबरनंतर प्रथमच अमेरिकन संरक्षक अधिकाऱ्यांनी सुटकेचा खरा निश्वास टाकला. अमेरिकन सैनिकदेखील, शेजारच्या सैनिकाकडे गैरविश्वासाने पाहण्याची आवश्यकता सरल्यामुळे, निःशंक झाले.

## समाप्त

 पृष्ठ १४ वरून

प्रांतातील साधेसुधे लोक पुढे येतात. सदाशिवनगरच्या अगदी उलट चित्र! तेथे विरुद्ध मतदान करायला किंवा सूचना करायला किंवा आपली मते, दुःखे मांडायला कोणीच पुढे आले नव्हते. सारेच मुखस्तंभ. येथे स्वतःहून पुढे येणारे सर्वसामान्य लोक होते. आपली गाऱ्हाणी, दुःखे मांडावीत. आता काहीतरी करायलाच पाहिजे. स्वस्थ बसून चालणार नाही, या भावनेने ते बोलायला उत्सुक होते. ठिकठिकाणचे १९ वक्ते परिषदेत आपली मते मांडून गेले. त्यांच्यापैकी एकही वक्ता पढवलेला होता असे वाटले नाही. प्रत्येकजण स्वयंस्फूर्तपणे बोलून गेला. एकाला तेथे उपस्थित असलेल्या जनसमुदायापुढे बोलणे जमणार नव्हते. 'मला बोलता येणार नाही' असे सांगून त्याने मोडक्या तोडक्या भाषेत लिहिलेले आपले विचार वाचून दाखविण्याची विनंती केली.

पुणे जिल्ह्यातील श्री. वासुदेव सावळे यांनी धरणग्रस्ताचे गाऱ्हाणे मांडले. सरकारी पडीत जमीन आहे ती भूमिहीनांना, धरणग्रस्तांना मिळाली पाहिजे अशी त्यांनी मागणी केली. अन्याय दूर करण्याकरिता चळवळ होणे आवश्यक आहे असे त्यांनी प्रतिपादन केले.

ठाणे जिल्ह्यातील, पालघर तालुक्यातील आदिवासी वासुदेव दामोदर पिंगळे यांनी एक घटना सांगितली. गावचे पुढारी लाचखोर होते. त्यांच्याविरुद्ध तरुणांनी संघटना उभारली व पुढाऱ्यांनी खाल्लेले गावचे पैसे परत मिळवून ते गावाला वाटले. संघटनेच्या जोरावर सारं काही शक्य होतं, हा मुद्दा मांडताना त्यांनी असेच इतर काही किस्से सांगितले आणि चळवळीसाठी संघटना बांधा यावर भर दिला.

बुलढाणा जिल्ह्यातील वरखेड गावचे शिवलीलासिंग रजपूत यांनी नवगंगा योजनेसंबंधी व पाटकरी पैसे घेऊन पाणी कसे देतो याला वाचा फोडली.

शहादे तालुक्यातून आलेले महेंद्र कथ्याजी नंदाजी हा आदिवासी. निसर्गाच्या आपत्तीमुळे कर्ज फेड करता आली नाही. त्यामुळे आदिवासींच्या जमिनींचा लिलाव झाला, घरातील मालमत्ता जप्त झाली. गुजराची दडपशाही चालली असल्याचे सांगून, गेलेल्या जमिनी परत मिळाव्यात, अत्याचार बंद झाले पाहिजेत, तळोदे भागातील सहा हजार शेत मजूरात, भूमिहीनांना ताबडतोब जमीन वाटप झाले पाहिजे अशा मागण्या याने परिषदेपुढे ठेवल्या. या मान्य न झाल्यास १ जानेवारीला त्याकरिता मोर्चा व त्यातूनही काही निष्पन्न न झाल्यास जमिनीचा कब्जा करू असा जाता जाता त्याने इशारा दिला.

औरंगाबादच्या श्री. विठ्ठल ढेकले यांनी अर्जविनंत्यांनी प्रश्न सुटणार नाहीत. यावर भर दिला. रब्बीची पिके गेलीच आहेत. पिकांवर रोग पडले आहेत म्हणून

कर्जवसुलीच्या प्रश्नावर साराबंदीचा विचार चालू असल्याचे सांगितले.

सातारा जिल्ह्यातील जिजाराम जगदाळे यांनीं गांधी नावाच्या जमीन मालका-संबंधी काहीतरी गंभीर सांगितले. त्यांची (गांधींची) ३०० एकर जमीन आहे. मजूरांना महिना फक्त ७ रुपये मजूरी मिळते. वर्ष भरल्यावर १५०० रुपये कर्ज डोक्यावर असते. मुंगळे असलेल्या खोलीत शेतमजुरांना डांबले जाते व पोलीस पाटील त्यांना सामील असतो, असा आरोप केला.

– कोल्हापूर–इचलकरंजीकडील भीमराव बापू हानिगडे नावाच्या एका हरिजन तरुणाने आपली कहाणी सांगितली अस्पृष्यता निवारणाचे कायदे झाले पण ती अजूनही चिकटूनच आहे. त्या भागात अजूनही हरिजनांना उपहारगृहे व देवळांत बंदी आहे. ' आम्ही बंदी मोडणार. आम्हाला आत जायला मिळणार नसेल तर आम्हाला बंदी घालणाऱ्यांना आत जायला आम्हीही बंदी करू. यात बलिदानही करू. ' असे अगदी आवर्जून सांगितले.

यवतमाळ-पुसद येथील गणेश पतंगे, पुणे जिल्ह्यातील महादेव इंगळे, नासिक–चांदवडचे सखाराम हरिचंद्र, नांदेडचे रखमाजी घोडसकर नगरचे सिगा कडलम, कोल्हापूरचे मुळे, जळगावचे बारकू अर्जून व इतर काही लोकही तळमळून बोलले.

पण याहीपेक्षा जीव तोडून बोलला तो डोळे खोल गेलेला, निस्तेज पण जोमदार असलेला जासल्या हुसक्या भोसले हा पारधी. श्रीगोंदे तालुक्यातील वलगूडचा.

जासल्या भोसले जेव्हा बोलत होता तेव्हा मी मंडपात नव्हतो. पण त्यासंबंधी मला कळल्यावर त्याचा शोध केला. जासल्या काय बोलला हे ऐकायची मलाही उत्सुकता होती. त्याने मांडलेले विचार पुन्हा सांगायची मी विनंती केली. जासल्या-बरोबर तेथील एका बैठ्या घराच्या पायरीवर बसून बोलत असतानाच इतरही लोकांनी घोळका केला. शहरी पोशाख केलेला ' साहेब ' आला की तो आपले सारे प्रश्न चुटकीसरशी सोडविण्यासाठी अवतरलेला देवदूतच अशी या लोकांची भावना. डोळ्यांत करुणा आणून लाचारीने मला प्रत्येकजण आपापली गाऱ्हाणी सांगू लागतो. जमिनीसाठी आमचा अर्ज लिहून घ्या म्हणून सांगू लागतो. त्यांना काय सांगायचं. त्यांची कशी समज घालायची हा एक यक्षप्रश्नच पुढे उभा राहातो.

जासल्या सांगायला सुरुवात करतो. आम्ही पिढ्यान्‌पिढ्या मागासलेल्या वर्गाचे. लोकांचे उष्टे खाऊन आम्ही जगतो. खानेसुमारीत आमचे नाव नाही. निवडणूकी-तील मतदारांच्या यादीत आमचे नाव नाही. आम्हाला घरदार आहे कुठे ? वरून पाऊस पडत असतो. चिखल होतो. एखाद्या फाटक्या चादरीवर आमच्या बाया बाळंत होतात. आम्ही राहातो तसे एक दिवस तरी मंत्र्यांनी राहून दाखवावे. चोरी केली नाही तरी सरकार त्रास देतं. आमच्या जातीत, स्वतंत्र राज्यात, आमची सुधारणा नाही. प्रत्येक जातीचा मंत्री येताच त्या जातीची सुधारणा होते. आमच्या

जातीची सुधारणा नाही. कारण आमची झोळी फाटकी आहे. आमची मुले शाळेत गेली पाहिजेत, आमचे लोक, मंत्री-आमदार झाले पाहिजेत. काही पारधी पोरांना सैन्यात दाखल करण्यासाठी घेऊन गेलो तर त्यांना तेथे नोकरी नाही. जन्म दाखला मागतात. आमची खानेसुमारीही होत नाही मग आम्हाला जन्मदाखला कोण देणार ? इतर कुठेही नोकरी मिळत नाही. आमची जमीन असेल तर आम्ही कष्ट करून खाऊ.

आम्हा पारध्यांची सुधारणा कोणी केली नाही. आम्हीही भारताचेच, परदेशी नाही. बंगाल देशच्या माणसाची देखभाल होते. पण आमचे कार्य ? उद्योगधंद्यात आम्हाला जागा नाही. पारध्याचे भूत लागेल म्हणून आम्हाला स्मशानभूमीत जागा नाही. कोतवाल व इतरांना पैसे देऊन गावच्या वेशीवर यासाठी तीन साडेतीन हात जमीन मिळवायची हे आमचे जीवन. आमचा जन्मच खरकटं खाऊन जायचा. आम्ही मंत्र्यांना धरणार. किती दिवस आम्ही उष्टं खायचं ? कुठेही जागा द्या. आम्ही तेथे राहू. दुसरे चोरी करतात नि आमच्यावर येतं. आता आम्ही पूर्वीसारखे पोलिसाला घाबरत नाही. त्यांना न घाबरता आता समोर गेले पाहिजे. दडून दडून आम्ही मागे राहिलो हे आता लक्षात येऊ लागले आहे. आता प्रयत्न चालू झाले आहेत. मी स्वत: शेती, बैल घेतले आहेत. आमच्या काही पारध्यांना जमिनी घेऊन दिल्या आहेत. आम्हाला कोणी खंडाने जमीन दिली तर ती आम्ही प्रामाणिकपणे कसू. ती जमीन आम्हाला नको. आम्हाला सरकारकडून जमीन हवी आहे. आता ती आम्ही भांडून घेऊ.

जासल्याने सारी वस्तुस्थिती मांडली. त्याचे भाईबंदही त्याच्या मताशी सहमत होते. पारध्यातील एक जासल्या आज बोलू तरी शकतो आहे हे एक शुभचिन्हच समजायचे.

खुले अधिवेशन तीन वाजता सुरू व्हायचे होते. जेवण आटोपून मी, ठरावावर बोलण्यासाठी ज्यांनी काही लिखाण केले होते ते कागद चाळत होतो. त्यातील प्रत्येकाला जमिनीची भूक असल्याचे जाणवले. अनेकांनी आपली दु:खे मांडली होती.

सीताराम गावडे, मालती पवार या श्रीगोंदे तालुक्यातील कडगावच्या लोकांनी लिहिले होते – जेथे काम चालू होते तेथे ते कामाला होते. 'तीन मस्टर्स होऊन गेली तरी अजून पगार नाही खाण्याची तारांबळ होत आहे'.

धुळे जिल्ह्यातील साक्रीतालुक्यातील हाट्टी (घाणेगाव) ग्रामपंचायनीच्या सरपंचांनी ग्रामपंचायतीचा शिक्का मारलेले पत्र पाठविले होते. मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या पत्राची ती प्रत होती. ते म्हणतात–

– ११५० लोकवस्तीचे गाव. २५ टक्के शेतकरी. ७५ टक्के भूमिहीन. पोट भरण्याचे इतर साधन नाही. यावर्षी दुष्काळ पडला. उपाशी पोरे अन्न मागत

येतात. करायचे काय ? आमच्या बाजूची पडीक फॉरेस्ट जमीन आहे. ती मिळावी अशी इच्छा आहे. 'आपल्या हातून एवढीच भीक द्यावी अशी आमची गरीबाची नम्र विनंती आहे'.

दुसरे एक बोलके पत्र हाती लागले.

ते पत्र त्याच शब्दात जसेच्या तसे देत आहे

मे. युनियन सेंटर साहेब यांचे हुजूरास.

विषय : फॉरेष्ट जमीन मिळणेबाबत.

अर्जदार : मढे वडगाव मातंग समाज, ता. श्रीगोंदे, जि. अ. नगर.

कारणे विनंती अर्ज करतो की : आमचे गांवी फॉरेस्ट जमीन शिल्लक असून आम्हाला सांगता की जमीन हे गायरान आहे तरी आम्हाला जमीन देत नाही. दुसरे असे की — आम्ही ५५१ रुपये सोसायटी तयार करण्यासाठी भारस्कर सांबांनी पैसे पाटलाजवळ द्यावयास सांगितले व आम्ही ते ५५१ रुपये पाटील यांचे जवळ दिले व त्या पैशाची आम्हाला संघाची पावती दिली तरी भारस्कर साहेब आम्हाला म्हणाले की जमीन देणे हे काय कढईमधील लापशी नाही. तरी आमच्या ५५१ रुपयाची अजून चौकशी नाहीच परंतू जमीन तर नाहीच. तरी आमची या गरीब लोकांची चांगल्याप्रकारे चौकशी करावी. आम्ही हे पैसे ४ वर्षापूर्वी भरले आहेत. तरी मे. सा. या वरील सर्व परिस्थितीचा विचार करावा. संघाची पावती आम्हाजवळ ५५१ रु. पुरावा आहे.

मे. सा. जाहीर व्हावे.

कळावे.

समस्त मातंग समाज

(१) लक्ष्मण लहानू ससाणे (२) लक्ष्मण रामा ससाणे (३) आंबाजी नाना ससाणे (४) यशवंत दादू ससाणे (५) बाबू जना ससाणे (६) आनंदा ससाणे.

ता. २१–११–७१

दुपारच्या खुल्या अधिवेशनापर्यंत लोक येतच होते. मंडप भरून गेला होता. सुमारे बाराहजार लोक असावेत. २० जिल्ह्यातील १५६७ एवढे प्रतिनिधी हजर होते. सुमारे दीडहजार बायका, पोराबाळांसह आल्या होत्या. समाजकल्याणमंत्री श्री. भारस्कर परिषदेला हजर होते. कॉ. दत्ता देशमुख यांनी रात्रीचेच मुद्दे इतरांच्या सोयीसाठी पुन्हा मांडले. त्यात नवी भर घातली ती पुढील प्रमाणे.

—'कष्टातून जर संपत्ती निर्माण होणे असे म्हणतात तर मग कष्टकरी कर्जबाजारी का ? आम्ही आता सरकारला स्वस्थ बसू देणार नाही. निरनिराळी कामे हाती घ्यायला भाग पाडणार. हिरव्या क्रांतीची फळे आपल्या कष्टकऱ्यांना काय मिळाली ? पिळवणूक करणाऱ्यांची समाजव्यवस्था आपण पिळून टाकली पाहिजे.

आता फार झपाटयाने चळवळ वाढणार आहे.

श्री. भास्कर यांनी सरकारच्या पंधरा कलमी कार्यक्रमावर भर देऊन सांगितले की यामुळे गरिबांसाठी बाजूला काढलेली रक्कम त्यांच्यावरच खर्च होणार आहे. सामान्य माणसाचे प्रश्न समजावून घेऊन ते मंत्रीमंडळापुढे ठेवण्याची संधी मिळावी म्हणून ते परिषदेला उपस्थित राहिले असेही त्यांनी सांगितले.

जळगाव जिल्ह्यातील साम्यवादी नेते कॉ. भालेराव म्हणाले "वट हुकुमांनी जमिनी जाणार नसतील तर शेतमजूर त्या जमीनदारांकडून काढून घेतील. हे वारं गरीब शेतकऱ्यांचं, भूमिहीनांचं आहे. मक्तेदार, भांडवलदार शासनाशी, लढयाशिवाय तुमचे प्रश्न निकालात निघणार नाहीत."

कॉ. यशवंत चव्हाण म्हणाले– ज्याला स्वतःचे हित साधायचे आहे त्यानेच चळवळ व संघटना उभारायची आहे. आत्तापर्यंत न्याय हा मालकांचा होता. आता आम्ही कष्टाचा न्याय मागतो. मध्यम शेतकऱ्यांच्या लढयाची वावटळ आता महाराष्ट्रात उठणार आहे.

मंजूर झालेल्या ठरावातील काही ठळक मुद्दे पुढीलप्रमाणे– लागवड योग्य जमिनीचं शेतमजूरांत वाटप, लागवडीखाली आणलेल्या जमिनीवरील खटले रद्द व्हावेत व वसूल दंड परत मिळावा.

लागवडी लायक सर्व गायरान जमीन भूमिहीन शेतमजुरांत वाटप.

जेथे गावठाणात मोकळी जमीन उपलब्ध असेल तेथे बेघरांना घरासाठी जागा देणे व अशा ठिकाणी ती उपलब्ध नसल्यास नजीकची बड्यांची जमीन सरकारने ताब्यात घेऊन घरांसाठी उपलब्ध करून देणे.

सध्या चालू असलेली कामे पुढे चालू ठेवणे. नवीन कामे सुरू करणे.

छोटया व मध्यम शेतकऱ्यांच्या कर्जाच्या थकबाक्यांच्या वसुलीसाठी चालू असलेल्या जप्त्या बंद करणे. गरीब शेतकऱ्यांवरील कर्ज माफ करणे वगैरे–

एकूण काय शेतमजूर, भूमिहीन तसा चांगल्या प्रकारे संघटित झाला आहे. संघटितपणे तो आपल्या गाऱ्हाण्यांना वाचा फोडू शकेल. एका नव्या शक्तीचा उदय होत आहे. वेळीच त्याचे प्रश्न सुटले नाहीत तर चळवळीचे विधायक वळण तसेच राहील, याची हमी कोण देणार ?

आदिवासी– पारधी यांच्यासारख्या दबल्या गेलेल्या जमाती आता जागरूक होऊ लागल्या आहेत. परिस्थितीची योग्य जाणीव त्यांना होऊ लागली आहे. आता मागे राहून चालणार नाही हे त्यांच्या मनाने घेतले आहे. आता समाजातील दबले गेलेले घटक त्यांचा न्याय्य हक्क मागणार.

परिषदेच्या मंडपात असलेल्या एका घोषणाफलकाची मला सारखी आठवण होत आहे,

'मागून मिळत नसते– मिळवून घ्यावे लागते. !' ◻

# सदाशिवनगर ते बेलवंडी

## चंद्रशेखर

महाराष्ट्र सरकार हे शेतकऱ्यांचे सरकार समजले जाते. इतर प्रांतात काँग्रेसची अनेकदा खूप पडझड झाली, पण महाराष्ट्रात प्रामुख्याने शेतकरी वर्गाच्या पाठिंब्याने काँग्रेसला आपली स्थिर राजवट टिकवून धरता आली. आहे अगदी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळीदेखील महाराष्ट्रात विरोधी पक्ष सत्तारूढ होऊ शकला नाही याचे श्रेय महाराष्ट्रातील शेतकरी वर्गास द्यावे लागेल. स्वत: मुख्यमंत्री व राज्याचे इतरही अनेक मंत्री शेतकरी कुटुंबांतील असून त्यांचे शेती-मध्ये हितसंबंधही आहेत. पंचायती राज्य, साखर कारखाने, सहकारी बँका यांच्या सहाय्याने या वर्गातील काही भागाने मोठ्या प्रमाणावर आर्थिक उन्नती करून घेतली व ही गोष्ट मुख्यमंत्री अभिमानाने व जाहीरपणे सांगत आले आहेत.

असे हे शेतकऱ्यांचे सरकार शेतकऱ्यांच्याविरुद्ध काही पाऊल उचलील हीं गोष्ट असंभवनीय वाटते. पण याच सरकारबद्दल अकलूजचे आमदार श्री. शंकरराव मोहिते-पाटील यांनी असे जाहीर उद्‌गार काढले, की शेतकरी पुन्हा फाटक्या पैरणीत वावरावा, त्याचे वाटोळे व्हावे अशी या सरकारची इच्छा आहे. हे घडलं कसे हे पाहण्याआधी श्री. शंकररावजींचे काय म्हणणे आहे ते पाहाणे उद्‌बोधक ठरेल.

सदाशिवनगर (ता. माळशिरस) येथे १९ नोव्हेंबर रोजी झालेल्या शेतकऱ्यांच्या मेळाव्यात श्री. मोहिते-पाटील यांनी नव्या सीलिंग कायद्याला जाहीर विरोध करणारे भाषण केले. येथे हे मान्य केलेच पाहिजे, की त्यांचे भाषण सुंदर झाले. त्यात शेतकऱ्यांची बाजू परीश्रमपूर्वक मांडण्याचा प्रयत्न होता. विरोधकांवर सरळ-सरळ हल्ला होता, शेतकरी जीवनाशी संबंधित असे अनेक खुमासदार किस्से व विनोद होते. खास ग्रामीण अशा ठसकेबाज म्हणी होत्या. सुमारे पाऊण तासाच्या या भाषणात मोहिते-पाटील यांनी विरोधी बाजूचे पार तीन तेरा वाजवून टाकले. माळशिरस व इंदापूर तालुक्यातील चार-पाच हजार शेतकरी आपल्या मागे उभे

करण्याचे सामर्थ्य असलेल्या, मी असेंब्लीपेक्षा तालुक्यात जास्त काम केले आहे, मला तिकीटाची गरज नाही. असे निसंकोचपणे सांगणाऱ्या या नेत्याने आपल्याच पक्षाच्या अधिकृत धोरणास जाहीरपणे विरोध करावा व त्यामुळे पक्षाच्या नेत्यांना सीलिंग कायद्यावर विचार करण्यासाठी खास बैठक बोलवावी लागावी ही घटना महाराष्ट्राच्या राजकारणात तरी अपूर्व अशीच आहे. तिचे राजकीय सादपडसाद महाराष्ट्रात येत्या तीन महिन्यात दिसतीलच.

श्री. मोहिते–पाटील यांचे श्रेय त्यांना देऊन टाकल्यावर त्यांच्या म्हणण्याकडे चिकित्सकपणे पाहण्यास हरकत नाही. त्यांचे म्हणणे असे, की गेल्या काही वर्षात शेतकरी श्रीमंत झाला आहे असा भास निर्माण झाला आहे. तो भासच आहे. शेतकऱ्यांचे कर्ज वाढत चालले आहे. शेती सोडून अनेक लोक शहराकडे वळत आहेत. शेतकरी श्रीमंत झाला नसून फक्त त्याची पत वाढली आहे. अशा परिस्थितीत समाजवाद राबवण्याच्या नावाखाली पुन्हा नवा सीलिंग कायदा आणणे अन्यायकारक आहे. या कायद्याने शेतकऱ्यावर घटनाबाह्य बंधनें पडणार आहेत. शहरी भागात उत्पादनसाधनांच्या मालकीवर काही बंधने नसता, शेतजमीनीच्या मालकीवर तेवढी नवी बंधने घालणे, विशेषत: मालकीसाठी कुटुंब हा घटक धरणे व स्त्रिया व अज्ञान मुले यांना स्वतंत्र जमिनीचा अधिकार नाकारणे हा उघडउघड भेदभाव आहे. समाजवाद आणायचा तर तो शहरी भागातही आणला पाहिजे. त्याचा डोस ग्रामीण भागासच वारंवार देणे योग्य नाही. या नव्या कायद्यामुळे शेतकऱ्याच्या प्रगतीचा मार्ग रोखला जाईल व पर्यायाने राष्ट्राचेही नुकसान होईल.

वरील भूमिकेव्यतिरिक्त श्री. मोहिते–पाटील यांनी आपल्या भाषणात आणखी एक महत्वाचा मुद्दा मांडला, की १९६१ च्या सीलिंगमुळे जेवढी जमीन मिळण्याची अपेक्षा होती तेवढो मुळीच मिळाली नाही व जी मिळाली तीहीं गरीब शेतकऱ्यांस न मिळता सरकारी महामंडळाच्या ताब्यात गेली. शेतकऱ्याला सरकार दरबारी किती अडवणूक होत आहे याचे वर्णन करून श्री. मोहिते–पाटील यांनी असे जाहीर केले, की उतारा मिळण्यासाठी आज दहा रुपये द्यावे लागतात व नोंदीसाठी पाचशे रुपये द्यावे लागतात. मोहिते–पाटील हे एक सरकारी पक्षाचे आमदार आहेत. तेव्हा त्यांची ही माहिती खरी असणार यात शंका नाही. त्यांच्या या गौप्यस्फोटाबद्दल त्यांचे आभार मानणे तेव्हाच योग्य ठरेल, की जेव्हा ते या बाबतीत काहीतरी पाऊल उचलतील.

वर दिलेली, श्री. मोहिते–पाटील यांनी मांडलेली शेतकऱ्यांची भूमिका आहे तशी स्वीकारणेच इष्ट आहे. कारण अशा बाबतीत दोन्ही बाजूंकडे भरपूर मुद्दे उपलब्ध होत असतात व या प्रकारच्या तात्त्विक चर्चेनेच प्रश्नांचा निकाल लागतो असे नेहमी दिसत नाही. बँक राष्ट्रीयकरण, संस्थानिकांचे तनखे, मूलभूत हक्कासंबंधीची घटना दुरुस्ती, बोनसचा प्रश्न यासारख्या अनेक प्रश्नांवर आपण पाहातो

की ज्याला 'ग्रेट डिबेट' म्हणतात तशी प्रदीर्घ चर्चा वृत्तपत्रांत व बाहेरही झालेली आहे. यापैकी प्रत्येक प्रश्नाचा जो बरा-वाईट निर्णय झालेला आहे त्यामध्ये चर्चेचा कितपत हातभार लागला हे वादग्रस्त आहे.

तेव्हा मोहिते-पाटील यांच्या भूमिकेला तात्त्विक उत्तर देण्याचा खटाटोप टाळण्यासारखा आहे. त्यांची ही एक बाजू आहे एवढे मान्य करून या प्रश्नात आणखी काही दिसते का हे पाहणे अधिक फलप्रद ठरेल.

असे पाहू जाता मोहिते-पाटलांना सांगावे लागते की साहेब, तुम्ही बाजू तर उत्तम मांडलीत पण आता काळ बदलला आहे.

काळ किती बदलला आहे ?

उदाहरणाने हे स्पष्ट होईल. २१ नोव्हेंबरला नगर जिल्ह्यातील बेलवंडी येथे भूमिहीन, शेतमजूर, गरीब शेतकरी परिषदेचे दुसरे अधिवेशन भरले होते. त्या परिषदेत शुभेच्छा व्यक्त करण्यासाठी राज्याचे समाजकल्याण मंत्री श्री. बाबुराव भारस्कर हे उपस्थित होते. त्यांच्या आधीच्या वक्त्यांनी, श्री. भारस्करांना पाथर्डी तालुक्यात जो घेराव झाला त्याचा उल्लेख केला होता. त्याला उद्देशून भारस्कर म्हणाले, 'उठसूट मंत्र्याला घेराव करण्यापेक्षा जो तुमच्यावर अन्याय करील त्यालाच घेराव घाला.'

महाराष्ट्र सरकारचे एक मंत्री कोणाला का होईना 'घेराव घाला' असे जाहीरपणे आज सांगत आहेत. मला आठवते तीन-चार वर्षांपूर्वी कलकत्त्याला 'घेराव' हे नवीन तंत्र उपयोगात आले तेव्हा त्याविषयी वृत्तपत्रांत व बाहेर टीकेचा गदारोळ उठला होता. घेराव ही लोकशाहीची पायमल्ली आहे, घटनेत दुरुस्ती करून घेरावला बंदी केली पाहिजे व कडक शिक्षा केली पाहिजे असा सार्वत्रिक सूर होता. हळूहळू हे तंत्र कमी अधिक प्रमाणात सर्वत्र फैलावले व आज राज्याचे एक मंत्री 'घेराव' घाला असे सांगतात, त्यामध्ये त्यांना काही विशेष वाटत नाही एवढी वेळ आली आहे,

हे उदाहरण क्षुल्लक समजण्याची चूक कोणी करू नये. असंतुष्ट, अर्धपोटी व वंचित अशा जनतेचा असंतोष व्यक्त करण्याच्या पद्धतीकडे पाहण्याची दृष्टी कसकशी बदलत जात आहे, कालचे अब्रह्मण्यम आज 'चालेल' या सदरात कसे येत आहे याचे स्पष्ट दर्शन वरील प्रकारात घडते.

तेव्हा काळ बदलला आहे हे सर्वच आर्थिक घटकांनी ध्यानात ठेवून आपापली बाजू मांडली पाहिजे. केवळ मुद्दे बरोबर वा तर्कशुद्ध असून भागत नाही, हा बड्या भांडवलदारांना, बँक चालकांना व संस्थानिकांना मिळालेला धडा शेतकरी वर्गास गिरवावा लागेल असे दिसते. मोहिते-पाटील म्हणतात त्याप्रमाणे शेतकरी कंगाल व्हावा हा उद्देश धरून सरकार कायदे करीत नाही. याचे उघड कारण असे, की या कामासाठी कायद्याची गरजच नाही. विशेष कायदेबाजी न करता इंग्रज सरकारने

आपल्या शेतकऱ्याला कंगाल केले होतें याची आठवण येथे ठेवणे जरूर आहे. दिसताना मात्र असे दिसते, की सरकार शेतीशी संबंधित अशा गोष्टीबाबत तडकाफडकी हालचाल करते व इतर बाबतीत मात्र चालढकल करते. अन्नधान्याचे भाव चढले की सरकार नियंत्रण आणते. जमीन धारणेबाबतही कायदे करते, सहकारी सोसायट्यांवर निर्बंध घालते हे सर्व खरे आहे.

या साऱ्याची दोन कारणे संभवतात.

एक म्हणजे अन्नधान्य ही जीवनावश्यक गरज आहे व दुसरे म्हणजे शेतकरीवर्ग हा लोकसंख्येच्या व आर्थिक उत्पादनाच्या दृष्टीने सर्वात मोठा वर्ग आहे. यामुळे सरकारला शेतकऱ्यांवरच जास्त नियंत्रणे घालावी लागतात. जमीन धारणेबाबत नियंत्रण असण्याचे दुसरे कारण म्हणजे जमीन ही मालमत्ताच केवळ नसून उदरनिर्वाहाचे साधनही आहे. तेव्हा जास्तीतजास्त लोकांना निर्वाहसाधन देण्याचा प्रश्न जेव्हा उभा असतो तेव्हा सरकारला जमिनीकडे दृष्टी वळविण्याखेरीज गत्यंतर नसते.

हे सर्व लक्षात घेऊनही काही जणांची जमीन काढून घेऊन ती इतरास देणे योग्य आहे काय असा जर प्रश्न कोणी केला तर त्याला अर्थिक तत्त्वाला अनुसरून उत्तर देणे कठीण जाईल. कारण निर्वाहाचे साधन म्हणून शहरात लक्षावधी लोक नोकरीच करीत असतात, त्यासाठी त्याना मालकी हक्काची गरज भासत नाही वा तो देणे व्यवहार्यही नाही. असे असतां खेड्यातील निर्वाहाची सोय तेवढी मालकी हक्कावाचून अडली आहे असे कसे म्हणता येईल ? याचे उत्तर एवढेच, की ग्रामीण भागातील लोकांमध्ये जमिनीची मालकी आपणास मिळावी अशी एक दृढमूल झालेली व कधीही बदलता न येणारी अशी इच्छा आहे.

या इच्छेचे कसलेही आर्थिक समर्थन नाही. परंतु अविकसित अर्थव्यवस्थेत इतर रोजगार मिळण्याची संधी मर्यादित असल्याने ही इच्छा वाजवी आहे एवढेच फारतर म्हणता येईल. या इच्छेलाच विरोध करण्याची जर सध्याच्या मध्यम व मोठ्या शेतकऱ्यांची भूमिका असेल तर ती भूमिका त्यांना अडचणीची ठरेल. आपल्या मालकीची जमीन कमी होऊ नये यासाठी ते देत असलेली व वर नमूद केलेली कारणे या भूमिकेमुळे निष्फळ ठरतील. कारण शेती उत्पादन वाढण्यासाठी, आर्थिक उन्नतीसाठी व व्यक्तिगत प्रगतीसाठी मग मालकी ही त्यांच्याच भूमिकेतून अनिवार्य ठरणार नाही.

यापुढची गोष्ट म्हणजे आपल्या मालकीची काही जमीन असावी अशी इच्छा असणारा भूमिहीन शेतमजूरवर्ग आता संघटित होत आहे. आजवरच्या साऱ्या राजकीय व आर्थिक वाटचालीकडे केवळ एक हताश प्रेक्षक म्हणून पाहणारा हा वर्ग झपाट्याने संघटित होत आहे.

या प्रक्रियेचे एक प्रत्ययकारी प्रतीक म्हणून बेलवंडी येथील भूमिहीन शेतमजूर,

गरीब परिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनाचा निर्देश करण्यास हरकत नाही. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आपली चार दिवसांची कमाई बुडवून या वर्गांचे प्रतिनिधी शेकडो मैलांवरून या परिषदेत येतात व एका शिस्तीने, गांभीर्याने आपल्या प्रश्नांचा संघटितपणे विचार करतात ही गोष्ट आपले राजकीय चित्र किती मूलतः बदलत आहे याची द्योतक आहे. सुमारे १० ते १२ हजार मंडळी या अधिवेशनास हजर होती. आठ आठ तास एका जागी बसून त्यांनी आपल्या प्रश्नांचा विचार केला. आपले अनुभव सांगितले व आपले निर्धार अतिशय आक्रमक भाषेत व्यक्त केले, जमिनीचे फेरवाटप, सरकारी जमिनी व गायराने यांचा प्रश्न, शेतमजुरी वाढविण्याचा प्रश्न इत्यादी प्रश्नांवर या वर्गाची एक ठाम अशी भूमिका तयार होत असून तिचे परीवर्तन सामुदायिक चळवळीत निश्चितपणे होत आहे.

महाराष्ट्रातील बहुतेक वृत्तपत्रांनी या बेलवंडी अधिवेशनाची उपेक्षा केली असली व मोहिते पाटलांच्या मेळाव्याला वारेमाप प्रसिद्धी दिली असली तरी एक राजकीय शक्ती म्हणून बेलवंडी अधिवेशन निश्चितपणे अधिक प्रभावी ठरेल ही शक्यता दिसते. कोंबडे झाकणाऱ्या म्हाताऱ्या व सूर्य यांची ही कहाणी समाजाच्या प्रत्येक स्थित्यंतराच्यावेळी झालेली आहे व नवरचनेचा सूर्य प्रत्येक वेळी आपल्या तेजाने झळाळत वर आलेला आहे.

श्री. मोहिते पाटील ज्या वर्गाचे प्रतिनिधत्व करतात त्या वर्गाचा सूर्यही एकवार दिमाखाने वर आला होता व त्यावेळी ती एक क्रांतिकारक घटनाच होती यात शंका नाही. पण आता त्या नवरचनेला स्वार्थाचे खग्रास ग्रहण लागलेले स्पष्ट दिसत आहे. असे नसते तर आसेतुहिमाचल सत्ता गाजवणाऱ्या कॉंग्रेस पक्षाचे १९६७ मध्ये तीन तेरा झाले नसते व तो पक्ष बचावण्यासाठी श्रीमती गांधींना 'गरीबी हटाव' ही घोषणा घेऊन उभे राहावे लागले नसते. 'गरीबी हटाव' ही घोषणा कॉंग्रेसपक्षाने सत्तेवर जवळजवळ बावीस वर्षे राहिल्यावर स्वीकारली ती उपरती झाली म्हणून नव्हे. कॉंग्रेसने जनतेच्या डोळ्यांसमोर धरलेल्या राजकीय दिवास्वप्नाचे रंग फिके झाले, या दिवास्वप्नास व्यवहारिक किंमत काही नाही हे गरीब जनतेच्या लक्षात आले व ती आपला असंतोष अनेक मार्गांनी दाखवू लागली म्हणून! आता 'गरीबी हटाव' घोषणा राजकीय यादवीमधले एक सोयिस्कर हत्यार म्हणून वापरली जाऊ लागली आहे. श्रीमती गांधींनी ज्या एका ध्येयवादी बेहोषीत ही घोषणा घेऊन लोकांना हांक दिली ती बेहोषी त्यांच्या विविध पातळीवरील सहकाऱ्यांपर्यंत पोहोचू शकली नाही. गटबाजीला प्रतिष्ठा देण्याचा एक मार्ग म्हणून आम कॉंग्रेसमधील प्रमुख नेते समाजवादी वल्गनांचा आश्रय करीत आहेत.

श्री. मोहिते–पाटील यांसारखे कांही चलाख नेते 'आमची गरीबी हटवा–आम्हीही गरीबच आहोत' अशी साळसूद भूमिका घेऊ पाहात आहेत. पण त्यांनी हे लक्षात ठेवावे, की ते सरकारच्या डोळचांत धूळ टाकू शकतील. ते न जमल्यास पक्षास विरोध करण्याचा पवित्रा घेऊ शकतील पण त्यांना विरोध करावा लागणार

आहे, सामना करावा लागणार आहे तो काँग्रेसपक्षाशी नव्हे, सरकारशी नव्हे तर बेलवंडीला जमलेल्या व ते लोक प्रतिनिधीत्व करीत असलेल्या लक्षावधी लोकांशी! मोहिते पाटलांना कदाचित मोटारीत टाकण्यास पेट्रोल कुठून आणावे अशी पंचाईत पडली असेल पण या लोकांना पोटाच्या खळगीत ढकलायला गोळाभर अन्न कुठून आणावे अशी पंचाईत पडली आहे.

त्यांची गरज जास्त तीव्र आहे, दैनंदिन आहे आणि अशी जीवघेणी गरज भागवण्यासाठी ते जो लढा देतील तोही जीवघेणाच असेल. अशा या लढाईत मोहिते पाटील व त्यांचा वर्ग टिकाव धरील असे वाटत नाही—कारण इतिहासाची साक्ष वेगळी आहे.

ही लढाई केव्हा होईल, तिची साधने काय असतील, तिचे क्षेत्र कोणते असेल हे फक्त काळच ठरवील. पण महाराष्ट्राच्या राजकारणास मोहिते पाटील यांचे माळशिरस व दत्ता देशमुखांची बेलवंडी यांचाच सामना निर्णायक वळण लावील एवढे सध्या नमूद करण्यास हरकत नाही. वर्षानुवर्षे सुस्तपणे चाललेल्या, एकमुखी नेतृत्वावर भिस्त ठेवणाऱ्या, व सत्तेच्या खुंटीभोवतो फिरणाऱ्या महाराष्ट्राच्या निर्बुद्ध राजकारणात हा सामना होण्याची शक्यता निर्माण झाली आहे हे देखील विशेषच म्हणावे लागेल. गरजणाऱ्या राजकारणाचा काळ संपून गरजेच्या राजकारणाचा कालखंड महाराष्ट्रांत सुरू होत आहे याची द्वाही माळशिरस व बेलवंडी अधिवेशनांनी फिरविली आहे. आजचा युगधर्म जो समाजवाद हेही अंतिम पृथःकरणात गरजेचे राजकारणच आहे हे लक्षात ठेवल्यास समाजवादाचे दुर्निवारत्व लक्षात आलेल्या लोकांस हा बदल स्वागतार्ह वाटेल. ◻ ◻ ◻

---

**अय्यय्यो ! मदरास !** पृष्ठ १७ वरून

बदलून ‘ शिक्षण ’ शब्दच काढून टाकला तर ?

आणखीही एक कारण घडत आहे. १९७२ मार्चच्या पहिल्या आठवड्यात तिरुपतीस, हिज होलीनेस शंकराचार्य श्रीनारायण रामानूजीर हे प्रचंड यज्ञ व दोन कोटींचा जप करणार आहेत. हिंदुस्थानच्या राशीला सध्या साडेसाती आहे हे सांगण्यास निराळा ज्योतिषी नको, त्याकरिता हा जप-यज्ञ. त्यामध्ये १००८ होमकुंडावर एकाच वेळी १००८ ब्राह्मणपंडित बसतील. यज्ञात फक्त तूपच वापरले जाईल. त्याचवेळी गीता व वेदांचे पठण होईल. त्या अखंडपठणासाठी २५०० ‘वेदपाठक’ निमंत्रित करण्यात येणार आहेत. हा सोहळा जवळजवळ बारा दिवस चालेल. शंकराचार्य त्यासाठी देशभर दौरा करणार आहेत व पुढील महिन्यात महाराष्ट्रातही. सदर यज्ञासाठी तिरुपती देवस्थानने साडेपाच एकर जागा, वीज, पाणी, बसेस हे सारे तर देऊ केलेच, पण खर्चापोटी ५०,०००रु. चे अनुदान मंजूर केले आहे. सरकारी काटकसरीचा वरवंटा मंजुरीवरून फिरला नाही म्हणजे मिळवले. नाहीतर घरीच बसल्याबसल्या म्हणा, ‘गोविंदा, गोविंदा गोऽविंदा’. ◻ ◻ ◻

# गणकयंत्रांची कुरघोडी रोखता येईल का ?

## जिप्सी मधुकान्त

सायबरनेटिक्स (गणकयंत्रे तसेच प्राण्यातील परस्पर संबंधांच्या पद्धतीचा आणि नियंत्रणाचा अभ्यास करणारे शास्त्र) शास्त्रातील डॉ. नोर्बर्त वाईनर हे एक प्रख्यात तज्ज्ञ होते. अठरा महिन्यांचे असताना त्यांनी वर्णमाला अवगत केली. तिसऱ्या वर्षी ते वाचू लागले. अकराव्या वर्षी कॉलेजात गेले. चौदाव्या वर्षी ऑनर्ससहित पदवी घेतली. हॉवर्डईहून अठराव्या वर्षी गणितीय तर्कशास्त्रात Ph.D मिळवली. बर्ट्रांड रसेल यांचे ते सहाध्यायी होते. त्यानंतर चाळीस वर्षे त्यांनी तंत्रविज्ञानाचे अध्यापन केले. अनेक ग्रंथ त्यांनी रचले आहेत. गणकयंत्रांच्या आधुनिक प्रगतीचा बराच वाटा त्यांच्याकडे जातो. काही वर्षांपूर्वी त्यांनी गणकयंत्रे व माणूस यांच्या संबंधात एक मुलाखत दिली होती. त्या मुलाखतीचा हा संक्षिप्त अनुवाद.

प्रश्न : गणकयंत्रे मानवावर कुरघोडी करतील, असा धोका वाटतो का ?

उत्तर : धोका आहेच निश्चित. बौद्धिक आळशीपणाचा ! मानवी प्रज्ञेवर गंज चढण्याचा! अधिकाअधिक युक्त्या, तंत्रे शोधून, माणूस आपले काम यंत्रावरच सोपवतो आहे. स्वत: निर्णय घ्यायला फुरसत नाही म्हणा, की इच्छा नाही म्हणा,– त्यामुळे ही सगळी गुंतागुंत निर्माण झाली आहे.

प्रश्न : मानवाहून अधिक बुद्धिशाली यंत्रे निर्माण केली जातील का ?

उत्तर : तसा आभास निर्माण होत आहे. सर्वसामान्य लोकांसमोर अद्याप ही यंत्रे आली नाहीत. पण माणूस यंत्रासमोर कमी कुवतीचा ठरला तर दोष त्याचाच असेल !

प्रश्न : भविष्यातला काही दाखला तुम्ही देऊ शकता का ?

उत्तर : सुरुवातीला अशा यंत्रांचे स्वरूप अवाढव्य होते. पण हे युग सूक्ष्मातिसूक्ष्म घटक बनवून ते जोडायचे आहे. शिवाय या सूक्ष्मीकरणात वेगवेगळ्या प्रकारच्या 'मेमरीज'– 'स्मृतिमंजुषा'– बसविण्याचे अभिनव तंत्र लाभल्याने तर गणक-

यंत्रांची कार्यक्षमता प्रचंड प्रमाणात वाढली आहे. मेंदूतल्याप्रमाण गुंतागुंतीची व्यवस्था या यंत्रात बसवायला यश येत आहे. आपल्या मेंदूतील ' जेनेटिक मेमरी ' ही मोठ्या प्रमाणावर न्यूक्लेईक ॲसिडवर अवलबून असते. मेंदूतील या द्रव्याच्या विश्लेषणाने आणखीही निष्कर्ष प्राप्त होत आहेत.– नजीकच्या भविष्यात या निष्कर्षांचा उपयोग करून गणकयंत्रे अधिक कार्यक्षम आणि सजीव करण्याकडे शास्त्रज्ञांचा कल राहील.

प्रश्न : म्हणजेच, चुंबकीय पट्टीऐवजी अशा ' जेन्स 'चा वापर गणकयंत्रे करतील, असेच तुम्हाला म्हणायचे ना ?

उत्तर : जेन्सच्या बरोबरीला आणखीही काही गोष्टी असतील. पण अगदी मुळापासून ते सारे संशोधन करायला बराच अवधी लागेल. त्यांचे नवेच विश्व असेल. शिवाय काम करवून घेण्याची पद्धती–जो भविष्यातील विज्ञानाचा प्रश्न आहे.

प्रश्न : ही प्रगती मानवाला भयभीत करणारी नव्हे काय ?

उत्तर : नीट समजून न घेता या विज्ञानाचा वापर केला तर मानवाला घाबरवणारेच हे सारे होईल ! अर्थात् या शक्तीचा पुरता आवाका ओळखून खुबीने नियंत्रण मिळविले तर ते वरदान ठरेल.

प्रश्न : ' जेन्स ' चा वापर करणारी गणकयंत्रे काय काय करू शकतील ?

उत्तर : आजच्या यंत्रांपेक्षा ती यंत्रे प्रचंड प्रमाणावर ' डाटा ' सामावून घेऊ शकतील. त्यांचा आकारही खूप लहान असेल. पण आताच त्याबद्दल आणखी सांगणे कल्पनेतले होईल...

प्रश्न : लोक म्हणतात, गणकयंत्रे, ' विचार करतात '–ती प्रक्रिया कशी ?

उत्तर : मिळालेला डाटा नीट पारखून, पडताळून पाहायला गणकयंत्रे सध्या शिकली आहेत. हे खरे आहे. त्यात आणखीही पद्धतशीर सुधारणा आणि विशेषता निर्माण होत आहेत. त्याला ' विचार करणे ' म्हणावे की म्हणू नये हा शब्द वापरण्याचा प्रश्न आहे. पण या प्रकारची माहिती मिळवण्याची, साठवण्याची, विश्लेषण करण्याची, निष्कर्षानुसार आज्ञा देण्याची, वेगवेगळया क्रियांत अनुसंधान ठेवण्याची त्यांची क्षमता वाढत जाणार हे निश्चित.

प्रश्न : माणसापेक्षा ही यंत्रे अधिक शिकण्याची शक्यता आहे काय ?–म्हणजे स्वतःहून.

उत्तर : एवढयातच नाही. पण तसे काही झाले तर त्याचे कारण – आपण शिकणे बंद केले म्हणून असेल ! काम करण्याची अचूकता, गती, निष्कर्ष हे पुरवलेल्या माहितीवर अधिक अवलंबून असेल. अजून तरी गणकयंत्रे परतंत्रच

आहेत..पण त्यांच्या बाबतीत 'स्वयंप्रेरणा', 'स्वाध्याय' ही गोष्ट अशक्य असेल, असे मी म्हणू शकत नाही. पण मानव सहजी करू शकतो त्या नेहमीच्या साऱ्याच गोष्टी गणकयंत्रांकडून करवून घेणे आर्थिकदृष्टया परवडणार नाही.

प्रश्न : शिकणारे यंत्र म्हणजे नेमके काय ?

उत्तर : दिलेल्या ठराविक आदेशानुसार, ठराविक नियम पाळून, ठराविक पडताळा देणारे – ही मर्यादा ओलांडून नियमितपणे आदेशांची छाननी करणारे, विशिष्ट सामुग्रीनुसार कितपत आखणी करता येईल, याचा निर्णय घेणे इ. गोष्टी त्यात बसतात. आज पुष्कळ अंशी हे साध्यही होत आहे.

प्रश्न : गणकयंत्रांना लिहिणे शिकवता येते का ?

उत्तर : काही अशी यंत्रे आहेत, की विशिष्ट कोड, संकेतानुसार त्यांचे विवरण टाईपात केले जाते. याच्या उलट क्रियाही केली जाते. भाषणसुद्धा 'कोड' करता येते.

प्रश्न : मनुष्यापेक्षा गणकयंत्रे अधिक चांगले काम कशा रीतीने करू शकतात ?

उत्तर : अनेक प्रकारचे हिशेब, आकडेमोड, गणिते, रेकॉर्ड, असे नाना प्रकारचे बौद्धिक उपयोग आहेत. आणखीही वाढत जातील. शिवाय अवकाशयाने नियंत्रित करण्याच्या आणि विद्यापीठीय शिक्षणाच्या, इतकेच नव्हे तर प्राथमिक शिक्षणातही त्यांचा वापर सर्रास होणार आहे. सुरुवातीच्या अवस्था आता पार पडल्या आहेत. जसजसे नवे प्रकल्प यशस्वी होतील, तसतशी त्यांची किमया जगाला कळणारच आहे. आणि माणूस करतो त्या कामावरून त्याची प्रतिष्ठा मापण्याचे दिवस आता संपतील. 'माणूस' म्हणूनच त्याची किंमत करण्याची धारणा मानली जाईल. ज्या कामासाठी हजारो माणसांची गरज आहे, ते क्षणार्धात या यंत्रांनी केले जात आहे, तेही अधिक अचुकपणे. आधुनिक संस्कृतीत माणसाच्या व्यापारी सेवेची किंमत एवढी पुरेशी नाही. त्यामुळे माणसाचे मूल्यमापनच करायचे झाले, तर त्याच्या भौतिक शक्तीवरून करता येणार नाही आणि केवळ यंत्रांनाच महत्त्व देत गेलो, माणूस जमेला धरला नाही, त्याला स्थान दिले नाही तर, आपण बुडालोच म्हणून समजा !

आता गणकयंत्रांना दूर लोटूनही चालणार नाही ! ते शक्य नाहीच. पूर्ण तयारीनिशी ती खडी आहेत ! ज्ञानवृक्षाचे फळ खाल्लेच आहे. मग या ज्ञानाशिवाय पुढे जाणे अशक्य आहे. हे टाळता येणार नाही. हे ज्ञान त्याच्या आवाक्यात आहे, एवढेच सध्या म्हणता येईल. त्याच्या आवाक्याबाहेर गेले तर काय होईल, हे सांगायला आपण नसू !

◻ ◻ ◻

गेल्या महिन्यात पुण्याच्या नेहरू मेमोरियलमध्ये
सलग दहा प्रयोग झालेले
आणि वर्तमानपत्रातील प्रचंड जाहिरातीमुळे
चर्चेचा विषय झालेले एक धमाल उर्दू नाटक

प्रा. यशवंत भिमाले

# अद्रक के पंजे

सिटिझन आर्टस् अॅकॅडमीने सादर केलेले, इंग्रजी, फ्रेंच व उर्दू या तीन भाषांमधून देशी-विदेशी गाजलेले आंतरराष्ट्रीय कीर्तीचे सामाजिक विनोदी नाटक म्हणून पुण्यातील सर्व प्रयोग "हाऊस फुल्ल" झालेल्या "अद्रक के पंजे" चा नाटच प्रयोग पाहण्याचा योग घडून आला. सतत सात मजली हंशा पिकविणारे हे नाटक केवळ फार्सिकल नसून व्यंगप्रधान व मार्मिक आहे.

या विनोदी नाटकावर चित्रपट काढण्याचा प्रयत्न झाला असता लेखक निर्माता दिग्दर्शक व प्रमुख भूमिका गाजविणारे श्री. बब्बन खान यांनी साफ नकार दिला. ही घटना मोठी सूचक आहे व त्यातून नट, दिग्दर्शक व लेखक बब्बन खान यांचा दांडगा आत्मविश्वास प्रकट होतो. अधिक मुले असणाऱ्या गृहस्थाला उपहासाने "अद्रक का पंजा" म्हणतात. आल्याची पिले वा बाळे त्याच्या अंगावरच पसरलेली असतात. कुटुंबनियोजन हा नाटकाचा सुप्त हेतू पण कलात्मकता इतकी सहज सुंदर आहे, की विनोद, उपहास, मार्मिकता व कोटीबाजपणा हे गुण नाटकाची अविभाज्य अंगे बनतात.

रमदूभाई कोर्टात कारकून असतो. त्याला फक्त आठ मुले असतात व नवव्याची चाहूल लागलेली असते. परिणाम सांगायला नकोच, तो उघडच "आमदानी अठ्ठी, खर्च्या रुपय्या" होऊन संसाराचा बेंडबाजा वाजलेला असतो. हा संयुक्त बँड गवळी, घरमालक, शिक्षक, पठाण, शेठजी व सासरची प्रिय माणसे यांचा असतो. तोंड लपवणे, खोटे बोलणे, उघड-उघड लाचारी पत्करणे, अकारण हमरी तुमरीवर येणे व शेवटी पाया पडून, दादा-बाबा म्हणून देणेकऱ्यास वाटेला लावणे हा नित्यक्रम रमतुभाईच्या पूर्ण अंगवळणी पडलेला असतो. उधार उसनवार, कर्ज, बोजा, खोट्या सबबी लंगड्या बाबी हे सारे परिणाम भोगणारे कुटुंब व त्याची दुर्दशा अतिशय

सुरेख अभिनयातून खटकेबाज संवादांतून मार्मिक कोट्यांतून व हमखास विनोदाच्या जागी टिपून साधली आहे. दोन अंकी नाटक. प्रमुख भूमिका बब्बन खानची. तसा हा माणूस फाटक्या अंगाचा शिडशिडीत, दात पुढे आलेला, काळा-सावळा परंतु शब्दांची फेक, मुद्राभिनय, हावभाव हातवारे इतके बेमालूम व हुबेहूब की प्रेक्षक, मंत्रमुग्ध होतात. चिडखोरपणा, लाळघोटेपणा आक्रस्ताळेपणा, लाचारी सर्व भाव कसे यथास्थित, सहजस्वाभाविक विरोधाभास, उर्दू भाषेतील खटकेबाज संवाद, उत्कृष्ट कोट्या, मार्मिक विनोद या सर्वांचा भरपूर उपयोग करून बब्बन खान दर्शकांना जिंकतात. पत्नीची व अन्य देणेकऱ्यांच्या उप-भूमिका गौण, सामान्य असल्या तरी कथानकात महत्त्वाचे स्थान असलेल्या आहेत. हिप्पी, रमदूभाईची नवव्या वेळेला गर्भवती राहिलेली त्रासिक बायको, वटवट करणारा फकीर, व्यर्थोपदेश करणारा मास्तर, सहानुभूती दाखवणारा पाशाभाई फक्त लक्षात राहातात.

बाकी घरमालक, रड्डीसाहेब, रेसचे घोडे ठेवणारा श्रीमंत, मिर्जा व पठाण ही पात्रे गौण असून सामान्य वाटतात. फुटकी मडकी, मोडक्या ट्रंका, अस्ताव्यस्त सामान, पडके घर, सगळे कसे सहजसुंदर साधले आहे. पार्श्वसंगीत व प्रकाश योजनेच्या विविधतेचा वापर जवळ जवळ नाहीच. पोरांपासून थोरांपर्यंत वेशभूषा


हिंदुराष्ट्रवादाची गीता .....

श्रीसंत ज्ञानेश्वर पुण्यतिथीला ( दि. १५-११-७१ ) पुनर्प्रकाशित झाली !

हिंदुहृदयसम्राट स्वातंत्र्यवीर सावरकर लिखित अद्वितीय ग्रंथ

**" हिं दु त्व "**

**मराठी भाषांतर : (कै.) डॉ. नारायण दामोदर सावरकर**

डेमीं आकारातील १४२ पृष्ठें ※ उत्तम छपाई ※ उत्कृष्ट बांधणी, अनुपम मुखपृष्ठ.

**मूल्य : सहा रुपये केवळ.**

**ग्राहकांना ग्रंथ घरपोच मिळण्यासाठी विशेष सोय.**

म. ऑ. ने रु. सहा केवळ पाठविणाऱ्यांना हा ग्रंथ पंजीयित पुस्तप्रेष (रजि. बुकपोस्ट) द्वारा पाठविला जाईल. ( टपाल व्ययाची सूट मिळेल. ) व्ही. पी. पद्धती नाही.

पुस्तक विक्रेत्यांनी २५ टक्के वटाव कापून रक्कम म. ऑ. ने पाठवावी. व्ही. पी. पद्धती नाही.

सावरकर तत्वज्ञान प्रसारकेंद्र, सुभाष कुंज, धर्मवीर डॉ. मुंजे मार्ग, सीताबर्डी, नागपूर,-१२

यथायोग्य व व्यवस्थित आहे. उर्दू भाषा मुळातच दरबारी थाटाची, नाजूकपणा असलेली पण नाटकातील भाषा सामान्य मुसलमान कुटुंबात वापरली जाणारी बेगडी व रांगडी आहे. तथापि दारिद्र्याचे चटके व कुटुंबनियोजन फसल्याने बसणारे आर्थिक, सामाजिक फटके जास्त परिणामकारक ठरले ते या रांगड्या, उघड्या-नागड्या भाषेने हेच खरे. चिक्कार पोरे असणाऱ्याला ' अद्रक का पंजा ' म्हणतात. इतका योग्य व मार्मिक शब्द ललित भाषेत सहज कोठून येणार ?

## विनोदाच्या हुकमी जागा

रमदूभाईचा कंबरेत उलटा वाकलेला सासरा घरी चहा पिण्यास येतो. नजरचुकीने चहात मलमलची टोपी पडते. मलई समजून सासरे ती खातात. घरी जाताच सटासट उचक्या लागतात. डॉक्टरच्या औषधाने बाहेर (उलटीबाटे ?) पडलेली चुरगळलेली टोपी पाहताच टोपी मिळाली पण माझा मलमलचा शर्ट कोठे आहे म्हणून रमदूभाईने विचारताच प्रेक्षक थिएटर डोक्यावर घेतात. फकीर भीक मागण्यासाठी आलेला असताना चूल पेटविण्यास त्याच्याकडून काड्याची पेटी मागून घेण्यात येते. एकंदर स्थिती न्याहाळून रमदूभाई त्याला विचारतो किती शिकलास ? फकीराने मॅट्रिक सांगताच त्याला रमदुभाई विचारतो काय मॅट्रिकला भीक हा विषय ऑप्शनला होता काय ? घरात खायला काहीच नसते. मुले विचारतात बाबा माती खाऊ ? मायाळू बाबा सांगतात बाळांनो सर्वांनी वाटून खा बरं का ? किती समंजसपणा ! याला म्हणतात पालक !! घरमालकाने पाळण्यास दिलेल्या कोंबड्या रोज दोनच अंडी द्यायच्या. घरमालक चिडून म्हणतात असे का ? रमदूभाई उत्तर देतात कदाचित कोंबडींनी बर्थकंट्रोल केला असेल ? रमदूभाईला आठ मुले असतात, त्यावर एकजण विचारतो " खरेच तुम्हाला आठ मुले आहेत, डेफिनेटली ?" उत्तर : " वन मोर इज कमिंग शार्टली " एक का दोन हसून हसून पुरेवाट करणारे शेकडो प्रसंग सहज सांगता येतील. १९७१ मध्ये जागेची टंचाई. १९८१ मध्ये पोपटांच्या पिंजऱ्या एवढ्या जागेला प्लॉट म्हणून किंमत येईल या वाक्यात व्यंग, मार्मिकता आहे, केवळ विनोद नाही. हिप्पी फॅशन, कुटुंबनियोजनाचे अपयश या सर्वांवर कडाडून पण कलात्मक हल्ला करण्यात, त्यांची टर उडविण्यात लेखक, निर्माता, दिग्दर्शक, नट, बब्बन खान पूर्णपणे यशस्वी झाले आहेत, असेच मत " अद्रक के पंजे " हे तुफान विनोदी नाटक पाहिल्यावर होते.



शरद गोखले

# चित्रपट

## बाजीरावचा बेटा

### अगदी सुमार

फार दिवसांनी आलेले दोन-चार चांगले चित्रपट पाहिल्यावर बाजीरावाचा बेटा हा ताजा चित्रपट पाहाण्याचा योग आला. आणि पुन्हा गाडी मूळपदावर आल्याचे प्रकर्षाने जाणवले. पारिजात चित्र या संस्थेचा मुंबईचा जावई विलक्षण गाजला होता. आता त्याच संस्थेच्या त्याच दिग्दर्शकाचे चित्र म्हणजे प्रेक्षक स्वाभाविकपणेच काही अपेक्षा ठेऊन जातो आणि चित्रपट पाहिल्यावर आपण फसवले गेलो या भावनेने परततो.

केवळ इंग्रजी चित्रपट दाखवणाऱ्या अलका चित्रपट गृहासारखे चित्रपटगृह मिळूनही चित्रपट अगदीच यथातथा असल्याने या संधीचा फायदा उठवता आला नाही. बाजीरावाचा बेटा, असे नाव असलेला चित्रपट निखळ विनोदी निघाला असता, तर आश्चर्याची बाब नव्हती, परंतु चित्रपटाची हाताळणी अशी काही विचित्र झाली आहे, की या चित्रपटाला काय म्हणावे हेच समजत नाही.

बाजीराव नामक कुणी अति धनाढ्य इसम विमान अपघातात मरतो. या इसमाचा सर्व व्यवहार 'बूट बूट बूट' नामक कंपनी बघत असते. (काय आहे की नाही विनोदी नाव) बाजीरावाने आपला वारस नेमण्याचे अधिकार या बुटांना दिलेले असतात. मयत बाजीरावाचा शंभू नामक कोणी नातेवाईक ही मंडळी निवडून काढतात. आणि त्याला वारस म्हणून आणण्यासाठी स्वतः तिन्ही बूट त्याला शोधत आडगावी जातात. (वास्तविक या बुटांना जायचे कारण काय? मग नाही गेले, तर विनोदाला सिच्युऐशन कशी मिळणार, तेव्हा अशी सिच्युऐशन निर्माण करण्यासाठी हे बूट आडगावी जाऊन, अगदी बालबोध विनोद घडवून प्रेक्षकांना हसवतात). शंभूची आजी उदार मनाने त्याला मुंबईस पाठवते आणि हा अडाणी शंभू बाजीरावाचा बेटा बनून मुंबईस येतो. मग गरिबांसाठी त्याला असलेली कणव, गरिबांसाठी त्याने केलेले प्रयत्न, 'बूट' कंपनीकडून आलेले अडथळे, व त्याला वेडा ठर-

वण्याचा त्यांनी केलेला प्रयत्न या सर्वांच्या जोडीला एका महिला वातमीदाराचे व शंभुचे प्रेमप्रकरण यांची भर घालून कथानक शेवटपर्यंत रेटले आहे.

## अगाध अज्ञान

व्यवसायामध्ये वर्षानुवर्षे वावरणाऱ्या मंडळींना काही सर्वसाधारण गोष्टींची माहिती नसावी याचे आश्चर्य वाटते. करोडपती माणसाचे व्यवहार पाहणारी या चित्रपटातील बूट कंपनी केवळ असल्या चित्रपटामध्येच पहावयास मिळेल. बाजीरावाचा बेटा बनून आलेल्या शंभूला आयुष्यातून उठवण्यासाठी वृत्तपत्राचा आधार घेणाऱ्या त्याच्या प्रतिस्पर्धी-चित्रपटामध्ये-ज्या लायकीचे वृत्त दाखवले आहे, अशा लायकीच्या संपादकाकडे खचित जाणार नाही. त्याचा हेतू साध्य करण्याचे अनेक मार्ग आहेत. चित्रपटातील हा सर्व भाग हस्यास्पदच नव्हे तर संबधितांचे अगाध अज्ञान दर्शवणारा आहे. एकूण संपूर्ण चित्रपटच कसा तरी घाईगर्दीने संपवून प्रेक्षकांच्या तोंडावर फेकण्यात आला आहे. स्वाभाविकपणे प्रेक्षकांकडून प्रतिसादही त्याच लायकीचा मिळत आहे.

शरद तळवलकर, सुरेखा, गणेश सोळंखी, विठ्ठल पणदूरकर, या जुन्या कलाकारांपेक्षा शंभूचे काम करणारा अमोल पालेकर, त्याच्या सहजसुंदर अभिनयाने लक्षात राहातो. सुरेखाचे कामही ठीक झाले आहे. शंभुच्या आजीच्या छोटया भूमिकेमध्ये कुसुम देशपांडे व त्याच्या मॅनेजरच्या भूमिकेमध्ये डोंगरे छान काम करून जातात.

संगीताची बाजू सुधीर फडके यांच्या नावावर नोंदवली गेली असली, तरी त्यांच्या कीर्तीला साजेसे फारसे काही आढळत नाही.

छायाचित्रणातही सलगता नाही. प्रिंटस् राजकमलमध्ये काढल्या असूनही फॉगी असल्याने चित्रपट पाहणे कंटाळवाणे ठरते.

खूप मोठा आव आणून आला असला, तरी अगदीच सुमार असल्याने या बेटयाला लवकरच पळ काढावा लागेल हे निश्चित.



# माणूस

दशकपूर्तिनिमित्त

# रुपया पुस्तक योजना

## माणूसची ५ वर्षांची
## १०० रुपये वर्गणी भरल्यास

| | | |
|---|---|---|
| राजा शिवछत्रपती | ब. मो. पुरंदरे | ३०-०० |
| पुरंदऱ्यांची दौलत | ब. मो. पुरंदरे | ३-५० |
| पुरंदऱ्यांची नौबत | ब. मो. पुरंदरे | ३-५० |
| शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३-०० |
| मुजऱ्याचे मानकरी | ब. मो. पुरंदरे | ३-०० |
| कधी आणि कोठेतरी | डॉ. सुधीर फडके | १२-०० |
| रातराणी | विजय तेंडुलकर | १२-०० |
| शतपावली | रवींद्र पिंगे | १२-०० |
| पूर्णिया | अनिल अवचट | ६-०० |
| श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | १५-०० |

## ही दहा दर्जेदार पुस्तके
## प्रत्येकी एक रुपयास मिळतील........

# ....' रुपया पुस्तक ' योजनेसंबंधी आणखी थोडे

' रुपया पुस्तक ' योजनेची मुदत १ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर १९७१ पर्यंत आहे.

योजनेत सहभागी होणाऱ्यांनी पाच वर्षांची वर्गणी रुपये शंभर फक्त प्रथम जमा करावयाची आहे. म्हणजे ' माणूस ' अंक पाच वर्षांसाठी चालू राहील.

रक्कम मनीऑर्डरने किंवा ड्राफ्टने ' साप्ताहिक माणूस ' या नावावर पाठवावी. चेक असल्यास एक रुपया वटणावळ अधिक पाठवणे अवश्यक आहे. सोबतच्या पत्रात ' रुपया योजना ' असा स्पष्ट खुलासा असावा.

वर्गणी जमा झाल्यावर ' रुपया पुस्तक ' योजनेतील पहिल्या पाच पुस्तकांच्या गटाचे (पुरंदरे वाङ्मय) वाटप ताबडतोब होईल.

कार्यालयात शंभर रुपये रोख वर्गणी वरील मुदतीत भरणाऱ्यास या योजनेतील ' पुरंदरे ' गटाची पाच पुस्तके प्रत्येकी एक रुपया याप्रमाणे पांच रुपये किंमत वेगळी जमा केल्यावर जागच्याजागीच देण्यात येतील.

या पुस्तकांचा पाठवणी खर्च (टपाल व पॅकिंग इत्यादी) वर्गणीदारांनी भरावयाचा आहे. हा खर्च अधिक प्रत्येकी एक रुपया प्रमाणे होणारी पाच पुस्तकांची पाच रुपये ही किंमत मिळून एकूण रकमेची व्ही. पी. वर्गणीदारांकडे जानेवारी अखेर पाठवली जाईल. ही व्ही. पी. सोडवून घेण्याचे बंधन वर्गणीदारारांवर आहे.

योजनेतील दुसऱ्या पाच पुस्तकांचा गट एक किंवा दोन हप्त्यात ऑक्टोबर १९७२ पूर्वी वर्गणीदारांच्या हाती पडेल. पुस्तके घेताना प्रत्येकी रुपया याप्रमाणे होणारी किंमत वर्गणीदारांनी भरावयाची किंवा सोसावयाची आहे. टपाल पॅकिंग इ. खर्च वर्गणीदारांकडे.

' सलामी योजना ' व ' रुपया योजना ' या दोन स्वतंत्र योजना असल्याने या दोन्ही योजनेतील पुस्तकांचे गट वेगवेगळे आहेत. गटातील पुस्तकांची अदलाबदल होऊ शकणार नाही.

' माणूस 'चे चालू वार्षिक वर्गणीदार पुढील पाच वर्षांसाठी शंभर रुपये वर्गणी भरून या ' रुपया पुस्तक ' योजनेत सहभागी होऊ शकतील.

साप्ताहिक माणूस, नागनाथपाराजवळ, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० / दूरध्वनी : ५७३५९

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, सस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649



"....आणि ह्या विकास योजनाना ताबडतोब मान्यता मिळाली नाही तर १९७२ नंतरचा मंत्री आपल्या भागा-तूनच निवडला गेला पाहिजे अशी मागणी करू या...."